
८ जानेवारी १९७२
पन्नास पैसे

# माणूस



| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | ८ जानेवारी १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | बत्तीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार...**

□ २५ डिसेंबरच्या अंकातील 'विजय राजनैतिक आणि सामरिक' व 'इंदिरा गांधी यांची एक अज्ञात बाजू' हे दोन लेख वाचून मनाचे समाधान झाले. या पूर्वीच्या दोन्ही लढयात कोणताही निर्णय भारताच्या बाजूने झालेला नव्हता. हा विजय अपूर्वच होय. त्याचप्रमाणे इंदिरा गांधींचे अज्ञात दर्शनही आपल्या लेखामध्ये झाले आहे. इंदिरा गांधींवरील हा लेख तर आजच्या लुंगी-लिपस्टिकवाल्या पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करणाऱ्या आपल्या भारतीय स्त्रियांनी अवश्य वाचावा. देशाची परिस्थिती गंभीर असताना नृत्यात भाग न घेणारी स्त्री आदर्शच आहे. त्याचबरोबर विवेकानंदांच्या स्मारका-पाशी आध्यात्मिक चर्चा करणारी ही इंदिरा आपल्या भारताची भाग्यविधाती आहे याचा कोणालाही अभिमानच वाटेल. योग्यवेळी हे दोन लेख व इतरही तसेच लेख या वर्षाच्या शेवटी आपण प्रसिद्ध केलेत. धन्यवाद.

२५ डिसेंबर, १९७१ — के. जी. कुलकर्णी, मुंबई

□ ता. २५–१२–७१ च्या अंकातील श्री. पा. शं. माईण-कर यांचा 'हे आठशे कोटी रुपये प्रथम वसूल करा' हा लेख वाचला. ज्या २२ मंडळींची यादी वाचली, त्यातील

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

कोणीही पैसे भरू शकणार नाही असे काही वाटत नाही. तरीही वर्षानुवर्षे त्यांच्याकडून पैसे येत नाही म्हणजे खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे. या देशाच्या अर्थव्यवस्थेवर अद्यापही पैसेवाल्यांचा किती पगडा आहे याचे बोलके प्रतीक म्हणजे ही आयकराची थकबाकी होय. या बाबतीत संसद सदस्य, वृत्तपत्रे व जनतेने खरोखरच सरकारकडे खंबीर पावले उचलण्याची जोरदार मागणी केली पाहिजे. अन्यथा हा कर-थकव्यांचा व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांचा वर्ग दिवसेंदिवस वाढतच जाईल.

३० डिसेंबर १९७१ — फु. भि. सांकला, पुणे

□ मी 'माणूस'चा नियमित ग्राहक-वाचक आहे. श्री. पारगावकरांनी दोन वर्षांपूर्वी काँग्रेस अधिवेशनावर लिहिलेले लेख चांगले होते. दि. १२ डिसेंबरच्या अंकातील पान ११ वर श्री. कृष्ण मेनन यांना उल्लेख 'गांवढळ' म्हणून केला आहे. मी श्री. कृष्ण मेनन यांच्या भगतगणांपैकी नाही. स्वतंत्र विचारसरणीचा जागरूक वाचक आहे. पं. नेहरूंनी काश्मीर प्रश्न युनोत नेऊन त्याची वकिली श्री. मेनन यांचेकडे सुपूर्त केली हे विधान वस्तुस्थितीला धरून नाही. १९६२ साली युनोत काश्मीरची वकिली तत्कालीन संरक्षणमंत्री श्री. गोपालस्वामी अय्यंगार यांनी केली होती. श्री. बेनेगल नरसिंग राव या कुशाग्र बुद्धिवंताची त्यांना मदत होती.

श्री. मेनन यांनी काश्मीरची वकिली अत्यंत प्रभावीपणे व सर्व राष्ट्रांच्या प्रशंसेला पात्र अशी केली ती १९५७ च्या निवडणुकांपूर्वी व नंतर. कदाचित श्री. पारगावकरांच्या ध्यानात नसेल परंतु गांवढळ कृष्ण मेनन जगप्रसिद्ध पेंग्विन पुस्तकांच्या मालिकेतील काही पुस्तकांचे संपादक होते. १९६२चा पराभव श्री. कृष्ण मेनन संरक्षणमंत्री होते म्हणून झाला हे संपूर्ण सत्य नाही. संरक्षण उत्पादनवाढीसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची मुक्तकंठाने स्तुती त्यांच्यानंतरचे संरक्षणमंत्री श्री. चव्हाण यांनी केलेली आहे.

२२ डिसेंबर, १९७१ — सु. वा. अग्निहोत्री, आर्वी (वर्धा)

□ पत्र पाठवण्यास उशीर होत आहे. पण माणूसच्या ११ डिसेंबरच्या अंकातील श्री. रविंद्र पिंगे यांचा शतपावलीतील 'चर्चिलची संध्याकाळ' हा लेख फारच आवडला. चर्चिल एक युगपुरुष होऊन गेले असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. अशा मोठ्या भारदस्त व्यक्तीविषयी थोडक्यात लिहावयाचे म्हणजे तेवढाच दमदार व कसाचा लेखक पाहिजे. श्री. रविंद्र पिंगे या कसोटीला पूर्णपणे उतरल्याचे त्यांच्या अशा अनेक लेखांवरून सिद्ध झाले आहे. याच अंकाच्या शेवटच्या मलपृष्ठावरील 'हे सुरसरिते सिंधू" हे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार सद्यःपरिस्थितीत छापून आपण औचित्य साधले आहे. स्वा. सावरकर यांच्याबद्दल श्री. रविंद्र पिंगे यांनी 'माणूस'मध्ये लिहावे असे वाटते व याकरिताच आपणास पत्र लिहिले आहे.

२० डिसेंबर, १९७१ — रा. धों. सहस्रबुद्धे, अमरावती

# अठरा लक्ष पावलं दूर गेलेली....

श्री. ग. मा.

आजकाल प्रत्येकजण स्वावलंबनाचे महत्त्व आग्रहाने, आवेशाने प्रतिपादन करीत आहे. चार वर्षांपूर्वी अशी परिस्थिती नव्हती. साधे अन्नपरावलंबन तरी नको हे सांगण्यासाठी पद-यात्रा काढाव्या लागत होत्या. अर्थशास्त्राचा आधार घेऊन स्वावलंबन कसे शक्य आहे हे पटवून द्यावे लागत होते. अनेक आक्षेपांना तीच तीच कंटाळवाणी उत्तरे देत बसावे लागत होते. लेख, जादा अंक यांचा मारा करून हे लोकांच्या मनावर ठसवावे लागत होते. स्वावलंबन हे तत्त्व तसे नवीन मुळीच नाही. पण आपण मागासलेले, लोकसंख्या अफाट, पराकोटीचे दारिद्र्य ! तेव्हा आपला विकास परदेशी मदतीवाचून कसा होणार हा समज तेव्हा इतका घट्ट होता, की परदेशी मदत झुगारण्याची कल्पना तेव्हा बहुतेकांना अगदी हास्यास्पद व वेडे-पणाची वाटत होती. असे बहुजनमत असताना स्वावलंबनाचे महत्त्व ठासून सांगणे, आपल्या परावलंबनाचा, भिक्षांदेही वृत्तीचा धिक्कार करीत गावोगाव वेड्यासारखे फिरत राहणे निश्चितच नवीन होते, वेगळे होते. चालू भारत-पाक युद्धामुळे आता हे स्वावलंबनाचे तत्त्व सर्वांनाच मान्य झालेले आहे. आपले केंद्रीय अर्थमंत्रीही परावलंबनाने देशाची किती हानी होते, युद्धप्रसंगी आपली कशी कोंडी होते हे नुकतेच मुंबईच्या सभेत सांगून

गेले आहेत. हेच चार वर्षांपूर्वी महाराष्ट्रात काही तरुणांनी पदयात्रा करून सांगितले होतें. श्रीकैलास ते सिंधुसागर अन्न-स्वतंत्रता संचलन हे या पदयात्रेचे नाव. या पदयात्रेबरोबर 'निरीक्षक' म्हणून पुण्याचे एक सुप्रसिद्ध लेखक श्री. दि. बा. मोकाशी हेही पावले टाकीत निघाले होते. गेली चार वर्षे ते या पदयात्रेसंबंधीचे पुस्तक तयार करीत होते. मुंबईच्या 'मौज'तर्फे नुकतेच हे पुस्तक प्रकाशित झालेले आहे. 'अठरा लक्ष पावलं' हे या पुस्तकाचे नाव आहे.

एरवी या पुस्तकासंबंधी लिहिण्याची मला काही आवश्यकता नव्हती. परंतु दि. बां. नी पुस्तकात बरेच घोटाळे करून ठेवलेले आहेत, त्यामुळे गैरसमज विनाकारण वाढण्याची शक्यता मला दिसली. म्हणून हा स्पष्टीकरणात्मक लेख लिहिणे मला अगदी भाग पडत आहे. शिवाय प्रश्न चळवळीच्या उद्दिष्टांचा आहे, त्यात माझ्या व्यतिरिक्त सहभागी झालेल्या काही अन्य व्यक्तींचाही आहे. दि. बां. नी केलेल्या घोटाळ्यांमुळे या उद्दिष्टांवर व व्यक्तींवर अन्याय होत आहे असे मला वाटले. चळवळीचा प्रमुख या नात्याने हा अन्याय निदान नोंदवून ठेवणे एवढे तरी माझे एक कर्तव्य आहे. हे कर्तव्य केल्याबद्दल दि. बा. मला दोष देणार नाहीत, आमच्या सुखद मैत्रीत त्यामुळे यत्किंचितही खंड पडणार नाही अशी मला आशा आहे.

प्रथम उद्दिष्टांचा प्रश्न घेऊ. आम्हा मंडळींची प्रेरणा राष्ट्रीय अस्मितेची जपणूक व जागणूक होती, हे मूळ पत्रकावरून अगदी उघड होत होते. या प्रेरणेशी दि. बा. प्रथमपासूनच समरस होऊ शकत नव्हते. या प्रेरणेतील वैयर्थ्य त्यांना जाणवत असावे असे दिसते. किंबहुना अशा स्वरूपाच्या कुठल्याच प्रेरणा व त्या मागोमाग येणाऱ्या चळवळी त्यांना मनापासून पसंत नसाव्यात, अशीही शक्यता आहे. कारण अशा चळवळींनी जगाचे काहीही बरेवाईट होत नाही असा त्यांचा दृष्टिकोन त्यांनी एके ठिकाणी पुस्तकात मांडलेला आहे. पृष्ठ १७१ वर दि. बां. नी शहापूरचा एक अनुभव सांगताना लिहिले आहे--

'कानिटकरांना (वि. ग. कानिटकर, 'नाझी'चे लेखक) पदयात्रेत काय झाले हे ऐकण्याची उत्सुकता आहेच. पण नसली तरी मी सगळे ऐकवत आहे. 'अँग्री यंगमेन' सारखा कातावून, अस्वस्थ होऊन मी सांगत होतो. पण त्यांच्याचप्रमाणे मला माझे कातावणे आणि अस्वस्थपणा का आहे हे कळत नव्हते. माजगावकर, एक साधा मध्यमवर्गीय तरुण. धडपडत एक साप्ताहिक सुरू केले, काही कल्पना सांगण्यासाठी आणि पोटासाठी. सामाजिक मूल्यांना धरून राहणारा. चांगला. त्याने आपले तसेच राहावे. अशी माणसे हलली नाहीत की कसल्याही वातावरणात समाज टिकाव धरतो. त्या माणसाने राजकारणाच्या आणि पुढारीपणाच्या भानगडीत पडावे याचा राग मनात होता का ? त्या रात्री मी खूप बोललो. कानिटकरांना नवल वाटले असेल.'

आणखी एका ठिकाणी (पृ.१६९) मोकाशींना लिहिलेले आहे—

'अंधारातून डाक बंगल्याकडे जाताना मनात आले : बरे झाले, आपण त्रयस्थ

म्हणून या वाटचालीबरोबर आलो. या अंधारात ' राजकारणा ' वरचा राग उफाळून आला आहे. मी लेखक म्हणून येथे त्रयस्थ वागतो आहे, की ' राजकारणा 'चा राग म्हणून त्रयस्थ राहिलो आहे ? दोन्हीही असेल. '

लेखकाने ' त्रयस्थ ' राहणे ही एक वादग्रस्त पण समजू शकणारी भूमिका आहे. मोकाशींसारख्या एखाद्या लेखकाने राजकारणाचा ' राग ' धरला तर तोही दुर्लक्षणीय ठरू शकतो. आक्षेप आहे तो असा ' राग ' असणाऱ्या ' त्रयस्थ ' लेखकाने राजकारणासंबंधी ' रागारागाने ' लिहिण्याच्या धाडसाबद्दल. तुकाराममहाराजांनी राजकारणाबद्दल काही लिहिले नाही. रामदासांनी लिहिले. दोघेही अलिप्त व त्रयस्थच होते. एक ' ठेविले अनंते ' वृत्तीचे होते तर दुसरे ' दास डोंगरी राहतो। उत्सव देवाचा पाहतो । ' असे म्हणणारे होते. पण रामदासांनी जेव्हा राजकारणावर लिहिले तेव्हा ते प्रथम समजून-उमजून घेतले. ' महाराष्ट्रधर्म, ' ' हिंदवी-स्वराज्य ' याचे मर्म आणि महत्त्व लक्षात घेऊन मग संभाजीला त्याच्या चुका दाखवून दिल्या. मोकाशींनी हे केले नाही म्हणून त्यांचे लिखाण बऱ्याच ठिकाणी डागळल्यासारखे झालेले आहे. मधूनमधून त्याला कुत्सितपणाचा वासही येत आहे. पदयात्रेतील राष्ट्रीय आशय त्यांनी कुठेच मोकळ्या मनाने मांडलेला नाही, मान्यही केलेला नाही. एक तर त्यांना तो समजला तरी नसावा, किंवा समजूनही त्यांनी याकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष केले असावे. पदयात्रेत जी काही प्रमुख भाषणे झाली, त्यावरून तरी त्यांनी हा आशय व त्याचे महत्त्व ध्यानात घ्यायला हवे होते. वर दिलेल्या शहापूर मुक्कामाचीच गोष्ट घ्या. या शहापूरच्या सभेसाठी मुंबईहून प्रा. स. गं. मालशे मुद्दाम आलेले होते. त्यांनी आपल्या भाषणात ' समाजाचा आत्मतंतू तुटता कामा नये. यादृष्टीने या चळवळीचे फार महत्त्व आहे ' असे सांगितले. मोकाशींना या आत्मतंतूचे भान एकदाही होऊ नये ! बिडकीनच्या सभेत डॉ. बापूसाहेब काळदाते यांचे भाषण झाले. ' स्वातंत्र्योत्तर काळातील विधायक राष्ट्रवादाचा हा एक नवा आविष्कार आहे ', असे त्यांनी या आंदोलनाचे वर्णन केले. मोकाशींनी हे काहीच कसे कुठे नोंदले नाही, याचे आश्चर्य वाटते. चळवळीला असा काही भरीव आशय नसता तर ही सर्व मंडळी आली तरी असती का, याचाही मोकाशींनी विचार केला नाही.

एखाद्या साहित्यकृतीने नावांची जंत्री द्यावी असे मी केव्हाही म्हणणार नाही. पण थोडा विचार केला तर असे दिसून येईल, की स्वातंत्र्योत्तर काळात, विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती जेवढ्या प्रमाणात, महाराष्ट्रापुरत्या या चळवळीत सहभागी झाल्या, तेवढ्या संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन वगळता दुसऱ्या कोणत्याही चळवळीत झालेल्या नव्हत्या व अजूनही नाहीत. पहिल्याच दिवशी वेरूळला पुण्या-मुंबईहून कितीतरी लेखक-संपादक आलेले होते. जयवंत दळवी, विद्याधर पुंडलिक, वि. ग. कानिटकर, श्री. ज. जोशी, वि. शं. पारगांवकर, ग. वा. बेहेरे व इतरही

अनेक. हो. बाबासाहेब पुरंदरे होते. ना. ग. गोरे होते. द. मा. मिरासदार तर यजमानच होते. औरंगाबादेतील काँग्रेस वगळून सर्व पक्षांचे प्रमुख तेथे हजर होते. संपादक होते, अनेक प्राध्यापक व शिक्षक होते. धुंडामहाराजांसारखे 'त्रयस्थ' अधिकारी भागवत दूरदूरहून, दुखरे पाय साथ देत नव्हते तरी प्रवासाचा त्रास सोसून उपस्थित होते. पुढेही मुक्कामामुक्कामावर अनेक महत्वाची मंडळी येऊन गेली. समळीच काही 'राजकारण' साधायला आलेली नव्हती. यापैकी कुणालाही चळवळीच्या योजकांनी साधा येण्याचा भाडेखर्चही दिलेला नव्हता. माजगावकरांवर सर्वांचा वैयक्तिक लोभ होता हेही कारण पुरेसे नाही. मग ही सर्व मंडळी त्रास घेऊन, पदरमोड करून का आली? इतक्या विविध क्षेत्रातली कशी आली? एरव्ही एकमेकांचे तोंड न पाहणारे जनसंघ-कम्युनिस्ट पुढारी येथे एकाच व्यास-पीठावर का चढले? कुठेही 'राजकीय' भाषण न करण्याचा आपला वारकरी परिपाठ कै. सोनोपंत दांडेकरांनी नेमका याच चळवळीच्या वेळी का मोडला? कुठेतरी त्यावेळी हवा असलेला एक जिवंतपणाचा स्वर या पदयात्रेने उमटवला. या स्वराशी आपलाही स्वर मिळवून तो अधिक उंच नेण्याची जबाबदारी या आपापल्या क्षेत्रात मान्यता पावलेल्या सर्व व्यक्तींना जाणवली. असे आंतरिक आकर्षण नसते तर इतक्या संख्येने, अशा योग्यतेची मंडळी येथे एकत्रित आलीच नसती. है या पदयात्रेचे आंतरिक मर्म आणि महत्व मोकाशी हट्टीपणाने नाकारीत आहेत, रागावून सारखे कुठेतरी दूर जाऊन बसत आहेत, जवळ आलेच तर घालून-पाडून बोलण्याची, आडवार करण्याची, उणेदुणे काढण्याची, क्वचित टवाळी उडवि-ण्याचीही संधी सहसा चुकवीत नाहीत असे सारखे हे पुस्तक वाचताना वाटत राहते. असे नसते, तर पदयात्रा जिथे रोडावली, पदयात्रिकांची जेथे उपेक्षा झाली, त्या नेमक्या जागा मोकाशींनी विस्ताराने मांडल्या नसत्या व जिथे पदयात्रिकांचे प्रचंड स्वागत झाले, मोठमोठ्या सभा झाल्या, लोकांनी शेकडो रुपये जमवून स्वयंस्फूर्तीने ही सर्व जबाबदारी पार पाडली त्या त्या सर्व जागा मोकाशींनी इतक्या रुक्षपणे सांगून टाकल्या नसत्या. जशी ती पेट्रोमॅक्सच्या उजेडात जेमतेम जमलेली, झोपलेल्या गावकऱ्यांसमोरची आपेगावची उदासवाणी सभा लेखकाला अस्वस्थ करते, हलवते, तशीच ती नासिकची कुसुमाग्रजांची भव्य सभा, ते औरंगाबादेतले तरुणांच्या उत्साहामुळे लाभलेले थरथरते यश, लहानशा गावातही भर दुपारी निघालेल्या भजनांच्या लांबलचक दिंड्या—हे सर्व लेखकाला एकदाही कसे हलवत नाही? जागे करीत नाही?

हे झाले चळवळीच्या उद्दिष्टांपुरते. या उद्दिष्टांची मोकाशींनी गंभीर उपेक्षा केलेली आहे. ते समजून न घेता त्यासंबंधी उथळपणाने, टर उडविण्याच्या भावनेने व बऱ्याच ठिकाणी खोडसाळपणानेही लिहिलेले आहे.

(अपूर्ण. पुढील अंकी चालू)

## मुंबई वार्ता । अरुण गोसावी

# जानेवारी ते डिसेंबर, ७१

गेले वर्ष भारताच्या, महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्याही दृष्टीने मोठेच उलाढालीचे गेले. भारत-पाक युद्धात पाकिस्तानचा निर्णायक पराभव, बंगला देशाचा जन्म आणि नव-काँग्रेसचा गेल्या लोकसभा निवडणुकीतील अभूतपूर्व विजय या महत्त्वाच्या घटना. परंतु १९७१ साल भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी अशासाठी लिहिले जाईल, की या वर्षात भारताने एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व कमाविले. भारताच्या इतिहासातले हे महत्त्वाचे वळण आहे.

भारतीय घटनांचे प्रतिबिंब महाराष्ट्रात आणि मुंबईतही उमटले. विशेषत: लोकसभा निवडणुकीमध्ये मुंबईच्या पाचही मतदारसंघात नव-काँग्रेसच्या उमेदवारांनी जो प्रचंड विजय मिळविला तो या शहराचे राजकीय चित्र संपूर्णपणे बदलून टाकणारा होता. या विजयापूर्वी महाराष्ट्राच्या या राजधानीत आणि भारताच्या या व्यापारी केंद्रात नवकाँग्रेसचे अस्तित्व केवळ दुर्लक्षणीय होते. परंतु या निवडणुकीतील धवल यशाने नवकाँग्रेस एकदम पुढे आली. महामुंबईत नवकाँग्रेसचा विजय अनपेक्षित होता.

मुंबई हा जुन्या काँग्रेसचा बालेकिल्ला. १९७१ सालाने या शहरात जुन्या काँग्रेसचा पाडाव पाहिला. श्री. स. का. पाटील यांना आता राजकीय पत्रके काढण्यापलीकडे फारसे काम उरले नाही. नवकाँग्रेसच्या जोमदार यशामुळे मुंबई महानगरपालिकेतही जुन्या काँग्रेसला उधळी लागली. जुन्या काँग्रेसच्या एकनिष्ठ सेवकांचे लोंढेच्या लोंढे नवकाँग्रेसला जाऊन मिळू लागले.

याच वर्षाने मुंबईत शिवसेनेचा ऱ्हासही बघितला. दोन-तीन वर्षांपूर्वीचा शिवसेनेचा दबदबा एकाएकी कमी झाला. याला मूळ कारण म्हणजे बहुधा शिवसेनेला आवश्यक असलेली परिस्थिती आता बदलली. विशिष्ट परिस्थितीतून आणि कारणपरंपरेतून या चळवळीचा नैसर्गिकरीत्या जन्म झाला. शिवसेनेने आपली भूमिका यथाकाल नैसर्गिकरीतीने बजाविली. आता ती परिस्थिती बदलली. मुंबईच्या समाजात आणि राजकारणात आता निराळ्या तऱ्हेच्या शक्ती काम करू लागल्याने शिवसेनेची आवश्यकता उरली नाही. त्यामुळे तिचा ऱ्हासदेखील स्वाभाविक आहे. गेले वर्ष शिवसेनेच्या दृष्टीने अंतर्गत तंटे-बखेडे, भानगडी आणि मारामाऱ्या यांमुळे गाजले. शिवसेनेचे लिमका स्टॉल्सही बरेच गाजले. एका कॅलेंडरवर श्री. बाळ ठाकरे यांचे चित्र होते. एवढेच. शिवसेना ही एक चळवळ आहे, संघटना नव्हे हे या स्तंभातून अनेक वेळा प्रतिपादिले आहे. तिचे चांगल्या भरभक्कम संघटनेत रूपांतर झाले असते तर असा ऱ्हास झाला नसता.

गेल्या वर्षात कम्युनिस्टांनीही मुंबईत मार खाल्ला. भारतात कम्युनिस्ट चळवळीचे मुंबई हे आद्य केंद्र. मुंबईचे गिरणी कामगार हे या चळवळीचे अग्रदूत. पण कम्युनिस्टांव्यतिरिक्त इतर कामगार-संघटनांकडेच गिरणी कामगार अधिकाधिक संख्येने जात आहेत. हे १९७१ मध्ये स्पष्ट झाले. कम्युनिस्ट-प्रणीत संघटनेने दिलेल्या संपाच्या हाकेला मिळणारा केविलवाणा प्रतिसाद हेच दर्शवितो. कम्युनिस्टांची नव-काँग्रेसबरोबरची तात्पुरती शय्यासोबत हे याचे कारण असावे. कम्युनिस्टांना मुबईत खरा दणका दिला होता शिवसेनेने. तेव्हापासून कम्युनिस्टांची पडझड सुरू झाली तीच प्रक्रिया गेल्या वर्षीही सुरू होती. कम्युनिस्टांनी मुंबईत नेमकी ताकद किती गमावली याचा अंदाज यत्या विधान-सभा निवडणुकीत येईल. हे झाले उजव्या कम्युनिस्टांबद्दल. काही कामगार संघटना सोडल्यास डाव्या कम्युनिस्टांना मुंबईत स्थान नाही.

मध्यावधी निवडणुकांच्या पूर्वी जनसंघाचा जोर वाटत होता. मुकुंदराव आगासकरांच्या निवडीविषयी फार उमेदीने बोलले जात होते. पण त्यांच्या पराभवाने जनसंघ कार्यकर्त्यांनी हाय खाल्ली. श्रीमती इंदिरा गांधींच्या तडफदार धोरणाने अनेक जनसंघ कार्यकर्त्यांवरही मोहिनी पाडली आहे. त्यामुळे गेल्या वर्षभरात जनसंघाने मुंबईत फार प्रगती केली आहे असे दिसत नाही. भारताच्या विजयानंतर जनसंघ नेते अटल बिहारी बाजपेयी यांची शिवाजी पार्कवर एक अभूतपूर्व सभा झाली. प्रचंड गर्दी हे या सभेचे वैशिष्टय होतेच. पण श्री. बाजपेयी यांनी प्रधान मंत्री इंदिरा गांधी यांची केलेली बेफाट स्तुती हेही या सभेचे खास वैशिष्टय होते.

समाजवादी पक्षाच्या पुनर्जीवनानंतर महामुंबईत या पक्षाने कोठे जीव धरला असे दिसत नाही. समाजवादी पक्षाच्या हाताखालील मजूर संघटना अजून आहेत. पण त्यांच्यात पूर्वीसारखा जोम उरलेला नाही. जॉर्ज फर्नांडीसचा संपूर्ण पाडाव हे १९७१ चे वैशिष्टय मानावे लागेल. लोकसभेच्या १९६७ च्या निवडणुकीत 'जायंट किलर' म्हणून प्रसिद्धीस आलेला जॉर्ज, निवडणुकीनंतर लगेच मुंबईच्या प्रेमाला पारखा होऊ लागला होता. शिवसेनेने जॉर्जचे महत्व कमी करण्यासाठी मोहीमच आखली होती. मध्यावधी निवडणुकीत जॉर्ज आपटला. त्यानंतर त्याने टॅक्सीवाल्यांच्या संपात मार खाल्ला. बेस्टच्या युनियनमध्येही त्याचे महत्व कमी झाले. माझगाव गोदी कामगारांच्या संघटनेचा त्याला राजीनामा द्यावा लागला. थोडक्यात म्हणजे १९७१ साली मुंबईत जॉर्जचा संपूर्ण पाडाव झाला. अर्थात जॉर्ज अजून जिद्द हरलेला नाही. मुंबईने असे अनेक लोक आलेले आणि गेलेले पाहिले आहेत. स. का. पाटील, बाळ ठाकरे, जॉर्ज फर्नांडीस वगैरे.

नव-काँग्रेसचा चहू बाजूंनी विजय होत असला तरी नेतृत्वाच्या बाबतीत सध्यातरी मुंबईत निर्वात प्रदेश निर्माण झाला आहे. पाटील, जॉर्ज, ठाकरे यांच्यासारखा अप्रतिहत सत्ता गाजविणारा पुढारी मुंबईत सध्या नाही. एका परीने हे बरेच आहे. मुंबई-नवकाँग्रेसजवळ असा नेता नाही. काँग्रेस सोशालिस्ट फोरमचे प्रभाकर

कुटे सध्या फार गाजतात. पण अजून ते हा निर्वात प्रवेश भरून काढण्याइतपत मोठे झालेले नाहीत.

हे झाले मुंबईचे राजकीय चित्र. मुंबईच्या भौगोलिक चित्रातही सध्या मोठी उलाढाल चालू आहे. गेल्या वर्षात अनेक नव्या गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या. अनेकांच्या बांधकामाला सुरुवात झाली. नरीमन पाईंटवर ओबेराय-शेराला हॉटेलच्या पस्तीस मजली इमारतीचे बांधकाम पुरे होत आले आहे. गेटवे समोर शिवाजीच्या पुतळ्यासाठी जागा देताना केवढी खळखळ झाली होती. त्या पुतळ्याच्याच मागे आता एक रस्ता पूर्ण नाहीसा करून तिथे ताजमहाल हॉटेलचे ताज-इंटरकाँटिनेंटल हे चौदा-मजली हॉटेल दिमाखाने उभे राहात आहे. गेटवेच्या बाजूला विवेकानंदांच्या पुतळ्याला जागा मिळाली हे नशीब. या पुतळ्याचे अनावरण १९७१ मध्येच झाले. दादरला शिवाजी पार्कजवळ सेनापती बापटांच्या पुतळ्याचे अनावरण राष्ट्राध्यक्ष गिरी यांच्या हस्ते झाले. सचिवालयासमोर कौन्सिल हॉलच्या एकवीस-मजली अत्याधुनिक इमारतीचा पाया मोठ्या समारंभाने घालण्यात आला होता. या बांधकामावर बरीच टीका होत होती. शेवटी दुष्काळी काटकसरीच्या निमित्ताने हे काम तात्पुरते स्थगित केल्याचे जाहीर करण्यात आले. बांधकामाची माहिती देणारे एक मोठे होर्डिंग वादळात कोसळले. ते तसेच महिनाभर पडून होते. शेवटी ते उचलून नेण्यात आले. आता तिथे फक्त पायाचा दगड दीन चेहऱ्याने उभा दिसतो. अफवा अशी आहे, की मंत्री मंडळातील मतभेदांमुळे ही योजनाच बारगळण्याचे प्रयत्न चालू आहेत.

जुळ्या मुंबईच्या योजनेचे प्रत्यक्ष काम १९७१ मध्येच सुरू झाले आहे. मुंबई बाहेर जाण्याचे दोन फ्री-आयलँड एक्स्प्रेस-वे योजिले आहेत. त्यांचीही कामे धिक्के धिक्के सुरू आहेत.

महाराष्ट्राच्या राजकीय वातावरणात १९७१ साली जमिनींवरील सीलिंगच्या वादावादीमुळे भयानक वादळे उठली. ही गडबड अजून शमली नाही. हा प्रश्न तडीला नेण्याचे ठरले तर महाराष्ट्र काँग्रेसमध्ये फूट पडल्याशिवाय राहणार नाही असा निरीक्षकांचा अंदाज आहे. १९७१ साल निसटले पुढच्या वर्षी तरी हा पक्ष या प्रश्नास धैर्याने सामोरा जाईल अशी अपेक्षा आहे.

गेल्या वर्षी आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण घटनेने महाराष्ट्र सर्व देशात-नव्हे-जगात गाजला हे सांगायलाच हवे. ही अभूतपूर्व गोष्ट म्हणजे समाजवादाची शपथ घेतलेल्या महाराष्ट्र काँग्रेसचे एक निष्ठावंत सेवक श्री. शंकरराव मोहिते यांनी आपल्या मुलांच्या विवाहा प्रीत्यर्थ आपल्या अकलूज गावी घातलेले लक्षभोजन. श्री. मोहिते यांच्या या महान कार्याचा गौरव करण्यासाठी कडव्या समाजवादाच्या ज्वाळा तोंडावाटे ओकणाऱ्या सोशालिस्ट फोरमने त्यांना आपल्या जाहीर व्यासपीठावर बोलावून घेतले, हे या ठिकाणी सांगावयास नकोच. ◻ ◻ ◻

# आधुनिक कणाद गेला !

विजय वैद्य

**डॉ.** विक्रम साराभाई यांचे आज निधन झाले. मध्यरात्री, थुंबा येथील इले-क्ट्रॉनिक्स विभागाचे प्रमुख श्री. बी. रामकृष्णराव व श्री. ए. आर् ठाकूर यांच्याबरोबर त्यांनी थुंबा अग्निबाण प्रक्षेपण केंद्राच्या विकासाच्या काही योजनां-विषयी महत्त्वाची चर्चा केली आणि शेवटा " ओ. के. गो अहेड ! "चा 'ग्रीन सिग्नल' त्यांना दिला. 'गुडनाईट' म्हणून त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचा निरोप घेतला तेव्हा बारा केव्हाच वाजून गले होते.

त्यानंतर हा आधुनिक 'कणाद' झोपी गेला. प्राचीन भारतातील विख्यात अणु-शास्त्रज्ञ कणाद याने अगदी मरेपर्यंत या शास्त्रचा ध्यास घेतला होता आणि पीलवः पीलवः पीलवः ! (अणू अणू अणू) म्हणतच त्याने प्राण सोडला. डॉ. साराभाई यांनीही बहुतेक अणू अणू अणू ! म्हणतच शेवटचा श्वास घेतला असेल.

सतत कार्यरत असणे हा डॉक्टरांचा स्वभावच होता. गेल्या वर्षी एका अमेरिकन विद्यार्थिनी समवेत मी त्यांचा मुलगा कार्तिकेय याला भेटायला गेलो होतो. कार्तिकेय हा त्या विद्यार्थिनीचा सहाध्यायी. सध्या अमेरिकेत पीएच्. डी. करतोय. गेल्या वर्षी पीएच्. डीच्या फील्ड वर्कसाठी भारतात आला होता. आम्ही डॉक्टर-साहेबांची चौकशी केली. 'ते नेहमीच कामात दंग असतात. रोजचेच दौरे चालू असतात. उद्या सकाळच्या विमानाने ते हैद्राबादला जात आहेत. तेथूनच संध्याकाळी ते दिल्लीला जातील.' त्याने सांगितले. काम करीत असताना त्यांनी आपल्या प्रकृतीचीही काळजी केली नाही हे दाखवायला त्यांच्या प्रवासाचे वरील उदाहरण पुरे आहे. अलीकडेच त्यांच्या डॉक्टरने त्यांच्या वाढलेल्या रक्तदाबाची त्यांना जाणीव करून दिली आणि मीठ सोडायला सांगितले. त्यांनी मीठ सोडले. रक्तदाब वाढत होता पण कामाचा दाब कमी करायला ते तयार नव्हते.

२४ जानेवारी १९६६ या दिवशी 'माऊंट ब्लॉक' या आल्प्स् पर्वतराजीत 'एअर इंडिया'चे 'कांचनगंगा' हे विमान कोसळले आणि त्यात जगविख्यात अणु-शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांचे निधन झाले. भारताची अणुतंत्रविद्या पोरकी झाली

असे त्यावेळी वाटले. डॉ. भाभांच्या मृत्यूने देशाची अपार हानी झाली खरी पण अणुशक्ती तेथेच थांबली नाही. मार्गाक्रमण करीत राहिली. अर्थातच याचे बरेच श्रेय भाभांनांच आहे. कारण तरुण अणूशास्त्रज्ञांना मुबलक सवलती देऊन त्यांनी अशा तरुण अणूशास्त्रज्ञांचा एक फार मोठा संचय तयार केला. याचा परिणाम म्हणजे यापुढील आपली प्रगती कोणत्याही कारणाकरिता थांबणार नाही. डॉ. विक्रम साराभाई हे तसेच तरुण अणुशास्त्रज्ञ. १९६६ च्या मे मध्ये डॉ. भाभांचा वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. डॉ. भाभांनी या देशाला अणूयुगात आणून सोडले तर डॉ. साराभाई यांनी एक पाऊल पुढे टाकून भारताला अवकाशयुगात नेले. जगातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या देशांपैकी भारत, चीन, संयुक्त अरब प्रजासत्ताक (तसेच इस्रायल हा आपल्या मानाने विकसित व पूर्ण विकसित जपान) या देशात अणुक्षेत्रांत खूप प्रगती झाली आहे. चीनने तर अण्वस्त्रे बनवली आहेतच. जपान, भारत, इस्रायल ही राष्ट्रे ती आता अत्यल्प काळात बनवू शकतात. हे सारे आपल्या देशात घडू शकले ते डॉ. भाभा, डॉ. साराभाई व त्यांच्यासारख्या इतर अनेक वृद्ध, तरुण अशा निष्ठावान संशोधक शास्त्रज्ञांमुळेच. डॉ. साराभाई हे नुसतेच प्रथम दर्जाचे संशोधक होते असे नव्हे तर एक उत्कृष्ट व्यवस्थापकही होते. प्रत्येक अव्वल दर्जाचा शास्त्रज्ञ चांगले व्यवस्थापन करू शकतोच असे नाही, पण डॉ. विक्रम एका उद्योगपतिच्या घरात जन्मलेले. त्यामुळे उत्तम व्यवस्थापन त्यांना जन्मजातच प्राप्त झाले. अमेरिकन अंतराळ याने 'हूस्टन' या अवकाशयानांच्या तळावरून सोडली जातात. भविष्य काळात असे प्रयोग जेथून केले जातील असे भारताचे 'हूस्टन' असलेल्या केरळ किनाऱ्यावरील 'थुंबा अग्निबाण प्रक्षेपण केंद्रा'ची उभारणी डॉक्टरांच्या पुढाकारानेच झाली. शांततेसाठी अणूशक्तीचा वापर यावर त्यांची निष्ठा व भूमिका. भारतातर्फे त्यांनी संयुक्तराष्ट्राच्या अशा प्रकारचे प्रयत्न करू पाहणाऱ्या परिषदांमध्ये जोरदारपणे मांडली.

अणूशक्ती विकासाच्या त्यांच्या कार्यक्रमाला नियोजन मंडळाने कात्री लावताच त्यांनी अशा विकासाची देशाला कशी आवश्यकता आहे ते पटवून दिले. वेळी प्रसंगी, मंडळाला ठणकावून सांगितले की हा प्रांत संशोधकांचा असून मंडळाने यात ढवळाढवळ करू नये. वैज्ञानिकांनाही मंडळात स्थान याच कारणासाठी असले पाहिजे हेही त्यांनी प्रकर्षाने मांडले.

शांतताकार्यासाठी अणूशक्तीचा वापर करण्याकरिता वेळी प्रसंगी भारत अणुस्फोटही करील असे त्यांनी गेल्या वर्षी मुंबईत सांगितले त्यामुळे सर्वच देशवासीयांना या क्षेत्रातील आपल्या प्रगतीबद्दल आणि आता वेळ आलीच तर आपला देश तात्काळ अण्वस्त्रे बनवू शकेल याबद्दल दिलासा मिळाला.

डॉ. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी अहमदाबाद येथे

झाला. मुंबई आणि केंब्रिज विद्यापीठात त्यांचे उच्च शिक्षण झाले. १९३९ ते ४५ या काळात ते प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन यांच्या 'इंडियन इंस्टिटयूट ऑफ सायन्स' या संस्थेत रिसर्च स्कॉलर म्हणून काम पाहात होते. त्यानंतर अहमदाबादच्या 'फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी' येथे प्राध्यापक झाले व १९६५ साली त्या संस्थेचे संचालकही झाले. १९६६ च्या मे मध्ये त्यांची भारतीय अणुशक्ती मंडळाचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. त्यावेळी भारताने अण्वस्त्रे बनवावीत का नाही हा एक वादग्रस्त प्रश्न जोरात चर्चिला जात होता. त्यांनी उभारलेल्या थुंबा, विषुववृत्तीय अग्निबाण प्रक्षेपण केंद्राला संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिली. अहमदाबाद येथील 'प्रायोगिक दळणवळण कृत्रिम उपग्रह केंद्र उभारण्यातही त्यांनी महत्वाची कामगिरी बजावली. काश्मीरातील गुलमर्ग, तामिळनाडूतील कोडाईकनाल आणि दक्षिण अमेरिकेतील बोलिव्हिया या देशातील चकलतया येथील 'अस्ट्रोफिजिकल रिसर्च सेंटर्स'द्वारा त्यांनी 'वैश्विक किरणां'चा मोलाचा अभ्यास केला. संयुक्त राष्ट्रांच्या निरनिराळे अहवाल तयार करणाऱ्या समित्यांवर त्यांची नेमणूक झाली होती. असा बहुमान क्वचितच मिळतो. बाह्य अंतरिक्ष संशोधनाचा शांतता कार्यासाठी उपयोग कसा करता येईल याचा अहवाल संयुक्त राष्ट्र संघासाठी तयार करणाऱ्या समितीचे तर ते अध्यक्षच होते.

१९७० साली सप्टेंबरमध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय अणुशक्ती मंडळाच्या महासभेचे अध्यक्षपदही त्यांच्याकडे होते.

१९६२ साली त्यांच्या संशोधनकार्याबद्दल डॉ. शांतिस्वरूप भाटनगर पारितोषिक त्यांना अर्पण करण्यात आले. ६६ साली त्यांना पद्मभूषण हा किताब बहाल करण्यात आला.

स्वतःच्या सहकाऱ्यांवर पूर्ण विश्वास टाकून त्यांच्यावर महत्वाची जबाबदारी टाकण्याचा विरळा गुण डॉ. भाभांप्रमाणेच त्यांच्यातही होता. गतीची त्यांना अतिशय आवड. वेगाने मोटर हाकणे त्यांना खूप प्यार होते.

पदार्थविज्ञान आणि अणुशास्त्रासारख्या तथाकथित रूक्ष विषयांत रमणाऱ्या या शास्त्रज्ञाचे मन कलासक्त होते आणि म्हणूनच ते मृणालिनीसारख्या विख्यात नर्तिकेवर जडले. त्यांच्या व्यापातूनही वेळ काढून ते काही वेळा पत्नीच्या कलानैपुण्याचा आस्वाद घेण्यास सभागृहात हजर राहात असत. त्यांची मुलगी मल्लिका हीसुद्धा एक चांगली अभिनेत्री असून 'सोनाल' या आगामी हिन्दी चित्रपटात ती महत्वाची भूमिका करीत आहे. त्यांचा मुलगा कार्तिकेय हा समाजशास्त्रात पारंगत असून सध्या याच विषयावर संशोधन करतो आहे.

ते जेव्हा संशोधनात गर्क असत तेव्हाचा त्यांचा आनंद अवर्णनीय असा असे. डॉ. भाभांप्रमाणेच निसर्ग सान्निध्यातही ते रमत असत. त्यांनी आपला वैश्विक किरणांवरील प्रबंध काश्मीरमध्ये पूर्ण केला. असा हा निसर्गवेडा अणुशास्त्रज्ञ,

सोनेरी वाळू असलेल्या, शांत, नितांत, रम्य कोवळमच्या किनाऱ्यावर चिरनिद्रिस्त झाला हा एक योगायोगच.

भारताला जगाच्या अंतरिक्ष विकासाच्या नकाशावर स्थान प्राप्त करून देण्याची त्यांनी स्वप्ने पाहिली. चिरनिद्रेतही त्यांनी हीच स्वप्ने रंगवली असतील. थुंबा अग्निबाण प्रक्षेपण केंद्राचे त्यांचे स्वप्न साकार झाले; त्याच्या जवळपासच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. त्यांचा अमर आत्मा बहुधा थुंबाच्या तळावरूनच अंतराळ संचार करता झाला असेल...वैश्विक किरणे आणि अज्ञाताचा, अनंतात मागोवा घेण्यासाठी... ◻

## सहावे मराठी विज्ञान संमेलन

---

प्राचीन भारत अतिशय पुढारलेला होता असे इतिहास आपल्याला सांगतो. सामवेदाने संगीताला जन्म दिला. तशीच इतरही अनेक शास्त्रे उदयाला आली. प्रगल्भ पावली. त्यावेळची आपली विज्ञान प्रगतीही अफाट असावी हे त्यावेळच्या युद्धातील निरनिराळ्या अस्त्रांच्या उल्लेखावरून व इतर अशाच उल्लेखांवरून आढळते. पण त्यानंतर मात्र मागास असलेले युरोप खंड पुढे येत होते.

आधुनिक विज्ञानाचा जन्म झाला. या संबंधीचे ज्ञान आपण आता परकीय भाषांतून किती वाचणार. ते देशी भाषांतूनही येणे आवश्यक आहे. समाज विज्ञाननिष्ठ होणे आवश्यक आहे आणि याच हेतूने मराठी विज्ञान परिषदेची स्थापना झाली.

या परिषदेचे सहावे संमेलन २५ ते २७ डिसेंबरपर्यंत मुंबईत भरले होते. निरनिराळ्या विषयांवर परिसंवाद, तज्ज्ञांची व्याख्याने, औद्योगिक केंद्रांना भेटी आणि एक छानदार नाट्यप्रयोग हे यावेळच्या समेलनाचे आगळे वैशिष्ट्य.

केंद्रीय कायदामंत्री श्री. ह. रा. गोखले यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. तर संमेलनाध्यक्ष होते सुप्रसिद्ध वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. त्र्यं. शं. महाबळे.

केंद्रीय कायदेमंत्री हे कायदेतज्ज्ञ असल्याने कायदा या विषयावर बरेच काही बोलले पण थोडेफार विज्ञानावरही बोलले.

विज्ञान हे समाजाच्या प्रगतीचे साधन असून खरीखरी लोकशाही निर्माण होण्यासाठी विज्ञान साहाय्यभूत झाले आहे. चित्रपट, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, वृत्तपत्रे, वाहतुकीची साधने या विज्ञानाच्या देणगीद्वाराच लोकमत निर्माण करता येते व समजावून घेता येते व म्हणूनच साधने नसती तर लोकशाही ही केवळ मूठभर लोकप्रतिनिधींचे राज्य ठरले असते असे मुद्दे त्यांनी मांडले.

जागरूक व सुजाण लोक हीच खरी सामाजिक वा वैज्ञानिक विकासाची गुरु-किल्ली असून वैज्ञानिकांनी समाजाभिमुख व्हायला पाहिजे. समाजाच्या गरजा ओळखण्यासाठी चिंतन, संशोधन करण्यासाठी हे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. वैज्ञानिक हा समाजाच्या ऋणात असतो म्हणूनच केवळ वैयक्तिक लाभ, नफा हा विचार बाजूला ठेवून त्याने समाजहिताची आकांक्षा बाळगून संशोधन करावे, तर समाजानेही वैज्ञानिकांच्या सुखसोयींकडे लक्ष देऊन त्यांना मानाचे स्थान मिळवून द्यायला पाहिजे असेही त्यांनी प्रतिपादन केले.

संमेलनाचे अध्यक्ष म्हणून करायच्या भाषणासाठी डॉ. महाबळे यांनी महत्त्वाचा विषय निवडला होता. विषय होता 'वैज्ञानिक संशोधन व महाराष्ट्राचा विकास'. त्यांच्या भाषणातील अनेक महत्त्वाचे मुद्दे सारांशाने पुढीलप्रमाणे–

जगातील निरनिराळ्या भाषांत, शास्त्र, यंत्र व तंत्रविद्या वगैरे अनेक वैज्ञानिक विषयांवर अनेक ग्रंथ आहेत व यावर मराठीत किती ग्रंथ आहेत, असा सवाल करूनच यात आपण बरेच मागे असल्याची तळमळ त्यांनी बोलून दाखविली. मराठीच्या इतर भाषाभगिनींतील वाङ्मयाचे भाषांतर व मराठीचे त्याच भाषांत भाषांतरही फारच थोडे झाले आहे. तेव्हा यावर भर देणे आवश्यक आहे. लोकांची मने नव्या युगप्रेरणांनी व समस्यांच्या विचारांनी भारलेली हवीत व त्याचे प्रतिबिंब मराठी वाङ्मयात पडावयास हवे. या दृष्टीने मराठी भाषिकांना मोठी संधी आहे असे त्यांनी सांगितले.

संशोधन, उद्योगधंदे व खेडी यावर विचार मांडताना ते म्हणाले, की अजूनही भारतात कृषी हाच मुख्य उद्योग आहे. ६० ते ७० टक्के लोक त्यावर अवलंबून आहेत. अमेरिकेत सुमारे ७ टक्के लोक राष्ट्रास पुरून दुसऱ्यास देता येईल इतके धान्य पिकवतात. आपली परिस्थिती सुधारत असली तरी फार मंद आहे. शिवाय बरेच उद्योगधंदे हे मोठ्या शहरांच्या जवळपासच निघत असल्याने खेड्यातील व शहरातील जीवन यात मोठी तफावत दिसते. जोपर्यंत खेड्यात उद्योगधंदे, आधुनिक जीवनास लागणाऱ्या कमीत कमी सुखसोयी वगैरे मिळत नाही, तोपर्यंत खेड्यातून शहराकडे येणारा प्रवाह थांबविणे शक्य होणार नाही. तेव्हा शहरे व खेडी यांचा समतोल विकास होण्यासाठी परस्परावलंबी योजना आखाव्या लागतील. महाराष्ट्रात असे चित्र दिसत नाही. पंजाब, हरियाना, गुजरातमध्ये हा समतोल साधण्याचे यशस्वी प्रयोग झाले आहेत. तेथील प्रयोगशील व कष्टाळू शेतकरी अधिक धान्य पिकवतो म्हणूनच पंजाबातील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न अधिक आहे.

त्यांनी संशोधनाची नितांत आवश्यकताही प्रतिपादन केली.

संशोधन हे अखंड व्रत आहे. ती एक निष्ठा आहे. विज्ञानात रमलेल्या व्यक्तींच्या मौलिक कार्यावर ते अवलंबून असते. निव्वळ चार पुस्तके व पदवी मिळवून ते होत नाही. त्यासाठी संशोधनास कायम वाहिलेल्या व्यक्तींची गरज असते.

खार जमिनीच्या प्रश्नावरही त्यांनी काही विचार मांडले. महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील हा महत्त्वाचा प्रश्न. येथे ४० हजार हेक्टर जमीन खारी आहे. या जमिनीच्या बंदिस्तीकडे सरकारचे लक्ष गेले आहे ही चांगली गोष्ट आहे. पण या जमिनीची धूप न होण्यासाठी तजवीज केली पाहिजे. तेथे यशस्वी लागवड होणे आवश्यक आहे. हॉलंडसारख्या छोटया देशाने यावर मौलिक संशोधन केले आहे त्याचे स्वागत करून ह्या उपाययोजनांचा अभ्यास व स्वीकार केला पाहिजे.

पश्चिम महाराष्ट्राला घाटमाथ्याचे वरदान आहे. तेथील भूप्रदेशाची मांडणी, हवामन निरनिराळ्या वनस्पतींना उपयुक्त आहे. परदेशींनी येथे काजू, चिकू, कोकमसारख्या झाडांची यशस्वी लागवड केली पण आपण त्यांची हेळसांड केली हे चांगले नाही.

त्यांनी इतरही काही मुद्दे मांडले. त्यांचे विचार निश्चितच चिंतनीय आहेत.

याच संमेलनाच्या निमित्ताने T. I. F. R. व मुंबई महानगरपालिका यांच्या वतीने गेल्या वर्षीपासून सुरू झालेल्या एका योजनेसंबंधी प्रदर्शन भरले होते. प्राथमिक शाळेतच विद्यार्थ्यांना शास्त्र शिकवताना उपकरणे हाताळू देऊन त्याद्वारे त्यांचे शिक्षण करणारी ही महत्त्वाकांक्षी योजना. महानगरपालिकांच्या शाळांना यासाठी उपकरणांचे सेटस् देण्यात आले आहेत. असा प्रयोग खासच उपयुक्त व आवश्यक आहे हे ते प्रदर्शन पाहिल्यावर पटले. स्वतंत्रपणे लिहिण्यासारखा हा विषय आहे.

श्री. बी. जी. शिर्के यांनी 'स्वस्त घरबांधणी' या परिसंवादात अशा काही महत्त्वाच्या योजनांची Slides सह प्रात्यक्षिके दाखवून परिसंवाद रंगविला.

एकूण काय, दर वर्षी होणारे मराठी विज्ञान परिषदेचे संमेलन म्हणजे आता एक महत्त्वाचा भाग ठरून गेले आहे.

# भारतीय मुस्लीम आणि परकीय राज्यकर्ते

सेतु माधवराव पगडी यांची मुलाखत

**दादूमिया**

दादूमिया : पगडीसाहेब, बांगला देश तर निर्माण झाला. आता दोन समस्या इंदिरा गांधींना सतावीत असतील.

सेतु माधवराव पगडी : कोणच्या त्या दोन समस्या ?

दा. : पहिली आर्थिक जबाबदारीची. आता एक कोट निर्वासितांच्याऐवजी साडेसात कोटींची जबाबदारी आमच्या सरकारवर पडली आहे. आणि दुसरी जबाबदारी हिंदू व मुसलमान बंगाली लोकसंख्येच्या भावनात्मक एकात्मतेची.

से. : म्हणजे ?

दा. : काही ठिकाणी निर्वासितांत ९० टक्के हिंदू आहेत. त्यांना बांगला देशात सुरक्षितता वाटली तरच ते परत जातील, नाही का ?

से. : अर्थातच.

दा. : या बांगला देशातील, तसेच भारतातील हिंदू व मुस्लीम लोकसंख्येचे एकीकरण कसे होईल, ही समस्या मला फार बेचैन करते.'

'पुढे काय ?'

'म्हणून पु. ल. देशपांडयांना भेटलो. महाराष्ट्र टाईम्समध्ये त्यांनी वगचित्रे अत्यंत सुंदर रेखाटली आहेत. पण त्यात बंगाली हिंदू व मुस्लीम यांच्यातील भेद वा साम्य यांच्याविषयी काहीच त्यांनी लिहिले नाही. मी मुद्दाम पु. लं. ना त्याविषयी विचारले.'

'पु. लं. काय म्हणाले !'

'त्यांनी मला चार मुद्दे दिले. पहिला मुद्दा, संस्कृतीच्या क्षेत्रात जातीयवाद मळातूनच कमी आहे. हिंदू गवयास मुसलमान सारंगिया किंवा तबलजी चालू शकतो. बंगाली नाट्यात वा गाण्यात वा इतर साहित्यिक क्षेत्रात जातीयवाद औषधालाही नाही. दुसरा मुद्दा, पूर्व पाकिस्तानातील जातीयवाद मुख्यतः बिहारी मुसलमानांनी भडकाविला. आज बांगला देशात त्यांचे दिवस भरले आहेत. तिसरा मुद्दा, बंगाली पोषाखात मुसलमान व हिंदू हा फरक कळतच नाही. आणि चौथा मुद्दा बंगाली भाषेच्या जबरदस्त प्रभावामुळे मुसलमान लोकही यज्ञ, आहुती, मुक्तिवाहिनी वगैरे संपूर्णतः संस्कृत शब्द वापरतात—अगदी आमच्या पुणेरी सावरकरवादी संस्कृतनिष्ठांपेक्षाही त्यांची या संस्कृत शब्दांवरची निष्ठा जास्त खोल आहे.'

'वा, फार छान.'

'पु. ल. देशपांडे आता डाक्क्यात जाणार आहेत. पण त्यांची मुख्य दृष्टी सांस्कृतिक असल्यामुळे मी त्यांना राजकीय व ऐतिहासिक प्रश्न विचारून उगीच हैराण केले नाही.'

'अच्छा, म्हणजे ते प्रश्न आता तुम्ही मला विचारून मला हैराण करणार आहात तर?'

'हं, मला विशेषतः ऐतिहासिक दृष्ट्या भावनात्मक एकीकरणाविषयी जरा माहिती सांगाल काय?'

'म्हणजे काय? तुमचा प्रश्न स्पष्ट करा.'

'काल एक थोर प्रकाशक भेटले होते. त्यांनी मला एक मोठा मंत्र दिला. जे जे लिहाल त्यास भरभक्कम पुरावे द्या. त्याशिवाय मत पक्के होत नाही, ग्राह्य होत नाही. त्याच सूरात मी तुम्हाला सांगतो, की बांगला देशातील हिंदू व मुस्लीम यांची भावनात्मक एकात्मता नांदावी असा प्रयत्न झाल्यास तशा प्रकारचे प्रयत्न इतर काही देशांत झाले होते का—त्याचे परिणाम काय—ते सारे मला स्पष्ट केले तर मेहेरबानी होईल.'

'अच्छा, म्हणजे तुमचा रोख भावनात्मक ऐक्यावर आहे तर?'

'होय. अशी गरज भारताप्रमाणे इतर कोणच्या देशात भासली वा भासत आहे?'

'ज्या ज्या देशात बहुसंख्य आणि अल्पसंख्य असे भिन्न भिन्न धार्मिक गट आहेत तेथे भावनात्मक एकीकरणाची आवश्यकता वाटत असलीच पाहिजे. इतकेच नव्हे, तर एकाच धर्मातील भिन्न भिन्न पंथ अल्पसंख्यांक गणले जाण्याइतके महत्त्वाचे झाले आहेत.'

'उदाहरणार्थ?'

'भारतात मुसलमान १० टक्के आहेत. त्याउलट बांगला देशात १० टक्के हिंदू

पृष्ठ ५० वर

तमाम वाचकांना रुचकर लागेल असं चविष्ट लेखन करण्यासाठी आपल्या लेखणीचा जन्म नाही, हे त्यानं ओळखलं होतं. इष्टमित्रांच्या पुढ्यात झोळी पसरून तो त्या व्रताची धग भोगीतही होता. ही एक बाजू झाली. स्वतःच्या स्वतंत्र धाटणीचं धीट लेखन सतत करण्याशिवाय आपल्याला गत्यंतरच नाही, कारण आपलं लेखन हा आपल्या अनुभवांना फुटलेला आरस्पानी पान्हा आहे, अशी त्याची ठाम श्रद्धा होती. त्याचा हा पान्हा सदाचाच वाहाता होता. म्हणून, बंदिस्त कथानकाचा आगापिच्छा नसलेल्या अडीच हजार पानांच्या महाकादंबरीच प्रवाहित केलेलं बाड पुरं करायचं आणि नंतरच टाक वाळवीत

## शतपावली

# पुजारी

**रवींद्र पिंगे**

ठेवायचा. हे वादळ डोक्यात घोंघावत ठेवून तो झुरीचला आशेने आला. त्याचे खिसे रिकामे होते. झुरीचला तसे थोडेफार सर्वांचेच खिसे रिकामे होते. थोरल्या महायुद्धाचा डोंब उसळलेला होता. त्याची पाठ सतत थोपटणारा, त्याच्या पाऊलवाटेवरली पणती होणारा, श्रीमंत हौशी प्रकाशकांकडे त्याच्यावतीने सतत शब्द टाकणारा आणि ही सारी इमानी गस्त केवळ साहित्याच्याच सुकालासाठी घालणारा अगम्य कवी एझरा पाऊंड कसाबसा जगत होता. लेनिनही झुरीचलाच होता: तो तर बोलून चालून तडीपार झालेला क्रांतिकारक. त्याच्याकडे पैसे कुठून येणार? टरबूजासारखं टरारून फुगलेलं आपलं डोकं पेलवीत तो कॉफी ढोसायला एकट्यानेच यायचा नि जायचा. याचं नि त्याचं गोत्र जुळलं नाही. त्यातल्या त्यात फक्त झ्वाईगचीच काय ती चलती होती. त्याच्या पैशांवर यांचे डाळे कुरमुरे सुटत. बाकी सगळा आनंद होता. साहित्यप्रेमी

अमेरीकन धनिक कधी कधी मदती दाखल त्याच्या हातावर डॉलर्स ठेवीत. त्या भांडवलावर तो आला दिवस रेटीत होता; मैत्रिणीबरोबर थाटलेला संसार चालवीत होता. जिप्सीपण त्याच्या रक्तातच होतं. लेखनावर आपल्याला पैसे सुटत नाहीत ह्याची त्याने कधीही खंत बाळगली नाही. मित्रांचे खिसे रापावेत, हातउसनवारी करावी, सपाटून नशापाणी करावं, भटकावं आणि उरलेल्या वेळात एकटक लेखन करावं, याच्या व्यतिरिक्त साहित्यिकाने दुसरं काही करायचं असतं याची त्याला गंधवार्ताच नव्हती, लिहून लिहून हात दमला, की तो खाली रस्त्यावर फेऱ्या मारी. फिरून फिरून पाय दमले, की पुन्हा वर माडीवर जाऊन लेखनाला हात घाली.

अशीच एक फेरी मारीत असताना त्याला नाक्यावर ती दिसली.

सुहास्यवदना; कोमलांगना.

एका पायावर भार टाकून ऐटीत चालण्याची तिची ढबही त्याने टिपली. कोपऱ्यावरच्या एका घरात ती वळली हेही त्याने टिपलं. मग नाक्यावर तो रोज पहारा करू लागला.

ती सुहास्यवदना, कोमलांगना, एका पायावर-भार टाकीत रेटीत येताजातांना त्याला रोज दिसे. त्याचं भान हरपून जाई. ती ज्यू वंशातलीच असावी अशी त्याने अटकळ बांधली. ज्यू पुरंध्रीच्या बाहुपाशांची ऊब अनुभविण्याची फार दिसांची आपली मनिषा तृप्त करण्यासाठीच नियतीने तिला आपल्या सामोरी आणलं आहे याविषयी त्याच्या मनात शंकाच उरली नाही. एकदा घरात वळता वळता तिने त्याच्याकडे एक छचोर कटाक्षही टाकला. ते त्याने नियतीचे आमंत्रण मानले. धावत धावत तो आपल्या माडीवर गेला. Exiles या त्याच्या नाटकाच्या जर्मन भाषांतराची प्रत काढली. त्यावर सप्रेम भेटीची ग्वाही नोंदवली. मग ती प्रत तिच्या दारावरल्या पत्राच्या पेटीत गुपचूप टाकून दिली. मांजराच्या पावलाने तो रस्त्यावर उतरला. समोरच्या नाक्यावर उभा राहून तिच्या घरावर डोळ्यात प्राण आणून पहारा करू लागला. थोडा वेळ गेल्यावर तिने पत्रांची पेटी उघडल्याचं त्याने पाहिलं. तिने ते सप्रेम भेटीदाखल आलेलं पुस्तक हातात घेतलं. तिने ते कुरवाळलं की काय ते अधू नजरेमुळे त्याला नीट दिसलं नाही. मग एकदम त्याला प्रकाशाची फुलं फुललेली दिसली कारण तिने दिवाणखान्यातला दिवा लावला आणि ते पुस्तक वाचण्यात ती गर्क झाली. हे सर्व तो पालवलेल्या नजरेने पलीकडच्या रस्त्यावरून कृतार्थ होत होत पाहात होता.

नियती आपल्याशी हुंकाराचंच हास्तांदोलन करीत आहे हे गणित मांडून तो पुन्हा धावत धावत वर माडीवर गेला. त्याने तिला चिठ्ठी लिहिली,

' प्रियवदना, तुमची ओळख करून घेण्याची मला तहान लागली आहे. तुम्ही ज्यू आहात हे मी पक्कं ओळखलं आहे. मात्र यदाकदाचित तुम्ही ज्यू नसाल, तर मी तुम्हाला ज्यू म्हटलं म्हणून रागावू नका. कारण, एका ज्यू स्त्रीच्या पोटीच

भगवान येशू गर्भवास भोगीत होता, हे ऐतिहासिक सत्य [आहे. असो. आपण भेटायचं ना ? आपला लोभी, जेम्स जॉईस.'

तिचा होकार लाभला.

चोरटी भेट ठरली.

'तुमचं नाव काय ?'

'मार्थी.'

'इथ काय करता ?'

'कथा-कादंबऱ्या वाचते. ऐषआराम भोगते. पिते.'

'पण पोटापाण्याचं काय ?'

'माझे एक शेठ आहेत.'

'च्यामारी !'

'म्हणजे मी त्यापैकी आहे असं नाही. उच्च कुळात माझा जन्म झालेला आहे. मी ज्यू नाही. माझं लग्नही ठरलं होतं. पण इतक्यात यांची अचानक गाठ पडली. मी लष्कराची कवाईत बघायला मैदानावर गेले होते. तिथे हे घोडेस्वार होऊन समोर आले. मला त्यांनी रुबाबात फुलं दिली. मी ते विसरून गेले. पुन्हा पुढल्या वर्षी, म्हणजे बरोबर एका वर्षाने पुन्हा लष्कराची कवाईत निघाली. मी बघायला गेले, तर पुन्हा आपले हे घोडेस्वार होऊन समोर दत्त म्हणून हजर ! पुन्हा यांनी मला रुबाबात फुलं दिली. हा साधा योगायोग नव्हता. नियतीच गोफ विणत होती. माझं ठरलेलं लग्न मी मोडलं आणि यांच्या शेजारी राहायला म्हणून गेले. मग काही दिवस त्यांच्याच घरात राह्यले. आता घरातून बाहेर पडले आहे. स्वतंत्रच राहाते. घरखर्च तेच चालवतात.'

'त्यांच्याशी सरळ लग्न का केलं नाही ?'

'कारण त्यांचं लग्न अगोदरच झालेलं होतं.'

'होय ना ? मग तू आता वेगळं बिऱ्हाड केलं आहेस हेच रीतसर आहे.'

'रीतबीत मी जाणत नाही. त्यांचा लग्नाचा संसार आहे. त्या संसारात त्यांच्या आणखी तीन ठेवलेल्या बाया आहेत. मी चौथी होत्ये.'

'अगं, तीन तिथे चार ! तू निष्कारणी घर बदललंस. खर्च कशाला वाढवलास नाहक ?'

'कारण तिथे रहाणं मला शारीरिक त्रासाचं होई. तें फारच दांडगे निघाले.'

'मग उरलेल्या त्या तिघींचं प्रभु रक्षण करो ! तू आपली स्वतंत्रच रहा कशी. मी सोबतीला येत जाईन अधूनमधून.'

'ते पुढचं पुढे पाहू. आता तुम्ही तुमची ओळख करून द्या.'

'मी लिहिलेला प्रत्येक शब्द, प्रत्येक ओळ, प्रत्येक पान, प्रत्येक पुस्तक, हे माझं

पृष्ठ ५५ वर

नलिनी अंबाडे

# 'हॅलो, कंट्रोल....!'

स्थळ : मिनम्बाक्कम् – मद्रासचा विमानतळ.

वेळ : सोमवार दि. २९ नोव्हेंबर १९७१–पहाटेचे पावणेसहा.

मद्रासहून त्रिवेंद्रमला जाणारे, इंडियन एअर-लाइन्सचे, एच. एस्. ७४८ अॅव्हरो विमान, रनवेवर तयार होतं. प्रवासी मंडळी तेथेच कॅरीडॉरमध्ये सकाळचा ताजा 'हिंदू' पेपर वाचीत होती. कुणी रेस्टॉरंटमध्ये गरम गरम कॉफी घेत होते. 'लोकल–ट्रिप'मुळे विमानतळावर निरोप द्यायला आलेल्यांची गर्दी नव्हतीच. कस्टमचीही भानगड तशी नसतेच म्हणा. एवढ्यात स्पीकरवरून आवाज आला. अनौन्सरने गोड आवाजात प्रवाशांना आपापल्या जागेवर विमानात बसून घेण्यास सांगितले. शेवटी आभारही मानले. ते आभार ऐकून घेण्याबद्दल की बसून घेण्याबद्दल, ते तिचे तीच जाणो.

ठीक सहाला विमानाचे पंखे चालू झाले आणि नंतर केवळ पाचच मिनिटांनी त्याने आकाशात झेप घेतली. पायलटने वर जाताच, खाली विमानतळाशी संपर्क जोडला–

'हॅलो, कंट्रोल...कंट्रोल...' धिसीज आयसी फ्लाईट फाईव्ह ओ वन्.

'सब ठीक ?'

'येस. सब ठीक.'

आता, अॅव्हरो विमानाने वेग घेतला. सूर्योदयाची कोवळी किरणे काचांवर दिसू लागली. पांढऱ्या शुभ्र धुक्याची जाड दुलई पांघरून मद्रास शहर अद्यापही साखरझोपेत होते. एकेका प्रवाशाने आपापले कामाचे कागद काढले. ज्यांना काम नव्हते ते 'पेरिमॅसन' वाचू लागले. मदुरेस काहीजण उतरले. नव्या आलेल्यांपैकी एकाची जुन्याशी ओळख निघाली. गुडमॉर्निंग शेकहॅण्ड हे उपचार संपताच:–

'एन्ना समाचारम् सारे ?'

'ओन्नुम्मिल्लै ! सेम ह्यायाज अल्टिमेटम्. दहा दिवसांत कधीही वॉर सुरू करीन म्हणतोय ना ?'

'ते गुरकावणं नुस्तं. त्याला कोण दाद देतंय ?'

'——' दुसरी व्यक्ती फक्त हसली.

'का ? तुम्हाला शंका वाटते ?'

'तसं काही नाही, पण अदं यल्ला सोल्लमुडियाद प्पा.' जरासं आठवल्यासारखं करून तोच पुढे म्हणाला, 'कुठलातरी हिंदी पिक्चर मागं बघितला होता. मी. त्यातील एक गाणं मला आठवतं अजून. सारी बस्ती जल जाती है, मुठ्ठीभर अंगारोंसे, सम्हलके रहना अपने घरमे घुसे हुवे गद्दारोंसे' अर्थ ठाऊक आहे ?' तो त्याला अर्धवट तमीळ थोडसं इंग्लिशमध्ये समजावून देवू लागला. त्यांच्या पाठीमागे बसलेल्या कुणा कलकत्तेवाल्या बोंगाली बाबूस जणू ते एकदम पटले. तो पाठच थोपटणार होता. पण ओळख नाही. शिवाय मॅनर्स आडव्या येतात ना. त्या दुसऱ्याला जांभाया येवू लागल्या. घड्याळ पाहात तो म्हणाला,

'नऊ वाजत आले. त्रिवेंद्रमलाच उतरायचंय ना तुम्हाला ?'

'अरे, खरंच की ! आपण लेट नाही तर !'

होय, विमान बरोब्बर नवाला त्रिवेंद्रमच्या नजीक येताच, पायलटने खाली विमानतळाशी बोलणे जोडले देखील...

'हॅलो कंट्रोल...? त्रिवेंद्रम ?...धिसीज आयसी फाईव्ह ओ वन् व्हाया मदूरै... आम्ही उत्तरायचं का ?'

नेहमीप्रमाणे 'होय' उत्तर येणार समजून, पायलट विचार करू लागला, की आता किती उंची कमी करावी ? तेवढ्यातच दुसऱ्यांदा त्याने तोच प्रश्न विचारला, तशी खालून उत्तर बिनतारी रेडियोने आणले.

'नको. प्लीज उतरू नका.'

वैमानिक चरकलाच. स्वत:ला सावरले अन् सोबतच्या विमानालाही. एव्हाना तो त्रिवेंद्रम विमानतळाच्या बरोब्बर वर येऊन पोहोचलाही होता. आता क्लिअरन्स मिळेपर्यंत तेथेच घिरट्या घालण्याशिवाय मार्ग नव्हता. त्याने दुर्बिणीतून सहज खाली नजर टाकली. आपण विमानतळावर आहोत, की चौपाटीवरच्या कसल्या सभेत आहोत अशी त्याला शंका आली. पण अशा सकाळी कसली सभा ? शिवाय त्याच्या विमानात कुणीही व्हीआयपी देखील नव्हता, की ज्याच्या स्वागतास असे लोक जमावेत. समजा जमले तरी ते एअरपोर्ट इमारतीबाहेर. रनवेवर जाण्याचीही परवानगी नसते. त्याने पुन्हा तळाला उतरण्याबद्दल विचारले...पण उत्तर नाही. एव्हाना त्रिवेंद्रमवरून चार घिरट्या पूर्ण झाल्या होत्या. इतरांच्या कुणाच्या ध्यानात जरी आलेले नसले तरी एअर-होस्टेसच्या लक्षात आलेच ते. पायलटच्या केबीनमध्ये ती डोकावलीच.

'व्हॉटस् मॅटर ? नो लँडिंग ?'

पायलटने खुणेनेच तिला खाली पहाण्यास सांगितले. एव्हाना सारे प्रवासीही आपापल्या खिडक्यांच्या काचांना नाके घासू लागले होते. विमानतळाच्या रनवेवर

प्रचंड जनसमुदाय होता. आकाशाकडे बघून ते हातवारे करीत होते. घोषणाही देत असावेत. इकडे तिकडे धावल्यामुळे पाण्याप्रमाणे जनसमुदाय हेलकावत होता. प्रवासी एकमेकांनाच 'काय काय ?' असे विचारू लागले. मग काहींनी एअरहोस्टेस-कडे पाहिलं. तशी ती केबीनमध्ये डोकावली. पायलट अद्यापही रेडियोवरच धडपडत होता.

'हॅलो कंट्रोल. धिसीज आयसी फाईव्ह ओ वन. मी उतरू की नको ? किती घिरट्या घालायच्या ?'

'खालून आवाज आला, 'इथे उतरू नका.'

'मग कुठे जाऊ ?'

'कोचीनला जा. तेथे पुढील सूचनांची वाट पहा. ओव्हर, '–खालचे ट्रान्समिशन बंद झाले.

...आणि विमानाच्या सुकाणूने दिशा बदलली. ठीक ९·२० ला ते पुनश्च अंतराळातून कोचीनकडे धावू लागले. आतापर्यंत सारे प्रवासी हवालदिल झाले होते. विमानतळापासून दूर जात असल्याचे त्यांना दिसू लागताच, त्यांनी एकदम गिल्ला केला. पुन्हा कोचीनमधून खाली पाहू लागले. जमीनीवरचा आवाज ऐकू येणे शक्य नव्हते म्हणून बरे, नाहीतर विमान न उतरता परत फिरताच, झालेल्या प्रचंड घोषणांनी त्यांच्या कानाचे पडदे फाटले असते. एवढ्यात एअर होस्टेस, दोन्ही हातांचे गोरे तळवे हवेत उंच दाखवीत म्हणाली–

'जंटलमेन, लिसन प्लीज. घाबरू नका. सगळं काही ठाक ठीक आहे. आपण साडेदहाला कोचीनला जाऊन पोहोचू. तेथे खुलासा होईल.'

प्रत्येकजण तर्क लढवू लागला – एकमेकास सांगू लागला व दुसऱ्यास खोडून काढू लागला. पाकिस्तानने विमानतळावर बॉम्ब तर नाही टाकले ? पण ते तिकडे उत्तरेत न् बांगला देशात. इकडे दुसऱ्या टोकाला त्रिवेंद्रमला कशाला. कुणाचीच बुद्धी चालेना, अन् कोचीनला पोचल्यावर, त्यांच्याप्रमाणेच आणखीही काही विमाने अशीच वळवून आणलेली पहाताच सारे अधिकच घाबरले. जरूर काहीतरी चाचेगिरीचा प्रकार आहे असं प्रत्येकाला वाटलं.

इतक्यात त्या मघाच्या बंगाली बाबूस, कोचीनच्या विमानतळावर आणखीन एक पायलट दिसला. तशी तो धावतच तिकडे गेला– 'की मोशाय ? किमोन आछेन ? आमाके चिंते पेरेछो ?' (मला ओळखले का ?)

तो दुसरा पायलट क्षणभर थांबला. ओळख पटली.

'ओहो, तो मी मद्रासेर चक्रोबोर्ती ?'

झाले ! दोघांची ओळख पटताच, एकाने हळूच विचाले, 'ए, काय भानगड आहे ? आम्हाला इकडे कशाला आणलंय ?'

'तुमचे कुणी पेपरचे रिपोर्टर दोस्त नाहीत ना ?'

'ना बाबा, ना.'

इकडे तिकडे पाहात हळूच तो सांगू लागला, ' तिथे एअरपोर्टाच्या हद्दीत काही लोकांना एक उंच इमारत बांधायची आहे. इमारत म्हणजे...आय् मीन् प्रार्थना-स्थान. तुम्हाला ठाऊकच असेल, एअरपोर्टाच्या हद्दीत इमारती बांधण्यास परवानगी नसते. मिळाली तरी ती बुटक्या इमारतींनाच अन् रनवेपासून दूरवरच मिळते. अर्थात जगात सर्वत्रच म्हणा ! '

' हो ! हो ! आमच्या मद्रासच्या मीनम्बाक्कमजवळ ते टेकडीवर कोणतं तरी चर्च आहे ना...फार प्राचीन जुनं आहे...पण आत्तापर्यंत दोनदा त्याचे टॉवर कमी केलेत...जंबोजेटसाठी पुन्हा करणार आहेत म्हणे. '


' ते लोक ब्रॉड-माईंडेड म्हणायचे. या इथे लोकांना त्यांचे प्रार्थना मंदीर ठरा-विकच जागी, तिथेच हवे आहे, शिवाय त्याचा टॉवरही उंच आकाशात गेलेलाच हवाय अन् त्यावर मोठ्ठा चांदतारा हवाय न् काही नाही.. काही नाही...' त्याने जीभ चावली अन् सावरून म्हणाला, ' बघू काय होते ते. इंदिरागांधीनाही तारा केल्यात म्हणे. '

दुसरा मोशाय काय समजायचे ते समजला. गुडबाय करीत आपल्या विमाना-कडे परतला. दुपारचे बारा वाजत आले होते. सारे प्रवासी कंटाळले होते–बेचैन होते – कॉफी पिऊन भुकेले होते. सिगरेटी पेटवून झुरके घेण्यामुळे वातावरण कुंद झाले होते. त्रिवेंद्रमला कधी जाणार ते कुणालाही ठाऊक नव्हत. तो समोरच्या स्टॉलवर गेला आणि सिगरेटचे पाकीट घेतले. काडी ओढत सिगरेट शिलगावताना त्याचे लक्ष सहजच पाकीटाकडे गेले. त्या पिवळ्या ' चारमिनार 'कडे तो पाहातच राहिला.

तिकडे कंट्रोल-रुममध्ये वायरलेस ऑपरेटर, त्रिवेंद्रमशी बोलण्याची धडपड करीत होता. ' हॅलो, कंट्रोल ! हॅलो कंट्रोल. '

□ □ □






## भर पावसात

भर पावसात आता येऊ नकोस राणी
आषाढ-श्रावणाची गाऊ नकोस गाणी
झाले फितूर वारे, गेले रुसून तारे
धारांतल्या खुणांचे खुरटे निळे पिसारे
भरल्या सरोवरांना मागू नकोस पाणी
भर पावसात आता येऊ नकोस राणी
निर्ढावल्या नभाचा करती दिशा पुकारा
बदनाम जाहलेला बुडतो जळी किनारा
साऱ्या लुळ्या जिभांची होते बधीर वाणी
भर पावसात आता येऊ नकोस राणी
विद्युल्लतेस विळखा पडला असे ढगांचा
मुळका उभा तरी हा मग्रूर पर्वताचा
खोदून कोळश्याच्या नेशील काय खाणी ?
भर पावसात आता येऊ नकोस राणी

— यशवंत पारखी

मुसळधारांनी क्षितिज निसरडे झाले
जरा जपून पाय ठेव

कपारीत लपून किरवाणी गाणाऱ्या रातकिड्यांना
तुझे घुंगुरबांधले केशरतळवे दिसायला नकोत.
मेंदीरंगलें नख माझ्या घरट्याच्या वळचणीला
नीट खोचून ठेव.

एक शेवाळले गीत सोलून काढीन म्हणतो

पण,

ढगांत हरवलेले माझे पंखभर आकाश शोधायला
आज परत विसरशील काय...... ?

— यशवंत पारखी

## कथा

ओठांवरती व्यथेची कथा
अंतरात हा व्रणांचा जथा
विरुन गेल्या त्या माझ्या लहरी
मलाच हसतोय् आता माझाच माथा !

— प्रसाद पाठक

## आस्वाद

'भर पावसात' या कवितेत ही निसर्गात भिजलेली प्रणयधारा अधिक भावार्त बनलेली आहे. उत्कट व्यक्तिगत भावना आणि वेधक निसर्गदृश्य यांची एक दुपेड येथे गुंफलेली आहे. फितूर वारे, रुसलेले तारे यांसारखे उल्लेख या निसर्गदृश्यातील भावनिष्ठता स्पष्ट करतात; तर 'धारांतल्या खुणांचे खुरटे निळे पिसारे' काही गूढ अर्थ शब्ददृश्यांच्या प्रतिमानांतून व्यक्त करू पाहातात. 'निढावलेल्या नभाचा पुकारा दिशा करीत आहेत, बदनाम झालेला किनारा जळी बुडतो आहे, विद्युल्लतेस

ढगांचा विळखा पडलेला आहे, तरी मग्रूर पर्वतांचा सुळका तसाच उभा आहे.' हे निसर्गदृश्याचे वर्णन मोठे सूचक आहे. प्रणयाच्या धुंद अनुभवाचे विविध रंग त्यातल्या एकेक उल्लेखाने कुशलतेने टिपलेले आहेत. या निसर्गरूप भावप्रतिमा बनल्या आहेत.

यशवंत पारखी यांच्या बिनशीर्षकाच्या कवितेत शब्दविशिष्ट पदबंधांतून एक रेखीव भाववृत्ती चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विश्रब्ध प्रणयाची ही भाववृत्ती इथे फार मोठ्या उत्कट रूपात निसर्गात भिनलेली आहे, नि म्हणून निसर्गाच्या परिभाषेत व्यक्त झालेली आहे. म्हणून मुसळधारांनी निसरड्या झालेल्या क्षितिजावर जपून पाय ठेवण्याचा इशारा. कपारीत लपून किरवाणी गाणाऱ्या रातकिड्यांना घुंगुर बांधले. रेशीम तळवे दिसायला नकोत ही काळजी. रूपकाची भाषा इथे अनुभूतीचा धागा बनली आहे, नि विदग्ध विलास करीत व्यक्त होते आहे. 'मेंदीरंगले नख', 'शेवाळले गीत' अशी विशिष्ट लडिवाळ शब्दांची घडण हा त्या भाषेचा सहजस्वभाव आहे. पंखभर आकाश ही या उत्कट अनुभवाची मर्यादा. ती शोधण्याची तीव्र इच्छा कवितेच्या शेवटी.

'कथा' या चार ओळींच्या कवितेत प्रसाद पाठक यांनी आपल्या एका भावानुभूतीचे नाट्यमय स्वरूप अगदी तीव्रतेने व ठसठशीतपणे रेखले आहे. ओठांवर व्यथेची कहाणी आहे आणि अंतःकरणात अनेक जखमांचा समूह साठलेला आहे. पण दुःखाची, वेदनांची खळबळ सगळी शमलेली आहे. व्यथावेदना सोसणारे मन आता शांत झाले आहे. ही शांतता सांत्वनाची नाही. ती सुन्नपणाचीही असेल. किंवा आपल्या व्यथावेदनांच्या अटळ अनिवार्यतेच्या जाणीवेतून आलेल्या सोशीकपणाचीही असेल. पण त्यामुळे एक तऱ्हेचा उदास अलिप्तपणा आता प्राप्त झालेला आहे. व्यथावेदनांनी भरकटलेल्या आपल्या वृत्तीचे शांत माथ्याला हसू येते आहे. कथा-जथा-माथा हे यमक येथे जराही कृत्रिम अथवा प्रयत्नघटित वाटत नाही. भावनेच्या सहज आवर्तनाचाच तो एक भाग वाटतो.

—रसिक

---

पुढील सहा महिन्यात 'कविता' सदरात प्रसिद्ध होणाऱ्या कवितांची निवड पूर्ण झाली आहे. कविमित्रांनी कृपया कविता पाठवू नयेत, त्यासंबंधी कोणताही पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही. —संपादक

---

शून्यात दृष्टी लावून खुशिद खुर्चीत बसून कितीतरी वेळ झाला होता. आज गला सारा महिना तो असाच विमनस्कपणे बसून होता. मनावर झालेला आघात सहन करण्याइतका तो दगडी हृदयाचा नव्हता. खरं म्हणजे तो भावनाशील माणूस. अत्यंत हळवा, साधे चित्रपट पाहातानादेखील त्या अंधारात दसाढसा रडणारा माणूस. सर्वांना वाटत होते खुशिदला वेडच लागेल. त्याची आई अन् बहीण झुबेदा त्याची समजूत घालण्याची व्यर्थ धडपड करीत होत्या.

आणि त्या बिचाऱ्या त्याची समजूत तरी कशी घालणार ? तो आघातच इतका मोठा होता .·. त्याचं सारं आयुष्य – स्वप्न उधळून टाकणारा होता.

ताहिरा ! त्याच्या जीवनाला उधळून टाकणारी, त्याच्या जीवनाला एक वेगळा सुंगध आणणारी त्याची प्रेयसी अन् सर्वांनाच पसंत पडणारी त्याची भावी वधू एका स्कूटर अपघातात जागच्या जागी निधन पावली होती. ही जबरदस्त घटन ऐकून खुशिद दोन दिवस तर एक अक्षरसुद्धा तोंडातून काढू शकला नाही. त्याच्या मित्रांनी त्या काळात त्याला खूप आधार दिला. केवळ त्यामुळेच तो जिवंत राहू शकला. नाहीतर त्यानेसुद्धा आपल्या जीवनाचा अंत करून टाकला असता.

---

**मधुकर प्रधान**

# ताहिरा


---

त्याचे सारे स्वप्नच उध्वस्त झाले होते. न थांबणारी गाडी एखाद्या प्लॅटफॉर्मवरून गेल्यावर जसा फक्त धुरळा उरतो तशा आता आठवणी उरल्या होत्या जितक्या वेगाने गाडी जाते तितक्याच वेगात त्याचे सत्यसृष्टीतले स्वप्न उधळले गेले होते.

ताहिराचा भाऊ जावेदही त्या अपघातात जबर जखमी झाला होता. जावेद अन् खुशिद दोघं जिगरी दोस्त. त्या दोस्तीमुळेच अन् जावेदच्या मूक संमतीनेच खुशिद – ताहिरा प्रकरण उजळले गेले, फुलले. आणि विशेष म्हणजे खुशिद – जावेद मैत्री कायम टिकून हे सारे घडत होते.

तरीसुद्धा ताहिराच्या मृत्यूनंतर खुशिद जावेदला भेटायला किंवा त्याच्या समाचाराला गेला नाही. कित्येक वेळा त्याच्या मनात तो विचार चमकून जाई. पण मन तयार होईना. अन् पाय त्या घराकडे जायला तयार होत नव्हते. त्याच्या सर्व मित्रांनी त्याला खूप सांगून पाहिले. स्वतःबरोबर येण्याचे पण मान्य केले. पण महिना झाला तरी तो अजून जावेदला भेटण्यास जायला तयार नव्हता. तेवढा मनाचा खंबीरपणा त्याच्यात आला नव्हता.

सकाळपासून तो असाच खुर्चीत बसून होता. झुबेदाने आणून ठेवलेला चहाचा



कप केव्हाच थंड झाला होता. चार दिवसांपासून न केलेल्या दाढीची खुरटंपण बरीच वाढली होती. आणखी असा किती वेळ तो बसून राहिला असता ते त्याचे त्यालासुद्धा समजत नव्हते.

तेवढ्यात त्याचा एक मित्र आला अन् म्हणाला, ' जावेदला सारखी तुझी आठवण येते. तो अजून अंथरुणातच आहे. त्याच्या जखमा तर मोठ्या आहेतच पण ताहिराच्या मृत्यूनेपण तो फार फार दुःखी झाला आहे. आता खरं म्हणजे त्याला तुझ्या सांत्वनाची फार जरूर आहे. मला वाटतं तू आत्ताच माझ्याबरोबर यावंस.

तो मित्र एका श्वासात सारं बोलून गेला. अन् त्याच्या संमतीची वाट न पाहाता तो जवळच्याच खूर्चीत बसला. मात्र त्यानं सारं लक्ष खुर्शिदच्या चेहऱ्यावरील भाव टिपण्यात केंद्रित केलं होतं. अन् आश्चर्य म्हणजे क्षणभर विचार करून खुर्शिद त्याच्या बरोबर जाण्यास तयार झाला. झपाट्याने दाढी — कपडे करून तो बाहेरसुद्धा पडला.

त्याच्या या वागणूकीचे त्या मित्राला तर आश्चर्य वाटलंच पण गेला महिना सतत त्याच्या भोवती वावरणाऱ्या त्याच्या आईला अन् बहिणीला पण आश्चर्य वाटलं.

जावेदजवळ जाऊन बसताच खुर्शिद ढसाढसा रडेलच असे त्याच्या मित्राला

वाटलं होतं. पण तसं मुळीच घडलं नाही. उलट जावेदचे अश्रु पुसण्यात, त्याचे सांत्वन करण्यातच तो मग्न होता आणि त्याहिपेक्षा आज तो जावेदशी इतर विषयांवर बोलण्यात अधिक वेळ घालवीत होता. बराच वेळ जावेदजवळ बसून झाल्यावर तो तिथून उठला. जितक्या घाईने आला तितक्याच घाईने तो तेथून उठला. जावेदला पण जरासे आश्चर्यच वाटले. अन् खुर्शिद मात्र तेथून जो उठला तो सरळ जावेदच्या वडिलांच्या खोलीत गेला.

अत्यंत लाडक्या मुलीच्या – ताहिराच्या-निधनाने ते तर पार ढासळून गेले होते. वृद्धावस्थेतल्या या धक्क्याने त्यांच्यातला होता नव्हता तो उत्साह साफ नाहीसा झाला होता. कित्येक दिवस तर ते आपल्या एकलत्या एक मुलासाठी हॉस्पिटलमध्ये सुद्धा जाऊ शकले नाहीत. दुःखाची पहिली लाट ओसरली अन् ते जरासे सावरले. हळूहळू मुलाच्या जखमांकडे लक्ष देऊ लागले. पण त्यांच्यात पूर्वीचे अवसान उरले नव्हते. ज्या काही गोष्टी ते करत त्या केवळ व्यवहार म्हणून करत, कर्तव्याच्या पोटीच. चालताना थकवा आला तरी पाय फरफटत चालावे लागते तसे ते आलेला दिवस ढकलीत होते.

परंतु अल्लाहच्या मनात ते सुखदेखील त्यांना समाधानाने मिळवून देण्याची इच्छा नव्हती.

दिवस थंडीचे होते. अन् वेळ दुपारची होती. खुर्शिद त्यांच्या जवळ गेला तेव्हा कोवळ्या उन्हाच्या छायेत अंगावर गरम शाल घेऊन ते आरामशीर बसले होते. तेवढ्यात त्यांच्या दारात एक जीप गाडी थांबल्याचे त्यांनी पाहिले. दोन फौजदार त्यांच्याच फाटकाचे दार उघडून येतानासुद्धा त्यांनी पाहिले. जरा गोंधळले. आपल्या-सारख्या सरळ, एकमार्गी जीवन जगणाऱ्याच्या दाराशी फौजदाराने येऊन उभे राहावे हे त्यांना जेवढे अकल्पित वाटत होते तेवढेच भीतीदायकसुद्धा. तरीही आपल्या दाराशी येणाऱ्या प्रत्येकाचे योग्य स्वागत करायचे या नित्य भावनेने त्यांनी त्या दोघांचेही स्वागत केले.

फौजदार येताच त्यांनी स्पष्ट सांगितले, की आम्ही सी. आय. डी अधिकारी असून नुकत्याच अकस्मातात निधन पावलेल्या आपल्या मुलीची माहिती आम्हाला पाहिजे.

या स्पष्टीकरणाने तर ते अधिकच गोंधळून गेले. आपल्या मुलीने जाता जाता असा कोणता अपराध केला असवा, की ज्यामुळे आज तिच्या मृत्यूनंतरसुद्धा सी. आय. डी. तिच्याबद्दल माहिती मिळविण्यास उत्सुक आहेत.

खरं म्हणजे फौजदारांना पाहिजे असलेली माहिती साधी, सरळ अन् सोपी होती. तरीसुद्धा वृद्ध मुन्सूर अली गोंधळले होते. भ्यायले होते. खरं म्हणजे त्यांच्या तोंडून शब्दच निघत नव्हते. या गोंधळाची अन् त्यांच्या एकूण मनस्थितीची पूर्ण कल्पना फौजदारांना आली असावी अन् म्हणूनच त्यांनी पूर्व माहिती मिळविण्यापूर्वी अधिक

स्पष्टीकरण करण्यास सुरुवात केली.

'त्याचं काय आहे मुन्सूर अली, तुमची मुलगी ताहिरा तशी सरळ अन् एकमार्गी होती. पोलीस अधिकाऱ्यांना तिच्या अस्तित्वाबद्दल काहीच कल्पना नव्हती. परंतु तिच्या मृत्यूनंतर मात्र ती आमच्यापुढे सतत एका यक्षप्रश्नासारखी वावरत आहे.'

'तिला अकस्मात मृत्यू आला. त्यानंतर चारच दिवसांनी एक विचित्र घटना सरकारी हॉस्पिटलमध्ये घडली. वेळ रात्रीची होती. सर्व नित्याची कामे संपवून नर्स, डॉक्टर जरा आरामशीर बसून गप्पागोष्टी करण्यात गर्क होते. तेवढ्यात एक नगरपालिकेची अॅम्ब्यूलन्स हॉस्पिटलच्या पोर्चमध्ये दाखल झाली. अन् त्यातून एका माणसाला जखमी अवस्थेत बाहेर काढला.

जखमांची गंभीरता पुष्कळच होती. त्वरित त्याचे ऑपरेशन करण्याचीपण जरूर होती. तसेच त्याला रक्ताची पण तितकीच आवश्यकता होतो. त्या गडबडीत डॉक्टर अन् नर्स असतानाच त्या रुग्णाचा कोलॅप्स झाला. पोलीसच त्याला घेऊन आल्यामुळे त्याही स्थितीत ते त्याचे डायिंग स्टेटमेंट घेण्याची धडपड करू लागले. त्याच्या अर्धवट बोलण्यावरून एवढेच समजले की, वायलची निळी साडी नेसलेली एक रूपवान तरुणी रस्त्यावर त्याला भेटली. अन् मला लिफ्ट द्या म्हणून विनवणी करू लागली. त्यामुळे त्याने तिला आपल्या स्कूटरवर बसविले, अन् थोडे पुढे जातो न जातो तोंच सरळ रस्त्यावर कोणतेही वहान सामोरे आलेले नसताना त्याची स्कूटर उलटली अन् तो जबर जखमी झाला. त्याही स्थितीत त्याने त्या तरुणीचे काय झाले हे पाहण्याची धडपड केली तर ती तरुणी तिथे नव्हतीच. अन् आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्कूटर मात्र उभी करून ठेवावी तशी रस्त्याच्या मध्यभागी उभी असलेली दिसत होती.

अन् हे सारं सांगून पुरं होतंय तोच त्या माणसाने अखेरचा श्वास सोडला.

ऑपरेशनची तयारी बाजूला ठेवून त्याचे पोस्टमॉर्टेम करावे लागले. त्याला जखम फक्त मानेखालच्या भागातच झाली होती. शरीराच्या दुसऱ्या कोणत्याही भागात साधे खरचटलेसुद्धा नव्हते.

पोलीस त्या माणसाच्या ड्रायव्हिंग लायसन्सच्या आधाराने त्याच्या घराच्या तपासाला निघून गेले. पण डॉक्टरांना मात्र एका गोष्टीचं विलक्षण आश्चर्य वाटू लागलं. चार दिवसापूर्वीच रात्री अकस्मात निधन पावलेल्या एका पेशंटलासुद्धा अशीच मानेखाली जखम झाली होती. तिच्या मृत्यूलासुद्धा तेवढेच कारण होते.

पोलीस त्यानंतर आपल्या नित्याच्या कामात गढून गेले.

पण पुन्हा चार दिवसांनी अशाच रात्रीच्या वेळी पोलीस एका जखमीला घेऊन आले. अन् त्याची जखमच काय पण इतर साऱ्या घटनासुद्धा पूर्वीसारख्याच होत्या. अन् त्यानंतर नियमित दर चार दिवसांनी अगदी पूर्वीसारखी घटना घडलेली केस हॉस्पिटलमध्ये येऊ लागली.

त्यामुळे हॉस्पिटलचे कर्मचारी तर थक्कच झाले पण पोलीस अधिकारीसुद्धा. आणि या घटनेमागे काय आहे याचा तपास करण्यासाठी त्यांनी स्वतःच प्रयत्न केला.

" गोष्ट कालच रात्री घडली. आमच्यातलाच एक तरणाबांड पोलीस अधिकारी दोन पोलिसांना घेऊन एका जीप गाडीने त्या रस्त्याने जाऊ लागला. नेमका तो दिव्याचा खांब आला अन् त्या निळ्या साडीतल्या मुलीने जीप गाडी थांबविली. त्या पोलीस अधिकाऱ्याने बऱ्याच गोष्टी तिच्याकडून काढण्याचा प्रयत्न केला. पण ' मला लवकर घरी पोचवा.' यापलीकडे ती काहीच बोलत नव्हती. ' मला घरी पोचवा ' या शब्दांमागे दडलेली व्याकुळता, विनंती कुणाही माणसाच्या हृदयाला पाझर फोडेल अशीच होती. त्यांनतर त्या अधिकाऱ्याने तिला आपल्या जीपमध्ये घेतले अन् गाडी चालू केली अन् काही सेकंदांच्या अवधीत ती जीप भर रस्त्यावर उलटली अन् तो अधिकारी जागच्या जागी ठार झाला. अन् आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या गाडीतल्या इतर दोघा पोलिसांना कुठेही जखम तर झाली नाहीच पण आपली जीप उलटली हेसुद्धा समजले नाही. मात्र जिथे जीप थांबली होती तिथे जवळच रक्ताच्या थारोळ्यात त्या तरुण अधिकाऱ्याचा मृतदेह पडला होता. पण ती तरुणी मात्र त्यांना त्यानंतर दिसली नाही.'

त्या सी. आय. डी. अधिकाऱ्याकडून समजलेली ही हकीकत ऐकून वृद्ध पित्याला अन् खुर्शिदला भलतेच आश्चर्य वाटले. क्षणभर तर ते आपण हे काय ऐकलं याचाच विचार करीत दिङ्मूढ होऊन शून्यवत् बसून होते.

त्यानंतर कोणी कोणाशीही काहीच बोलले नाही. थोड्या वेळाने खुर्शिद तेथून उठला व आपल्या घरी आला.

भल्या सकाळी जावेदला पाणी देण्यासाठी वृद्ध मुन्सूर अली उठून बाहेर येतात तों दारात कालची जीप येताना दिसली. " अत्यंत घाईत कालचाच अधिकारी येताना दिसताच मुन्सूर अली बाहेर आले. त्यांना पाहाताच त्या अधिकाऱ्याने विचारले–' काल आपल्याशेजारी बसलेली व्यक्ती कोण होती ?"

" का ?"

" ती व्यक्ती कोण होती ते तर सांगा !"

" ती व्यक्ती म्हणजे माझ्या मुलाचा मित्र खुर्शिद आणि निधन पावलेल्या मुलीचा भावी पती होता."

" काय म्हणता ?"

" का ?"

" कारण..... काल रात्री त्याचा मृतदेह त्या रस्त्यावर सापडला. मात्र यावेळी एक विशेष घडलंय. त्याची स्कुटर उलटलेली दिसत असून त्या मुलीच्या साडीच्या पदराचा तुकडा त्याच्या चेहऱ्यावर टाकलेला दिसला."

◻ ◻ ◻

# पुस्तके

मीराबेन यांच्या संस्कारग्रहणाची कहाणी

## एक चैतन्ययात्रा



डॉ. भीमराव कुलकर्णी

मानवी जीवनाइतके अद्‌भुत आणि अतर्क्य असे या जगात दुसरे काही नसेल ! मिस् मॅडेलीन स्लेड नावाची आंग्लकन्या महात्मा गांधींचे चरित्र वाचून मनोमन त्यांची पूजा बांधण्यात कृतार्थता मानते काय, आपले स्वच्छंदी तारुण्य आणि संपन्न बालजीवन विसरून भारतात गांधीजींच्या ओढीने येऊन गांधीजींच्या आदर्शांचे पालन करण्यात धन्यता मानते काय आणि आपले सारे जीवन या कार्यासाठी वाहून तपस्विनीच्या भूमिकेचे दिव्य साकार करते काय, सारेच काही अद्‌भुत आणि अतर्क्य वाटावे, अशीच ही घटना आहे ! श्री. रंगा मराठे यांनी संक्षिप्तरूपाने अनुवादिलेल्या मीराबेन यांच्या ' दि स्पिरिटस् पिल्ग्रिमेज ' या आत्मचरित्राच्या वाचनानेहा च विचार सारखा मनात येतो.

मिस मॅडेलीन स्लेड ही हिंदुस्थानातील नाविक दलाचे सेनापती स्लेड यांची कन्या. ज्या साम्राज्याचा सूर्य सदैव तळपत राहील, अशी एकेकाळी कल्पना होती आणि साऱ्या हिंदुस्थानावर ज्या सत्तेने सर्वंकष सत्ता प्रस्थापित केली होती, त्या सत्तेच्या एका प्रमुख अधिकाऱ्याची ही कन्या हिंदुस्थानात येऊन गांधीजींचे शिष्यत्व पत्करते आणि गांधीजींच्या निष्ठावंत शिष्यांमधे तिची गणना होते, ही घटनाच तशी काळाची अघटित वक्रता सूचित करणारी आहे. परंपरेने चालत आलेल्या चाली-रीतींचे दास्यत्व न पत्करता बुद्धिवादाच्या निकषावर स्वतंत्र जीवन जगण्याची जिद्द हा तिच्या आईचा वारसा. म्हणून आपला पिता ज्या सत्तेच्या अंकित होता,

त्याच सत्तेशी झुंज घेणाऱ्या गांधीजींच्या चळवळीत या कुमारी स्लेडने स्वतःला झोकून दिले. स्वामी विवेकानंद, योगीराज अरविंद, महात्मा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाने आकर्षित होऊन ज्या दिवसापासून पाश्चात्य तरुणतरुणींनी पाश्चात्य सभ्यता आणि संस्कृती यांना विटून पौरस्त्य अध्यात्माच्या ओढीने हिंदुस्थानची वाट धरली, त्या दिवसापासूनच ऐहिक अभिवृद्धीने पछाडलेला पाश्चात्य संस्कृतीचा डोलारा डळमळीत होऊ लागला होता. पाश्चात्य संस्कृतीचा किंवा विज्ञाननिष्ठ संस्कृतीचा बुरखा दूर करण्याचे कार्य ज्या व्यक्तींनी केले, त्या व्यक्तीत मॅडेलीन उर्फ मीराबेन या व्यक्तीचा वाटा मोठा आहे. बिथोवेनच्या संगीताच्या ओढीने ती प्रसिद्ध फ्रेंच विचारवंत, चरित्रकार व कादंबरीकार रोमाँ रोलाँ यांच्या सान्निध्यात आली. परमेश्वराच्या जवळ जाण्याचे संगीत हेच सर्वोत्कृष्ट साधन आहे अशी तिची सुरवातीस धारणा होती. परंतु संगीताच्या साहाय्याने ज्या परमेश्वरा जवळ जाण्याची अभिलाषा बाळगावयाची तो प्रत्यक्ष परमेश्वरच मनुष्यरूपाने पृथ्वीतलावर अवतीर्ण झाला असेल तर त्याच्या जवळ जाण्याची निष्ठा ही संगीत-साधनेपेक्षा श्रेष्ठ होय, हा विचार या तरुण मुलीच्या मनात फ्रेंच लेखक रोमाँ रोलाँ यांनी भरविला. असा परमेश्वर, म्हणजे साक्षात येशू ख्रिस्तच गांधीजींच्या रूपाने हिंदुस्थानात जन्मला आहे, असे त्यांनी तिला सांगितले. रोमाँ रोलाँनी लिहिलेल्या बिथोवेनच्या जीवनावरील चरित्रात्मक कादंबरीने तिला वेड लाविले होते परंतु त्यांनीच लिहिलेल्या गांधीजींच्या चारित्र्याच्या प्रभावाने आपले घरदार, आईवडील, आपला देश व तारुण्य सुलभ अशा साऱ्या आकांक्षांना तिलांजली देऊन ती भारतात आली.

## वेधक आत्मकथा

एका सर्वस्वी अपरिचित अशा संस्कृतीचे सारे संस्कार तिने जिद्दीने अंगी मुरविले. या संस्कारग्रहणाची कहाणी म्हणजेच ही आत्मकथा. या आत्मकथेमुळे मॅडेलीन स्लेडच्या आंतरिक सामर्थ्याचे, तिच्या जगावेगळ्या गांधीप्रेमाचे जसे दर्शन होते, तसेच महात्माजींच्या विलक्षण भावसंपन्न अशा आंतरिक सामर्थ्याचाही साक्षात्कार होतो. बापूजींचा ऋषितुल्य आश्रमसाधना, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन त्यांच्या भोवती निष्ठेने गोळा झालेला कार्यकर्त्यांच्या समुदाय, त्यांच्यामधील ताणतणावे या आत्मकथेत सहजतेने साकार झालेले आहेत. गांधीजींच्या भोवती असलेले राजकीय वलय या आत्मकथेत केवळ पार्श्वभूमीसारखे येते. मुख्य भर आहे तो गांधीजींच्या प्रयोगशीलतेवर, जीवनाच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा विचार करून त्यातील चैतन्याचा वेध घेण्याच्या त्यांच्या मुलुखा-वेगळ्या परंतु मूलभूत समस्यांची उकल करण्याच्या त्यांच्या धडपडीवर. जगाने किंवा देशानेही त्यांच्या दैवी गुणांचा आरोप केला तरी गांधीजींचे सामर्थ्य त्यांच्या मानवीपणाच्या आकलनातच होते. या मानवीपणाचे पदर गांधीजींच्याबद्दल

लिहिणाऱ्या व्यक्तींच्या लेखनातून झिरझिरीत होतात व त्यांच्या दैवीपणाचेच स्तोम माजविले जाते. मीराबेनच्या दृष्टिकोनात बुद्धिवाद आणि आत्मशोधन यांचा मिलाफ असल्यामुळे त्यांच्या विश्लेषणामध्ये एक प्रकारची वस्तुनिष्ठता आहे. या वस्तुनिष्ठतेमुळे गांधीजींच्या कार्याचे बहुविध स्वरूप त्या निष्ठेने व्यक्त करीत असतानाच आपल्यातील देहभावनेचे स्वत:ला विस्मरण होऊ देत नाहीत. मीराबेनची ही भक्ती एका अर्थाने मधुराभक्तीच वाटते, परंतु मधुराभक्तीतील आंधळेपणा मात्र यात नाही. कर्मयोगाने आत्मप्राप्ती हाच गांधीजींचा खराखुरा मार्ग. मधुराभक्तीने प्रेरित होऊन गांधीजींना अनुसरलेल्या आंग्ल युवतीचे नामकरण गांधीजींनी 'मीराबेन' असे केले असले तरी सतत कर्म करण्याची प्रेरणा देऊन आणि तिला ध्येयवादी कार्यात गोवून मधुराभक्तीतला आंधळेपणा त्यांनी नाहीसा केला. या नव्या मधुराभक्तीचे व कर्ममार्गाचे हे जिवंत व उद्‌बोधक चित्र अनेक दृष्टीने विचार करावयास लावणारे आहे. या आत्मकथेच्या वाचनामुळे आपण गांधीजींच्या अधिक जवळ गेल्याचा प्रत्यय येतो. त्यांनी शिष्यरूपाने जवळ बाळगलेली स्फोटक सामग्री त्यांनी कशी कौशल्याने समाजोन्मुख केली व त्यातूनच देशाच्या स्वातंत्र्याचा मार्ग कसा दाखवून दिला याचे दर्शन घडते. गांधीजींच्या जीवनातील अनेक प्रकारच्या नाटयपूर्ण विलक्षण हकीकतींचे साक्षीभूत चित्र म्हणून तर ही आत्मकथा अतिशय हृद्य वाटते. गांधीजींच्या आश्रमातील शिस्त व कष्टमय जीवनाशी एकरूप होण्याची कला, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील करारीपणा, त्यांचे आहाराचे प्रयोग, मीराबेननी प्रथम साडी नेसण्याचा प्रसंग, मीराबेननी हिंदी भाषा आत्मसात करण्यासाठी गांधीजींच्या सल्ल्यानुसार निष्ठेने केलेला भारतभरचा आश्रमवास, गांधीजींबरोबरच्या प्रवासाची त्यांनी उभी केलेली चित्रे, गांधीजींची दांडीयात्रा, त्यांचे तुरुंगवास, त्यांची व्हाईसरायशी भेट. त्यांचे परदेशगमन व रोमाँ रोलाँच्या घरचे वास्तव्य अशा कितीतरी परिणामकारक अनुभवविश्वाने हे आत्मचित्र चित्रमय झाले आहे. गांधीजींच्या जीवनातील आश्रमजीवन, राजकीय जीवन व स्वातंत्र्योत्तर मृत्युपूर्व जीवन–तिन्ही अवस्था या आत्मकथेत चित्रित झाल्या आहेत.

रंगा मराठे यांनीही सफाईदार रीतीने व परिश्रमाने हे चित्र मूळस्वरूपात उभे केले आहे. अनुवादित पुस्तकांच्या विपरित शब्दकळेने हे पुस्तक डागळलेले नाही. त्यांच्या संक्षेपयोजनेतही कौशल्य दिसून येते. परंतु या संक्षेपामुळे मीराबेनबद्दल एक प्रकारची गूढता शिल्लक राहते आणि त्यांच्या मनाचे सारे कंगोरे न उलगडल्यामुळे वाचकांच्या मनात एक प्रकारचे असमाधान तरळत राहते. हे एक प्रकारे अपरिहार्य आहे व एक प्रकारे या संक्षेपाचे यशही आहे. ◻

[एक चैतन्ययात्रा–मीराबेन (मॅडेलीन स्लेड) यांच्या आत्मकथेचा संक्षिप्त अनुवाद अनुवादक–रंगा मराठे. स्त्री-सखी प्रकाशन, किर्लोस्कर प्रेस, पुणे ९. मूल्य रु.६–५० ]

# जनरल जिरॉदचे धाडसी पलायन....



## उत्तरार्ध : निवेदन : अनंत भावे

धैर्याने जिरॉद् सरळ रेल्वेस्थानकावर आला आणि एका शौचकूपात शिरला. शौचकुपाचा दरवाजा त्याने घट्ट बंद करून घेतला. त्याला मिळालेल्या सूटकेसमध्ये साधे कपडे होते; ओळखपत्र आणि त्याबरोबरचे कागदपत्र होते; आगगाडीचे तिकीट होते; आणि जर्मन नोटांची चळत होती. घाईघाईने जिरॉद्ने गणवेश काढून टाकला आणि साधे कपडे अंगावर चढवले. ते कपडे चढवत असतानाच स्थानकावरील दूरध्वनिक्षेपकावरून येणारा मोठा आवाज त्याच्या कानांवर पडला. निवेदक सांगत होता, ' सावधान, एक घातकी युद्धकैदी नुकताच पळाला आहे. सगळ्या जर्मनांनी त्याचा शोध करावा. युद्धकैद्याचे नाव जनरल हेन्री जिरॉद्. वय ६३ वर्षे; उंची ६ फूट; वजन २०० पौंड. कैद्याच्या डोक्यावरील केस राखी रंगाचे असून त्याने मिशा वाढवल्या आहेत. हा कैदी नुकताच कॉनिग्सटाईन तुरुंगातून निसटला आहे. ज्याच्या दृष्टीला वरील वर्णनाचा कैदी पडेल, त्याने ताबडतोब गेस्टॅपोला वर्दी द्यावी. '

जिरॉद्ने खोडकरपणाने हलकेच एक शीळ घातली. ज्या अर्थी अगदी जाहीर निवेदन करून त्याला पकडण्याचा प्रयत्न जर्मनांनी चालवला आहे, त्या अर्थी त्याच्या पलायनामुळे त्यांचा केवढा थयथयाट झाला असेल याची कल्पना जिरॉद्ला आली. त्याने गणवेष सुटकेसमध्ये कोंबला आणि ओळखपत्र उचलले. ओळखपत्राप्रमाणे आता त्याचे नाव हॅन्स जागेर असे असून तो एक छोटा कारखानदार होता. ओळखपत्रावरील छायाचित्राकडे त्याने टक लावून पाहिले. ते छायाचित्र

बिनमिशीवाल्या हेन्‍री जिरॉद्‍चे होते. फ्रेंच भूमिगत कार्यकर्त्यांनी कागदपत्रांची बनावट तर बेमालूम केली होती.

जिरॉद्‍ पुन्हा हळूच स्थानकावर आला आणि फलाटाकडे जाणाऱ्या दरवाजापाशी येताच, दरवाजात उभे असलेले, काळा गणवेश घातलेले दोन गेस्टॅपोचे पोलीस त्याला दिसले. फलाटावर जाणाऱ्या प्रत्येक माणसाचे कागदपत्र तपासत होते ते. जिरॉद्‍ पटकन एका खांबाआड झाला आणि त्यांच्यावर लक्ष ठेवू लागला. एक उंच म्हातारासा मनुष्य त्यांच्याशी तावातावाने बोलत होता. त्याने आपले ओळखपत्र हातात धरले होते आणि ते नाचवत तो ओरडत होता, 'पण मी म्हणजे तो पळालेला कैदी नव्हे. मी काही केलेलं नाही. मला कशाला अडवता तुम्ही?'

परंतु त्या पोलिसांचे त्याच्या सांगण्याकडे वा त्याच्या ओळखपत्राकडे मुळीच लक्ष नव्हते. त्यांच्यापैकी एकजण त्या गृहस्थाला निग्रहपूर्वक सांगत होता, 'म्हातारबाबा आपण गप्प बसायला काय घ्याल? हुकुमाप्रमाणे त्या फ्रेंच कैद्यासारख्या दिसणाऱ्या प्रत्येक माणसाला थांबविणार आम्ही.'

जिरॉद्‍च्या कानावर हे शब्द पडले आणि तो अक्षरश: हादरला. एकूण जवळच्या कागदपत्रांचा काहीच उपयोग होणार नव्हता. सहा फूट उंचीच्या, राखी केसांच्या प्रत्येक माणसाला थांबविण्यात येणार होते. ओळखपत्र मुळी पाहायचेच नव्हते त्यांना. जिरॉद्‍च्या चित्ताचा ठाव सुटला. त्याने मिशांना रजा दिली होती हे खरे होते; परंतु त्याचा उंचापुरा सहा फुटी देह आणि चालताना एका बाजूला झुकण्याची त्याची सवय या गोष्टी कशा लपणार होत्या? दर अर्ध्या तासाने रेडिओवरून आणि दूरध्वनिक्षेपकावरून त्याच्या वर्णनाची माहिती देण्यात येत होती. साऱ्या जर्मनीभर त्याच्या पलायनाची वार्ता एव्हाना प्रसृत झाली होती. त्यामुळे सारेच जर्मन लोक सावध झाले असण्याची शक्यता होती. जर्मन युद्धयंत्रणा आपल्याला पकडण्यासाठी काय वाटेल ते करील, याची जिरॉद्‍ला खात्री होती. कारण या एका माणसाच्या मागे फ्रेंच राष्ट्र पुन्हा निर्धाराने उभे राहण्याची शक्यता होती. त्यामुळे जिरॉद्‍ला पकडण्यासाठी जर्मनांनी आकाशपाताळ एक केले असते.

फलाटावर जाण्यासाठी असलेल्या त्या दरवाजाचे जिरॉद्‍ने बारकाईने निरीक्षण केले. दारातील तीक्ष्ण दृष्टीच्या त्या पोलिसांना चुकवून फलाटावर जाणे केवळ अशक्य होते. परंतु स्कांदावमध्ये अधिक काळ राहणेदेखील त्याला शक्य नव्हते. कारण जर्मनांनी जरूर तर शिकारी कुत्रे घेऊन तो परिसर शोधला असता. त्यातील इंचन् इंच पालथा घातला असता. अशा परिस्थितीत लपून राहणे सर्वस्वी अशक्य होते. त्यामुळे काय वाटेल ते झाले तरी फलाटावर उभी असलेली गाडी पकडणे जरुरीचे झाले होते. ती गाडी जिरॉद्‍ला स्कांदावपासून दूर नेणार होती.

गाडी सुटण्याची वेळ झाली. ती थोडी हललीदेखील. गाडीच्या चाकांमधून धुराचे लोट बाहेर पडले आणि ते फलाटावर रेंगाळले. गाडी हळूहळू सरकू लागली.

क्षणभर जिरॉद् अगदी उध्वस्त झाला. त्याला ती गाडी पकडणे भागच होते. पण कसे कोणास ठाऊक, त्याचे पाय जमिनीला खिळून गेले होते. त्याचे मन काम करायलाच तयार नव्हते. तेवढ्यात इच्छाशक्तीने आपली हुकुमत प्रस्थापित केली. त्याला वाटले, गाडी पकडण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे आपण. आणि या विचारासरशी जिरॉद् सरळ बेफामपणे प्रथम त्या दरवाजाकडे आणि नंतर दरवाजातून फलाटावरील गाडीकडे धावत सुटला. आपली एका बाजूला झुकण्याची सवय लपवण्याचा कसोशीने प्रयत्न त्याने चालवला होता. त्यामुळे त्याच्या शरीरात असह्य वेदना उठत होत्या. त्याचा चेहरा वेडावाकडा झाला होता. टाय फडफडत खांद्यावरती आला होता. परंतु त्यामुळे तो हुबेहूब एखाद्या घायकुत्या व्यापाऱ्यासारखा दिसत होता.

एका पहारेकऱ्याने ओरडून त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला; पण जिरॉद्ने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. तो पुढेच पळत राहिला. कोणत्याही क्षणी आपल्या देहात गोळी घुसेल आणि आपल्या प्रयत्नाला पूर्णविराम मिळेल, अशी भीती त्याला वाटत होती. पण तरी वेड्यासारखा तो धावतच राहिला. धावताना आपले ओळखपत्र त्याने हातात उच धरले होते. आणि धावत असतानाच त्याच्या कानावर पहारेकऱ्याचे शब्द पडले, 'धावा म्हातारबाबा, जोराने धावा. मिळणार गाडी तुम्हाला.'

## जर्मनी हाच तुरुंग

आणि स्कांदाव स्टेशनातून बाहेर पडणारी गाडी जिरॉद्ने अगदी अखेरच्या क्षणी पकडली. मागे जाणाऱ्या फलाटाकडे त्याने वळून पाहिले. गेस्टॅपोचे ते पोलीस त्याच्याकडे पाहात हसत होते. त्यांच्यापैकी एकाने हात उंचावून जिरॉद्चे अभिनदन केले. जिरॉद्ने सुटकेचा निःश्वास टाकला आणि डब्यात शिरून तो एका बाकावर कोपऱ्यात जाऊन कोसळला. आता काही काळ तरी तो सुरक्षित होता. परंतु गाडीतून उतरल्यावर काय करायचे हा प्रश्नच होता. आता जर्मनीमधील एकही शहर त्याच्या दृष्टीने सुरक्षित नव्हते; आणि सरहद्दीवर तर पहारा दुप्पट सावध झाला असण्याची शक्यता होती.

जर्मनीबाहेर जाणे कदाचित शक्यच होणार नाही असे जिरॉद्ला वाटू लागले. परंतु जर्मनीत राहणेदेखील तितकेच धोक्याचे होते. तूर्त तरी नुसते भटकत राहणे हे अधिक सुरक्षितपणाचे होते.

स्टयूटगार्ट येथे जिरॉद्ने चपळाईने गाडी बदलली आणि तो उलट दिशेने प्रवास करू लागला. तसे करताना त्याच्या मनाला अत्यंत क्लेश झाले. कारण स्टयूगार्टपासून फ्रेंच सरहद्द अवघी चाळीस मैलांवर होती. परंतु त्यावेळी ती ओलांडण्याचा प्रयत्न करणे आत्मघातकीपणाचे ठरले असते.

दुसऱ्या दिवशी त्याने पुन्हा गाडी बदलली. नंतर पुन्हा गाडी बदलली. आणि

मग गाड्या बदलण्याचे सत्रच चालू ठेवावे लागले. एकासारख्या एक गाड्या; उदास दिसणारे डबे; सारखे जागे राहण्याचा प्रयत्न; धोक्याचा नुसता संशय आला तरी सावध होण्याची धडपड. असा आठवडा गेला. आणि कॉनिग्सटाईन येथे बंदिवान असताना स्वातंत्र्य जितके दूर होते तितकेच ते आताही होते. कॉनिग्सटाईन-मधून तो बाहेर आला होता हे खरे; परंतु आता सारा जर्मनी हाच एक भलामोठा तुरुंग झाला होता. या तुरुंगाच्या भिंती ओलांडणे फार फार कठीण होते.

धावत्या गाडीच्या खिडकीजवळच्या जागेवर जिरॉद् बसला होता. त्याची पाठ वाकली होती, आणि डोळे वेगाने मागे जाणाऱ्या जर्मन भूमीकडे कोरडेपणाने पाहात होते. सतत पडलेल्या श्रमांमुळे त्याचा चेहरा ओढला होता. डोळे खोल गेले होते. पूर्वी कधी नव्हती इतकी आपल्या वाढत्या वयाची जाणीव त्याला झाली. त्याची मान छातीवर झुकली आणि गाडीच्या धक्क्यांसरशी हलू लागली. मग अचानक तो दचकून जागा झाला. पुन्हा डोळा लागणार नाही याचा आटोकाट प्रयत्न करू लागला.

डब्यामधील इतर प्रवाशांचे त्याने नीट निरीक्षण केले. लाल गालांची एक लठ्ठ मध्यमवयीन जर्मन पुरंध्री त्याच्या अगदी समोर बसली होती. तिच्या शेजारी एक कोवळ्या चेहेऱ्याचा परंतु युद्धाचा बराच अनुभव घेतलेला सैनिक बसला होता. त्याशिवाय दोन जाडगेले, निर्विकार चेहऱ्यांचे व्यापारी होते. आणि जिरॉद्च्या अगदी शेजारी लांबोडक्या चेहेऱ्याचा एक जर्मन सेनाधिकारी होता. या अधिकाऱ्याची जात जिरॉद् ओळखू शकत होता. त्याचा काही उपयोगदेखील करून घेता येईल असे जिरॉद्ला वाटले. त्याच्या छातीवर स्वस्तिक चिन्ह झळकत होते; परंतु तरीही हिटलरच्या नवनिर्मित जर्मनीचा प्रतिनिधी दिसत नव्हता तो. त्याच्या ताठरपणात असे काही होते की त्यामुळे, हिटलरच्याही पूर्वीच्या पिढ्यान पिढ्यांच्या प्रुशियन परंपरेचे संस्कार त्याच्यावर झाले असावेत असे जिरॉदला वाटले. युद्धा-बद्दलची प्रुशियन कल्पना आणि नाझी पद्धती यांमध्ये बराच फरक होता. त्यामुळे प्रुशियन परंपरेचा वारसा सांगणाऱ्या सैनिकांचे हिटलरवरील व त्याच्या तिसऱ्या राईशवरील प्रेम यथातथाच होते.

## तुम्ही रोमेलसारखं बोलता

गाडी हायडेलबर्ग शहराजवळ आली. तिचा वेग मंद झाला. प्राचीन काळी शिक्षणाचे केंद्र असलेले हे शहर पार केल्यावर जिरॉद् जर्मन सरहद्द ओलांडण्याचा प्रयत्न करणार होता. गाडी स्थानकात शिरत असताना जिरॉद्ने चटकन् फलाटाचे निरीक्षण केले. फलाटावर गेस्टॅपोचे पोलीस एका रांगेत उभे होते. गाडी थांबता-क्षणी ते डब्यांमध्ये शिरणार आणि कागदपत्रे तपासणार, हे उघडच होते. जिरॉद्चे मन सैरभैर झाले. या तपासणीतून काही आपण सुटणार नाही हे त्याला चांगले ठाऊक होते. त्याने मान वळवून आपल्या शेजारी बसलेल्या जर्मन अधिकाऱ्याकडे

पाहिले. त्या जर्मन अधिकाऱ्याचा कदाचित् उपयोग करून घेता येईल असे जिरॉद्‌ला वाटले.

जिरॉद् पुढे झुकला आणि त्याला म्हणाला, " माफ करा साहेब. पण तुमच्या कोटावर असलेला तो बिल्ला आफ्रिकन कोअरचाच आहे ना ?"

कॅप्टनने जिरॉद्‌कडे संशयाने पाहिले आणि तो उत्तरला, "होय."

"वाटलंच मला. पहिल्या महायुद्धामध्ये मीदेखील आफ्रिकेतच होतो ना ! अर्थात् आताच्याप्रमाणे रणगाडे आणि वेगवेगळी यांत्रिक आयुधं नव्हती तेव्हा. पण ती रखरखीत वाळू आणि भाजणारा उष्मा; यात तर आजही काही बदल झालेला नसणार."

"खरं आहे." कॅप्टन म्हणाला. त्याला आता जिरॉद्‌शी बोलण्यात गोडी वाटु लागली असावी; कारण तो लगेच पुढे म्हणाला, " वाळवंटातल्या युद्धाचे ते दोन घटक अजून अगदी पूर्वी होते तसेच कायम आहेत."

जिरॉद्‌ने त्याच्या चेहेऱ्यावरील भाव बारकाईने टिपले. तो प्रुशियन अधिकारी बोलण्यात रंगणार अशी आशा त्याला वाटू लागली. पण तेवढेच पुरेसे नव्हते. संभाषणाचा मोहरा त्याला असा वळवायचा होता, की गेस्टॅपोची माणसे येताना त्या प्रुशियन अधिकाऱ्याचा निवेदनाचा उत्साह उतू जावा. गाडी आता थांबली होती. जिरॉदने मनाशी हिशेब केला. काळ्या गणवेशातील गेस्टॅपोची माणसे डब्यात घुसायला दोन मिनिटांचा अवधी होता.

जिरॉद् बोलू लागला, " मला मात्र नेहमी असं वाटतं, की अलामेन हे इजिप्तचं नाक आहे. ब्रिटिशांना तिथून हाकून काढलं पाहिजे आपण. मग अलेक्झांड्रिया कोसळलंच म्हणून समजा."

तो कॅप्टन हसू लागला. तुम्ही साक्षात् रोमेल असल्यासारखं बोलता की हो. परंतु मला मात्र तुमचं मत पटत नाही. मी म्हणतो, आपण अलामेनला वळसा घालून मागून हल्ला केला, रसद तोडली...

डब्याचा दरवाजा खाडकन् उघडला. "ओळखपत्र. कागदपत्रं तयार ठेवा. प्रत्येकानं ती दाखवलीच पाहिजेत." या हुकुमापाठोपाठ दोन धिप्पाड गेस्टॅपो पोलीस डब्यात आले. सैनिकाने खिशात हात घालून आपले कागदपत्र काढून दाखवले. त्या जर्मन बाईने हसतहसतच आपले ओळखपत्र सादर केले. आता त्या दोहोपैकी एका व्यापाऱ्याची पाळी होती. कागदपत्र दाखवता दाखवता उशीर होतोय, अशी कुरकुर त्याने केली. " तुम्हाला सांगितलंय तसं करा " एक गेस्टॅपो पोलीस गुरगुरला. आता ते जिरॉद्‌कडे वळले.

तोपर्यंत आपले डावपेच जिरॉद्‌ला तपशीलवार सांगण्यात कॅप्टन रंगून गेला होता. त्यात विक्षेप आल्यामुळे स्वाभाविकच तो रागावला. एक हात वर उडवून



चालते व्हा इथून. मी स्वतः या गृहस्थाबद्दल हमी देतो...

त्याने पोलिसांना जाण्याची खूण केली. परंतु पोलिसांनी त्याच्याकडे लक्ष दिले नाही. ते मख्ख चेहेऱ्याने जिरॉद्‌ला म्हणाले, " म्हातारबाबा, तुमचे कागद पाहू द्या."

जिरॉद्‌ने मान वर करून त्या पोलिसांकडे पाहिले, आणि वेळ काढण्याकरता उगाचच विचाले, " अं ? काय म्हणता ?"

" मूर्ख माणसा, कागदपत्र दाखव तुझे."

जिरॉदने कोटाच्या खिशात हात घातला आणि तो कागदपत्र शोधण्याचा बहाणा करू लागला· आपला चेहरा त्याने प्रयत्नपूर्वक शांत ठेवला होता. खरी आणी-बाणीची वेळ हीच होती. ओळखपत्रावरील उंचीचा व वजनाचा निर्देश पाहायचा अवकाश, की पोलिसांनी जिरॉदला अटक केली असती. कारण पळालेल्या फ्रेंच जनरलशी त्याचे पुष्कळच साम्य होते; आणि त्याची यथासांग परीक्षा केल्यावाचून कोणीही त्याला पुढे जाऊ देणे शक्य नव्हते. जिरॉद्‌ला वाटले, आता सगळे या कॅप्टनसाहेबांवर अवलंबून आहे. त्यांनीच नकळत मदत केली तर. आपल्याला आश वाटते तितका तो खरोखरच चिडला असेल तर काय बहार होईल.

" सार्जंट " कॅप्टनसाहेब पोलिसांना उद्देशून कडाडले.

" काय साहेब?"

" डब्यातून चालते व्हा तुम्ही "

" पण साहेब आम्हाला कागदपत्र "

" चालते व्हा. " संतापाने कॅप्टनचा चेहेरा लालीलाल झाला होता. पोलिसांच्या चेहऱ्यावर पडलेली भीतीची छाया जिरॉद्ने पाहिली. इकडे कॅप्टनसाहेब कडाडतच होते. ' मी स्वत: या गृहस्थाबद्दल हमी देतो; मग तर झालं ? आता तरी डबा सोडून चालते व्हाल की नाही तुम्ही ?'

' पण–' सार्जंट अडखळत म्हणाला,

कॅप्टनसाहेबांनी नुसत्या जळजळीत नजरेने सार्जंटकडे पाहिले आणि ते म्हणाले, ' पण नाही आणि परंतु नाही. डब्याबाहेर जा म्हणजे डब्याबाहेर जा. '

हिरमुसल्या चेहऱ्याने पोलिसांनी टाचा जुळवल्या आणि उलटे फिरून ते डब्याबाहेर निघून गेले. त्याच्यामागोमाग दुसराही पोलीस गेला.

' ही गेस्टॅपोची माणसं समजतात तरी कोण स्वत:ला ?' कॅप्टनचा त्यांच्यावरचा राग अजून ओसरला नव्हता, ' मी तुम्हाला सांगतो, ही माणसं आपल्या आईचीदेखील झडती घ्यायला कमी करणार नाहीत. '

जिरॉद हसून म्हणाला, ' आभारी आहे मी तुमचा. परंतु माझी झडती त्यांनी घेतली असती तरी काहीच हरकत नव्हती. आणि शिवाय त्यांची काय चूक ? तें तर बिचारे आपलं कर्तव्यच करत होतें. '

' कर्तव्य ? कर्तव्य कशाशी खातात हे कधी समजेल का त्यांना ? ते काही सैनिक नाहीत; ते आहेत पोलीस. इकडे तिकडे उचकाउचक करणारे. तेवढंच त्यांनी करावं. पण ते जाऊ द्या. मी तुम्हाला सांगत होतो की– कॅप्टनने चावललेले उत्तर ऑफ्रिकेमधील मोहिमेचे विश्लेषण जिरॉद् मन लाऊन ऐकत राहिला. कॅप्टन रंगात येऊन खुलासेवार विवेचन करत होता, आणि गाडी हायडेलबर्ग सोडून दक्षिणेला स्वित्झर्लंडच्या रोखाने निघाली होती.

## मायदेशाच्या कुशीत

पुढे काय करायचे ते जिरॉद्ने काळजीपूर्वक ठरवले. मनातल्या मनात त्याची एकदा उजळणी केली. लोराक येथे जर्मनी, स्वित्झर्लंड आणि फ्रान्स या तीन देशांच्या सरहद्दी एकमेकाला भिडलेल्या होत्या. दक्षिणेला काही मैलांवर स्वित्झर्लंडमधील बासल हे ठिकाण होते, आणि पश्चिमेला फ्रान्समधील मॉंटबेलिआर हे शहर होते. परंतु खास परवान्याशिवाय सरहद्द ओलांडण्याची परवानगी कोणालाही नव्हती. हा खास परवाना जिरॉद्जवळ कोठून असणार ? त्यामुळे गाडी लोराकला पोचण्यापूर्वीच तिच्यातून उडी टाकायची आणि सरहद्दीवरचा पहारा चुकवून फ्रान्समध्ये प्रवेश करायचा, असे जिरॉद्ने ठरविले होते.

जिरॉद् उभा राहिला. हात वर करून त्याने आळोखे-पिळोखे दिले, आळस झटकला, डब्यामधील लोकांची नुसती मान हलवूनच रजा घेतली, आणि त्याने डबा सोडला. डब्याच्या बाहेर असलेल्या लांबलचक मोकळ्या जागेतून चालत जिरॉद् दरवाजाशी येऊन उभा राहिला. लोराक जवळ आल्यामुळे गाडीची गती मंदावली होती. जिरॉद्ने दरवाजा उघडला. झाडे मागे मागे पळत होती. त्याने एक दीर्घ श्वास घेतला आणि शरीर गाडीबाहेर झोकून दिले.

पलीकडे असलेल्या दगडाळ भागावर जिरॉद् आदळला. त्याच्या खांद्यातून एक वेदना उठली, आणि तिने त्याच्या साऱ्या शरीराचा कबजा घेतला. मात्र त्यापूर्वीच जिरॉद्ने लोळण घेतली होती. उतार असल्यामुळे लोळत लोळत, ठेचाळत, धक्के खात अखेर जिरॉद् एका झुडुपापाशी अचानक अडला. मोठ्या कष्टाने तो बसला. परंतु वेदना त्याला असह्य होत होती. प्रयत्न करूनही त्याला अश्रू आवरणे शक्य झाले नाही. तो पुन्हा जमिनीवरती कोसळला. आणि लोळत थोडा दूर गेला. मग तो कसाबसा उठून बसला आणि त्याने हलक्या हाताने आपल्या खांद्याला मालीश करायला सुरुवात केली वेदनेची तीव्रता थोडी कमी झाली. श्रमामुळे त्याची छाती धपापत होती. अश्रूंमुळे सारे अंधुक झाले होते. ओठावर दात घट्ट रोवून त्याने वेदना जिरवली. तो निर्धाराने उभा राहिला. त्याला वाटले, काही वर्षांपूर्वी हे घडले असते तर आपल्याला काहीच झाले नसते. तेव्हा आपली प्रकृती कशी लोखंडाच्या कांबीसारखी मजबूत होती; आणि आता; 'बापरे, त्रेसष्ट वर्षांचे म्हातारबाबा आहोत आपण!'

दुखऱ्या पायांनी धडपडत त्याने लोराकला वळसा घातला. अखेर तो सरहद्दी-पाशी येऊन पोचला. रस्त्याच्या कडेला ओळीने असलेल्या विशाल वृक्षांपैकी एका वृक्षाआड तो दडला आणि समोर रस्त्यावर असलेला आडवा अडथळा बारकाईने न्याहाळू लागला. रस्त्याला जेथे फाटा फुटत होता तेथेच एक लाकडी चौकीवजा झोपडी त्याला दिसली. उजव्या बाजूला जाणारा रस्ता फ्रान्सकडे जात होता. आणि सरळ जाणारा रस्ता स्वित्झर्लंडकडे गेला होता. या प्रत्येक रस्त्यावर आडवे लोखंडी खांब टाकले होते. रस्त्याच्या दुबेळक्यात एकच सैनिक पहारा करत उभा होता. सरहद्दीवरती एकच सैनिक कसा असेल? जिरॉद्ला वाटले. निश्चितच त्याचे सहकारी त्या झोपडीमध्ये डुलक्या घेत असणार.

तो कण्हत, सरपटत पुढे निघाला. त्याच्या देहाची डावी बाजू ठणकत होती. थोडे अंतर गेल्यानंतर विश्रांतीसाठी तो थांबला. त्याच्या मनात आले, आपली ही धडपड यशस्वी होण्याची खरोखरी किती शक्यता आहे? अशी सुटका करून घ्यायला माणूस तरुणच पाहिजे. ६३ वर्षांच्या खिळखिळ्या दमल्याभागल्या शरीरा-कडून हे होणे नाही.

तरीही जिरॉद् सरपटत पुढे जातच राहिला. आता तो अगदी सरहद्दीशी येऊन

पोचला. डाव्या बाजूला अवघ्या पन्नास कदमांवर लोखंडी शिरस्त्राण घातलेला तो उग्रमुख पहारेकरी खडा होता. जिरॉद् काळजीपूर्वक फ्रान्सकडे सरपटत होता. त्याचे ठुसठुसणारे सांधे कुरकुरत होते. त्यांचा केवढातरी आवाज होतो आहे, असे त्याला वाटले. धपकन् गाल जमिनीला लावून आणि डोळे त्या पहारेकऱ्यावर खिळवून जिरॉद् निश्चल पडून राहिला. सरहद्द आता चार हातांच्या अंतरावर होती. नंतर त्याने स्वतःची समजूत घातली. आपल्या या दुखऱ्या शरीरातील हाडांचा खटखटाट जर्मनांना थोडाच ऐकू येणार आहे ? आता फारसा विचार न करता सरळ मायदेशाच्या कुशीत शिरावे हे उत्तम.

जिरॉद्ने शरीर पुन्हा ढकलले. थोड्या वेळातच त्याने सरहद्द पार केली. मॉंटबेलिआर अवघ्या एक मैलावर होते. येथे अगदी जर्मनांच्या नाकावर टिच्चून त्याला मदत मिळू शकणार होती. मॉंटबेलिआरच्या जवळच असलेल्या एका टेकडीवरती जिरॉद् येऊन पोचला. परंतु आता पुढे जाण्याचे त्राण त्याच्या देहात उरले नव्हते. इच्छा नसतानादेखील तो जमिनीवर पसरला. आणखी तासाभरात नवा दिवस उगवणार होता, आणि इतर कोणत्याही फ्रेंच माणसाप्रमाणेच जिरॉद्देखील मॉंटबेलिआरमध्ये शिरू शकणार होता.

## तुम्ही जिरॉद तर मी नेपोलियन

जिरॉद्ला जाग आली तेव्हा सूर्य चांगलाच वर आला होता. डोळे चोळून त्याने झोप घालवली. आणि तो उभा राहिला. समोर मॉंटबेलिआर एखाद्या चित्रासारखे दिसत होते त्याला. खुशीतच त्याने टेकडी उतरायला सुरुवात केली. वीस मिनिटांनी मुख्य रस्त्याच्या तोंडावरच असलेल्या एका कॅफेमध्ये त्याने प्रवेश केला. कॅफे अगदी रिकामेच होते फक्त मद्यपानासाठी खास केलेल्या जागेच्या पलीकडे एक जाडगेला तरुण माणूस एकाग्रतेने पुसापुशी करत होता. जिरॉद् आत शिरला तेव्हा त्याने जिरॉद्कडे संशयाने पाहिले.

'नमस्ते' जिरॉद् मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने फ्रेंचमध्ये म्हणाला. फ्रेंच बोलण्याची संधी कितीतरी काळाने मिळाली होती त्याला.

'तुम्ही मॉंटबेलिआरमधले दिसत नाही ?' त्या तरुणाने विचारले. त्याच्या नजरेमधील संशय अधिकच तीव्र झाला होता.

'नाही.' जिरॉद्ने उत्तर दिले.

त्या तरुण माणसाने उगाचच डोके हलवले. या संशयास्पद दिसणाऱ्या म्हाताऱ्याने आणखी काहीतरी बोलावे असे त्याला वाटत असावे.

'मला थोडे मद्य मिळेल काय ?' जिरॉदने विचारले.

त्या तरुणाने जिरॉद्चे शब्द नीट काळजीपूर्वक ऐकले. त्या शब्दांमधील लकब ठसका जाणून घेण्याचा प्रयत्न केला. हा अनोळखी माणूस फ्रेंच बोलणारा जर्मन हेर आहे, की दुसऱ्या एखाद्या खेड्यामधील फ्रेंच माणूसच आहे, याचा निर्णय

त्याला करता येईना. त्यामुळ त्याने विचारले, ' कोठून आलात तुम्ही ?'

जिरॉद्ने त्याच्याकडे दीर्घकाळ रोखून पाहिले. त्याच्या नजरेमधील विखार आणि भीती अजमावण्याचा प्रयत्न केला. आणि विचारले, 'ते एवढं महत्त्वाचं आहे का हे ?'

' वा ! अशा काळात ते निःसंशय महत्त्वाचं आहे. तुम्ही कोण आहात आणि या शहरामध्ये कशाला आला आहात ?' मग तो अधिक धिटाईने म्हणाला, ' हा अव्याप्त फ्रान्स आहे म्हटलं. आम्ही अजून मुखत्यार आहोत आमचे. जर्मन हेरांना थारा मिळणार नाही इथं...'

जिरॉद् सरसावला आणि सावकाश त्याला म्हणाला, ' मी आहे जनरल हेन्री जिरॉद् !'

तो तरुण माणूस आ वासून त्याच्याकडे अविश्वासाने पाहात राहिला. मग घाईघाईने म्हणाला, ' तुम्ही हेन्री जिरॉद् असाल तर मी नेपोलियन बोनापार्ट आहे !!' त्याच्या स्वरांतील कुत्सितपणा अगदी उघड होता. त्याने त्वरेने हात खाली घातला आणि पिस्तुल काढून ते जिरॉदवर रोखले. पिस्तुल रोखतारोखताच कोणा ' माथिल्ड'च्या नावाने तो हाका मारू लागला.

हाडकुळी, कृष्णवर्णाची माथिल्ड आत आली आणि तेथील दृष्य पाहाताच तिचा हात आश्चर्याने व भीतीने आपल्या तोंडापाशी गेला.

' माथिल्ड !' त्या तरुणाने आज्ञा दिली, ' जा आणि रॉबर्टला घेऊन ये.' मग तो जिरॉद्कडे वळून म्हणाला, ' तुम्ही कोण आहात ते पाहूच आता आपण.'

माथिल्ड कॅफेमधून त्वरेने बाहेर पडली. कॅफेमध्ये जिरॉद् आणि तो माणूस अस्वस्थपणे उभे होते. अखेर जिरॉद् एका खुर्चीवर बसला. त्याचे शरीर अजून ठणकतच होते. दोन आठवडे जर्मनमध्ये वणवण करावी लागली होती त्याला. आणि इतक्या भयंकर दिव्यातून बाहेर पडून मायदेशी आल्यानंतर या जीवघेण्या विनोदी नाटकात भूमिका करावी लागत होती त्याला. अगदी अती झाले आणि हसू आले, यातील प्रकार झाला होता. जिरॉद्च्या नकळत त्याला हसू फुटले. मात्र हसण्याचे मजले उंच चढण्याआधीच, त्या माणसाला भिऊन, जिरॉद्ने हास्य गिळून टाकले.

## सुटकेबद्दल मानपदक

काही वेळानंतर माथिल्ड एका बुटक्या परंतु काटक माणसाला घेऊन कॅफेमध्ये आली. हा बुटका माणूस एखाद्या फ्रेंच कामगारासारखा दिसत होता. त्याने जिरॉदकडे रोखून पाहिले आणि अविश्वासाने मान हलवली. तो म्हणाला, ' हे म्हणजे विलक्षणच आहे. मिशी लावली तर हे सदगृहस्थ थेट जनरल जिरॉद्सारखे दिसतील यात बिलकुल शंका नाही.' त्याने आपल्या सदऱ्याच्या खिशातून एक चुरगळलेला वर्तमानपत्राचा कागद काढला आणि त्याच्याकडे एकदा पाहून नजर पुन्हा जिरॉद्वर रोखली. मग त्याने तो कागद त्या तरुण माणसाला दाखवला आणि दोघांनी

जिरॉद्चे पुन्हा निरीक्षण केले.

जिरॉद् हळूहळू उठून उभा राहिला. 'मग म्हणता काय तुम्ही?' त्याने विचारले.

'आम्हाला खात्री करून घ्यायला नको काय?' तरुण माणसाने उलट विचारले.

'खात्री कसली करतोय?' रॉबर्ट म्हणाला आणि जिरॉद्जवळ येत उद्गारला, 'जनरलसाहेब आपल्या सुटकेबद्दल फ्रान्सच्या वतीनं मी आपलं हार्दिक अभिनंदन करतो. आपल्या सेवेला हा बंदा हाजीर आहे साहेब.'

'आभारी आहे मी तुझा.' जिरॉद म्हणाला. 'आता मला असं सांगा: इथून जवळच एखादो सुरक्षित जागा आहे काय? विश्रांतीची अत्यंत गरज आहे मला. दरम्यान, रॉबर्ट, या जिल्ह्यातल्या प्रतिकारी चळवळीच्या प्रमुखाला गाठायचं तू आणि कसंही करून मला भेटायला सांगायचं.'

'ठीक आहे जनरलसाहेब. आता जर तुम्ही माझ्याबरोबर आलात, तर एका शेतावर जाऊ आपण. इथून जवळच आहे ते. तेथल्या झोपडीत खुशाल राहा आपण. काळजी करायचं बिलकुल कारण नाही.'

शेतावरील झोपडीत जिरॉद् तब्बल वीस तास झोपून होता. दुसऱ्या दिवशी दुपारी तो उठला तेव्हा जॅकस या सांकेतिक नावाचा प्रतिकारी चळवळीचा प्रमुख तो उठण्याचीच वाट पाहात तेथे बसला होता.

दोघांनी परस्परांना मिठी मारली आणि जिरॉद् समोर आलेल्या खाद्यपदार्थांचा समाचार घेत असतानाच जॅकसने स्थानिक प्रतिकारी चळवळीची तपशीलवार माहिती जनरलसाहेबांना पुरवली.

माहिती ऐकून जिरॉद्ला संतोष वाटला. जॅकसला त्याने मधूनमधून शाबासकी दिली. खाणे संपल्यावर त्याने खुर्ची मागे ढकलली आणि उभा राहात निश्चयाने तो म्हणाला, 'पॅरिसला जाण्याची उत्सुकता आहे मला. मला वाटतं मी तिथं असलो तर फ्रान्सला अधिक उपयोग होईल माझा.'

जॅकस हसला आणि नकार देत म्हणाला 'जनरलसाहेब पॅरिसला जाण्याचा विचारसुद्धा करू नका. तिथं गेलात तर जर्मनांच्या हातात अचूक सापडाल तुम्ही. तुमचं संरक्षण करणं आम्हाला शक्य होणार नाही. अहो इथल्या या जर्मनांनी न व्यापलेल्या फ्रान्समधेदेखील ते कठीणच आहे. तुम्ही सरहद्द ओलांडीत हे कळलंय जर्मनांना; आणि तुम्हाला पकडून नेण्याचे जारीनं प्रयत्न चालवलेत त्यांनी.'

'वा, तुमचं हेरखातं भलतंच कार्यक्षम दिसतं आहे.' जिरॉद् म्हणाला.

जॅकसने खांदे उडवले. तो म्हणाला 'आमच्या एवढे तरी हेर जर्मनांकडे निश्चत आहेत; आणि ते चांगले कार्यक्षमदेखील आहेत. आपल्या या भेटीची हकीकतसुद्धा एकदोन दिवसांतच कळेल त्यांना. मला वाटतं, जनरलसाहेब, तूर्त काही काळ मार्सेलसला जावं तुम्ही. ते सर्वांत शहाणपणाचं ठरेल.'

जिरॉद्च्या अद्भुत सुटकेमुळे फ्रान्समध्ये चैतन्याची लाट उसळली. तो लोकनेता झाला. पराभूत आणि केविलवाण्या फ्रेंच जनतेचे मूर्तिमंत आशास्थान बनला. सर्वत्र दिसणाऱ्या 'व्ही (फॉर व्हिक्टरी)' या अक्षराबरोबरच जिरॉद्चे नाव फ्रान्स-मधील भिंतीभिंतीवर आणि रस्त्यारस्त्यार रंगवले गेले. यामुळे जर्मनांचा नुसता संताप झाला. अव्याप्त फ्रान्सच्या व्हिशी सरकारने जिरॉद्ला कैद करून पॅरिस येथील गेस्टॅपोच्या प्रधान कार्यालयात दाखल करावे, अशी मागणी जर्मनांनी केली. अव्याप्त फ्रान्सचा वृद्ध नेता पिअेर लावाल याने मार्शल पेटेनला बोलावून घेतले. पहिल्या महायुद्धात मोठी मर्दुमकी गाजवणाऱ्या आणि आता जर्मनीला अनुकूल असलेल्या फ्रेंच सैन्याचा सरसेनापती असलेल्या पेटेनचा पुराणा अभिमान उफाळून आला. जिरॉद्ला कैद करण्यास त्याने सपशेल नकार दिला.

व्हिशी सरकारच्या नकाराची बर्लिनमधील प्रतिक्रिया अत्यंत तीव्र होती. जिरॉद्चा खून करा, असा हुकूम हिमलरने पॅरिसमधील गेस्टॅपोच्या प्रधान कार्या-लयाला पाठवला. हेन्री जिरॉद्ची शिकार करण्यासाठी कितीतरी नाझी हेर अव्याप्त फ्रान्समध्ये घुसले.

मार्सेल्सच्या बाह्य परिसरातील एका छोटयाशा घरात जिरॉद्ची व्यवस्था भूमि-गत कार्यकर्त्यांनी केली होती. एके रात्री खुर्चीत बसून पेंगत असताना दरवाजा अचानक उघडला. त्या आवाजाने जिरॉद् खडबडून जागा झाला. दारात एक भेदर-लेला तरुण उभा होता. तो म्हणाला, ' जनरलसाहेब, त्वरा करा, मागच्या जिन्यानं तावडतोब पळून जा. '

' पण काय झालं तरी काय ?"

' जर्मन्स ! तुम्हाला शोधत अचूक इथं येऊन पोचले आहेत. तुम्ही बागेमधून बाहेर पडा आणि कोपऱ्यावर जा. एक मोटार उभी असेल तिथं. पिएर आणि मी घेतो त्या जर्मनांचा समाचार पण घाई करा. '

जिरॉद् ताडकन उठला आणि दरवाजातून धावत सुटला. धडधड जिना उतरून जिरॉद् बागेमध्ये पोचला आणि त्याच्या कानावर गोळीबाराचा आवाज पडला. जिरॉद्ने मागे घराकडे नजर टाकली. प्रकाशझोत घराचा इंचनइंच प्रकाशित करत होते. गोळीबाराचे आवाज येतच होते. आता जिरॉद्च्या लक्षात आले, की स्वतःच्या प्राणांची किंमत देऊन त्या फ्रेंच कार्यकर्त्यांनी जिरॉद्ला आवश्यक असलेला थोडा कालवधी विकत घेतला होता. बागेचा दरवाजा उघडून तो कोपऱ्याकडे वळला. कोपऱ्यावर मोटार उभीच होती. जिरॉद् मोटारीत बसताच ती सुरू झाली आणि तिने लगेच वेग घेतला.

तेव्हापासून एका घरामधून दुसऱ्या घरामध्ये अशी जिरॉद्च्या निवासाची व्यवस्था भूमिगत कार्यकर्त्यांनी सारखी बदलत ठेवली. मागावर असलेल्या जर्मन मारेकऱ्यांना हुलकावणी देण्यासाठी तसे करणे भागच होते. एखादी रात्र मार्सेल्स

बंदराजवळच्या इमारतीतील एखाद्या कुबट खोलीत घालवावी लागे, तर दुसरी शहराच्या मध्यभागी असलेल्या एखाद्या टुमदार ठिकाणी घालवणे शक्य होई. या भ्रमंतीमध्ये, गलिच्छ वेश्यागृहे, खलाशांची वसतीगृहे आणि इतर, सहसासहजी कोणी वस्ती करणार नाही अशा जागा, जिरॉद्ला चांगल्याच परिचित झाल्या.

असे महिन्यांमागून महिने गेले तरीही जिरॉद्चा अज्ञातवास संपण्याचे चिन्ह दिसेना. नाझींनी फर्मावलेली मृत्यूची शिक्षा चुकवून, जिरॉद् शिकारी पाठीमागे लागलेल्या एखाद्या जनावरासारखा पळत होता. त्यामुळे त्याच्या धाडसी सुटकेला काही अर्थच उरला नव्हता.

नंतर चोवीस ऑक्टोबर १९४२ रोजी, फ्रान्सपासून १५०० मैल अंतरावरील अल्जियर्स येथे चाललेल्या एका गुप्त चर्चेत हेन्री जिरॉद्ची सुटका हाच महत्त्वाचा चर्चाविषय बनला. या ठिकाणी दोस्तांना अनुकूल असलेल्या फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांची व अमेरिकन जनरल मार्क क्लार्क यांची गुप्त बैठक चालली होती. फ्रेंच उत्तर आफ्रिकेचा कबजा कसा घ्यावा हा चर्चेचा विषय होता. जनरल क्लार्कला कोणीतरी सांगितले, "आमच्या फौजांनी जर दोस्तांना विरोध केला नाही तर उत्तर आफ्रिकेची मोहीम भलतीच सापी होऊन जाईल. परंतु दुर्दैवाने आम्ही जर्मनसेवेची शपथ घेतली आहे. जर्मनांनी एकदा मार दिल्यामुळे आमच्या फौजा दिङ्मूढ झाल्या आहेत. नाझीविरुद्ध त्या फौजांचे नेतृत्व करू शकेल असा एकही फ्रेंच माणूस ठाऊक नाही मला."

जनरल क्लार्क एक क्षण मूकपणे उभा राहिला; मग म्हणाला, "पण जर्मनीचं फ्रान्सशी शत्रुत्व नाही का? नाझींना हुसकून लावलं तरच फ्रान्स मुक्त होईल, एवढंसुद्धा कसं कळत नाही त्यांना? ते करण्यासाठी प्रथम आफ्रिका पुन्हा जिंकून घेणं अत्यावश्यक आहे."

"खरं आहे. पण आम्ही पराभूत होत आहोत. आशा आणि अभिमान या दोहोंचाही अभाव आहे आमच्यापाशी. अशा हतबल सैनिकांमध्ये कोण चैतन्य निर्माण करणार?" खोलीमधील सर्व अधिकाऱ्यांचा हाताने निर्देश करत खेदाने तो जनरल उद्गारला "आम्ही सारे नालायक आहोत ते करायला."

मग एक उंच अधिकारी एक पाऊल पुढे सरसावला. आत्तापर्यंत तो गप्पच होता. "मित्रहो," जनरल चार्ल्स मास्ट म्हणाला, "एका माणसाचं नाव-मी सुचवू शकेन, ते म्हणजे जनरल हेन्री जिरॉद्."

क्लार्कने त्या फ्रेंच जनरलकडे दीर्घकाल रोखून बघितले. अखेर तो म्हणाला "आपल्या कामासाठी जिरॉद् अगदी योग्य माणूस आहे. परंतु फ्रान्समध्ये जवळ जवळ कैदेत असल्यासारखीच अवस्था आहे ना त्याची?"

मास्टने खांदे उडवले. तो म्हणाला "तसं असेल तर कसंही करून बाहेर काढला पाहिजे त्याला."

क्लार्क हसला आणि आश्वासन देत म्हणाला "काळजी करू नका. आम्ही जरूर व्यवस्था करतो त्याची."

तीन रात्रीनंतर जनरल जिरॉद् एका रबरी होडीमधून एका ब्रिटिश पाणबुडीच्या डेकवरती चढला. उत्तर आफ्रिकेमध्ये फ्रेंच सेनेचे नेतृत्व करण्यासाठी तो अगदी वेळेवर येऊन पोचला होता. या फ्रेंच सेनेने टयुनिशियामध्ये अमेरिकनांच्या बरोबरीने मोठी मर्दुमकी गाजवली. आपल्या प्रिय मायदेशामधून जर्मनांना हाकललेले याची देही याची डोळा पाहण्याचे भाग्य जिरॉद्ला लाभले. १९४९ साली मृत्यू पावण्यापूर्वी काही काळ, कॉनिग्सटाईन तुरुंगामधील धाडसी सुटकेबद्दल एक मानपदक जिरॉद्ना बहाल करण्यात आले होते.

## स मा प्त

---

'मी बहुधा खऱ्या रणगाड्यांनी
जितक्या लढाया जिंकल्या
त्यापेक्षा अधिक लढाया
बनावट रणगाड्यांनीच जिंकल्या असाव्यात'

# –रोमेल

पुढील अंकाचे एक आकर्षण

निवेदन : अनंत भावे

---

## भारतीय मुस्लीम आणि परकीय राज्यकत.... पृष्ठ १७ वरून

आहेत. सोव्हिएट युनियनमध्ये १० मुसलमान येतील, तर चीनमध्ये त्यांचे प्रमाण २० टक्क्यांवर असण्याची शक्यता आहे. इंडोनेशियात हिंदू, बौद्ध व ख्रिस्ती शेकडा दहा आहेत तर थायलँडमध्ये मुसलमान शेकडा दहा, तर फिलिपाईन्समध्ये शेकडा पाच असे प्रमाण आहे. मलेशियात बिगर मुस्लिमांची संख्या शेकडा ४५ पर्यंत जाते. हेच प्रमाण इथिओपियात तेवढेच आहे. इजिप्तमध्ये ख्रिस्ती शेकडा १० तर लेबेनान या अरब राष्ट्रात ख्रिस्ती शेकडा ५१–५२ येतात. नायजिरियात मुसलमानांची संख्या शेकडा २५ येते तर सूदानमध्ये बिगरमुस्लिमांची संख्या शकडा ३३ पर्यंत आहे.'

'तुम्ही ही तर धार्मिक टक्केवारी सांगितली. पण पंथभेदामुळे संघर्ष होतो अशी उदाहरणे आपण सांगू शकाल काय?'

"सोपे आहे. इस्लाम धर्मातील सर्वांत प्रमुख भेद म्हणजे शिया व सुनी यांच्यातील होय. १३०० वर्षांपूर्वी सुरू झालेला हा भेद अद्याप मिटलेला नाही. उदाहरणार्थ, इराक देशात शिया शेकडा ४० तर सुनी शेकडा ६० आहेत. भारतीय मुसलमानात शिया शेकडा १५ येतील. अरबस्थानातील यवनचे राज्य हे पूर्णपणे शिया आहे. इराण यवनप्रमाणे शिया पंथीय राज्य होय. पाकिस्तानात शियांची संख्या शेकडा दहा येते. इतिहासात धार्मिक कारणांवरून शिया व सुन्नी राज्याचे संघर्ष अनेक वेळा घडून आले आहेत. मुसलमानांच्या भावनात्मक एकीकरणामध्ये त्यांच्यातील या भेदाची दखलही महत्त्वाची ठरते. या संदर्भात सिरिया-पॅलेस्टाईनमधील ध्रुज या मुसलमानी समाजाची माहिती तुम्हाला असेलच."

"हां, ध्रुजांना हे मुसलमान काफर समजतात. पाकिस्तानातील अहमदीयांनाही हाच अनुभव आला आहे."

"धर्म वा पंथ या भेदांखेरीज इतर काही प्रवृत्ती भावनात्मक एकीकरणाच्या आड येणाऱ्या आहेत का?"

"हो, आहेत. उदाहरणार्थ, इराकमधील बिगर अरब असलेले खुर्द जमातीचे लोक हे शेकडा २० पर्यंत आहेत. ते इराण, तुर्कस्थान आणि इराक या तीन देशातून पसरले आहेत. त्यांचे भावनात्मक एकीकरण अद्याप झालेले नाही. सूदानमधील अरब व अरबेतर, अल्जेरिया व मोरोकोमधील अरब आणि बर्बर, फार काय, झांजीबार बेटातील अरब मुसलमान व आफ्रिकी मुसलमान, अरब राष्ट्रातील तुर्क अल्पसंख्यांक यांचे प्रश्नही कमी महत्त्वाचे नाहीत."

"याचा अर्थ, धर्म हा भावनात्मक एकीकरणाचा एकमेव दुवा आहे किंवा प्रमुख दुवा आहे असे म्हणता येणार नाही."

"आपला तर्क बरोबर आहे. धर्म ही एक बाब म्हणता येईल, पण वंश, भाषा आणि संस्कृती याही महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

"या संदर्भात बांगला देशाविषयी आपले काय मत आहे ?"

"अलीकडच्या घटनांनी संस्कृती, वंश व भाषा यांच्यापुढे धर्माचा पाया ढासळून पटलेला आपण पाहातोच आहोत. पश्चिम पाकिस्तानी हे इस्लामच्या नावावर बांगला देशाला आपल्या ताब्यात ठेवू शकले नाहीत."

भारतीय मुसलमानांचा प्रश्न या दृष्टीने सोडविण्यात कशी मदत होईल ?"

आपल्या निधर्मी राज्यघटनेमुळे सर्व नागरिकांना समान हक्क प्राप्त झाले आहेत. इतिहासातील तथाकथित वर्चस्वाच्या कल्पनांचा पगडा भारतातील काही व्यक्तींच्यावर चुकीच्या इतिहास वाचनाने बसला आहे. तो भ्रम दूर होण्याब बांगला देशाच्या अलीकडील घटनांनी मदत होऊ शकेल."

"आपले म्हणणे मला नीटसे कळले नाही."

"थोडे स्पष्ट करतो. एके काळी आपण भारतावर वर्चस्व गाजविले आहे या समजुतीने भारतीय मुस्लीमांपैकी काही जण घटनेने दिलेल्या समान हक्काचे महत्त्व जाणीत नाहीत. खरे पाहता भारतीय मुसलमानांनी भारतावर वर्चस्व गाजविल्याचा इतिहासात काही पुरावा नाही. भारतावर म्हणजे संपूर्ण हिंदुस्तानावर किंवा देशाच्या बहुअंश भागावर एक केंद्रित असलेली भारतीय मुसलमानांची अशी सत्ता कधीच अस्तित्वात आली नाही. काही फुटकळ प्रांतीय राजघराणी होती एवढेच."

"आपल्या विमानाने मला आश्चर्याचा धक्काच बसला—अकबर, अल्लाउद्दीन खिलजी, महंमद तुघलक, औरंगजेब वगैरेंविषयी आपले काय म्हणणे आहे ?"

"सोपे आहे. हे लोक तुर्क होते. वंशाने तुर्क होते. भारतीय मुसलमानांशी त्यांचा काहीही संबंध नव्हता. भारतावर दिल्लीहून जो राज्ये झाली ती प्रामुख्याने तुर्की होती. आपण भारतीय नाहीत, आपण परकीय तुर्क आहोत याची जाणीव या घराण्यांना औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत होती. त्यांच्या धर्माचा उल्लेख करून आपण त्यांच्यात आणि भारतीय मुसलमानात विनाकारण एक नाते जोडले आहे. त्यामुळे भारतीय मुसलमानांमध्ये गझनी, घोरी, खिलजी, मोंगल इत्यादींचे पराक्रम हे आपलेच पराक्रम असे समजण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. वास्तविक पाहाता भारतीय मुसलमानाला या देशातील सत्तेत कधीच वाटा मिळाला नाही, राज्यकर्ते वंशांनी आपल्यापासून भिन्न होते, संस्कृतीनेही आपल्यासारखे नव्हते, उलट भारतातील बहुसंख्य समाज हा धर्माने भिन्न असला तरी भाषा आणि संस्कृती या दृष्टीने राज्यकर्त्या तुर्कांच्या पेक्षा कितीतरी जवळचा होता व आहे ही जाणीव भारतीय मुसलमानात अधिकाधिक प्रमाणात होऊ लागेल. हे फळ बांगला देशातील घटनामुळे आपल्याला लाभेल. म्हणून बांगला देशातील घटनांचे आपल्या

लोकशाहीने स्वागत करायला पाहिजे."

" स्वागत करू. पण त्याआधी माझ्या दोन समस्यांचे उत्तर द्या."

' कोणत्या समस्या ?'

' पहिली समस्या, या तुर्कांनी भारतीय स्त्रियांशी लग्ने लावली. त्यांना झालेल्या मुलांवर भारतीय संस्कार नव्हते का ? ते खरे असेल तर त्यांना आपण परकीय कसे समजावे ?'

' याचे उत्तर कठीण नाही. या लोकांची संस्कृती पितृप्रधान होती, मातृप्रधान नव्हती. उदाहरणार्थ, इराणमध्ये अरब राज्यकर्त्यांनी शेकडो इराणी स्त्रियांशी लग्ने केली. तरीपण इराणच्या इतिहासात, मुस्लीम इराणच्या इतिहासातही, अरब राज्यकर्ते किंवा त्यांची राजवट ही परकी म्हणून नोंदली जातात. इजिप्तमधील फरुकचे राज्यघराणे हे वंशाने आल्बानियम तुर्क होते, अरब नव्हते. ही जाणीव इजिप्तच्या लोकांना होती. तेराव्या शतकात मंगोलांनी इराणमध्ये राज्य केले. तेथील स्त्रियांशी लग्ने केली. तरी पण ते इराणच्या इतिहासात परकेच मानले गेले. चीनमध्ये मंगोलांचे राज्य होते. आपण कुबलाईखानचे नाव ऐकले असेल. चीनमध्ये या मंगोल घराण्याचे राज्य १०० वर्षे चालले आणि त्यांनी सारा चीन आपल्या सत्तेखाली आणला. चिनी स्त्रियांशी त्यांनी लग्ने लावली. तरीही ते परकीयच मानले गेले. महत्त्वाचा मुद्दा हा, की जोपर्यंत मोगलांना आणि तुर्कांना आपण भारतात परकीय आहोत आणि भारतीयांवर सत्ता गाजवीत आहोत ही जाणीव प्रकर्षाने होती तोपर्यंत ते परकीयच समजले जाणार. त्यांनी येथील किती स्त्रियांशी लग्ने केली हा मुद्दा महत्त्वाचा नाही. तुर्क मोगलांच्या राजवटीत अगदी नादीरशहाच्या स्वारीपर्यंत आम्ही परकीय आहोत आणि प्रजा ही भारतीय आहे–मग ती हिंदू असो, की मुसलमान असो, ही जाणीव तुर्क व मोगल राज्यकर्त्यांना होती. इतकेच नव्हे तर अगदी औरंगजेबाच्या काळात मध्य आशिया व इराणमधून परकीयांची वर्दळ सारखी चालू होती आणि मोगल कारभारात शेकडा ८० च्या वर जागा या परकीयांकडे होत्या. '

' यास पुरावा काय ?'

' हा घ्या पुरावा. औरंगजेबाच्या ५० वर्षांच्या कारकीर्दीत त्याच्या साम्राज्याच्या २२ प्रांतावर १३७ सुभेदार नेमले गेले. त्यांपैकी १३० हे तुर्क किंवा इराणी होते आणि तेही रास्त अगर त्यांचे वडील इराण किंवा तुर्कस्थानातून आलेले होते. त्यात भारतीय मुसलमानांनाही कधी संधी मिळाली नाही, बाकीच्यांची गोष्टच सोडा. मग मोगल साम्राज्य भारतीयांच्या दृष्टीने परकीय नव्हते असे कसे म्हणता येईल ?'

' तुमचेच काही अर्वाचीन निधर्मी इतिहासकार तसे म्हणू लागले आहेत. '

" राजकारणावर नजर ठेवून अशी विधाने केली जातात, त्यास महत्त्व ते काय द्यायचे ?'

'मग या जुन्या मोगल वा तुर्क राज्यकर्त्यांचे आजचे वंशज तुमच्या दृष्टीने कोण व का?'

'उत्तर सोपे आहे. ते भारतीय मुसलमानच!'

'परकीय नाहीत?'

'नाही, ते भारतीयच. उदाहरणार्थ, ११ व्या शतकात इंग्लंडवर स्वारी करणारे नॉर्मन हे परकीय. पण त्यांचे जे कोणी वंशज आज असतील ते इंग्रजच, नॉर्मन नव्हे.'

'आपल्याला नीट कळले नाही तुमचे म्हणणे.'

'११ व्या शतकात नॉर्मंडीच्या विल्यमने इंग्लंडवर स्वारी करून तो देश जिंकून घेतला आणि ४०० वर्षेपर्यंत नॉर्मन राज्यकर्ते हे फ्रान्सला आपली मातृभूमी आणि इंग्लंड ही वसाहत समजून वागत होते. फ्रान्समध्ये त्यांची सत्ता संपुष्टात आल्यावरच नॉर्मन व इंग्लंडचे मूळ रहिवाशी सॅक्सन यांच्यांत भावनात्मक एकीकरण होऊन आजचा इंग्रज जन्माला आला. उदाहरणार्थ, चर्चिलचे घराणे हे मूळचे नॉर्मन. पण आज त्याला काही महत्त्व नाही. माझा म्हणण्याचा उद्देश हा मध्ययुगीन तुर्क राजकर्ते हे परकी पण त्यांचे आजचे वंशज हे शंभर टक्के भारतीय.'

'मग भारतीय मुसलमानातील राज्यकर्ते कोण होऊन गेले?'

'अगदी थोडे आणि नगण्य.'

'उदाहरणे द्या.'

'गुजराथचे सुलतान हे मूळचे राजपूत! अहमदनगरचे निझामशहा, व वऱ्हाडचे इमादशहा हे मूळचे ब्राह्मण. बंगालमध्ये राजा गणेश हा हिंदु राजा होऊन गेला. त्याचा मुलगा मुसलमान झाला. पण अशी उदाहरणे हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच. उलट हैदराबादचा निझाम हा मध्य आशियांतील तुर्क. लखनौचा नबाब हा मूळचा इराणचा. अशी उदाहरणे अनेक देता येतील. आजच्या भारतीय मुसलमानांचा मध्ययुगीन तुर्कांच्या वर्चस्वात कोणताच वाटा नव्हता. केवळ धर्मावर भार देऊन इतिहासकारांनी आजच्या भारतीय मुसलमानाला मध्ययुगीन परकी तुर्क राज्यकर्त्यांशी जोडले आहे. याची जबर किंमत आजच्या भारतीय मुसलमानांना द्यावी लागतेच आहे, पण आपलीही हानि काही कमी झाली नाही.'

'आपण मराठा इतिहास कालखंडाचा सखोल अभ्यास केला आहे. या बाबतीत मराठी राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन काय होता?'

'मराठ्यांच्या कागदपत्रात तत्कालीन राज्यकर्त्यांचा उल्लेख मुसलमान या अर्थाने कमी येतो. वांशिक भेदावर सापेक्षतः जास्त भर दिलेला दिसतो.'

'पुरावा?'

'उदाहरणार्थ, मराठे हे मोगलांचा उल्लेख ताम्र म्हणून करीत. जंजिऱ्यांच्या मुसलमानांचा उल्लेख सिद्दी किंवा शामल म्हणून करीत. विजापुरात पठाण बळावले.

अशी त्यांची तक्रार, वायव्येकडून अफगाण भारतात नवीन राज्य स्थापन करतील ह्या धोका टाळण्यासाठीच मराठ्यांनी पानिपत गाजविले – हे सर्वश्रुतच आहे. आणि त्यावेळेपर्यंत भारतीय बनलेल्या मोगल सम्राटाचे संरक्षण करण्यासाठी ते गेले हेही सर्वांना माहीत आहे.'

'याचा अर्थ, आपण आपल्या इतिहासांत हे फरक पुन्हा नव्याने केले पाहिजेत. धर्मावर भार देऊन इतिहास लिहिण्याचे काम इंग्रज साहेबाने त्यांच्या फोडा व राज्य करा या नीतीनुसार केले आणि आपण त्याला बळी पडलो – असेच खरे ना?'

'हो, बरोबर आहे. मराठ्यांचा लढा प्रामुख्याने परकीयांच्या विरुद्ध होता. परधर्मीय भारतीयांच्या विरुद्ध असण्याचे कारण नव्हते. ते लढले तुर्क, पठाण, मोगल, पोर्तुगीज, इंग्रज, डच इत्यादींशी. कारण त्यांच्या काळात भारतीय मुसलमान हे राज्यकर्ते नव्हते. राजकर्ते होते ते परकीय तुर्क. १७३८ नंतर मोगल हे भारतीय बनले. म्हणून त्यांचे संरक्षण आणि पर्यायाने भारताच्या नैसर्गिक सीमांचे संरक्षण करण्यासाठी मराठ हे परकीय अफगणांवर चालून गेले. माझा आक्षेप असा, की आपण भारतातील राज्यकर्त्यांचे उल्लेख शक, हून, राजपूत, मराठे, इंग्रज असे करतो. मग तुर्कांचेच उल्लेख मुसलमान म्हणून का करावे? इंग्रजांच्या या चलाख नीतीमुळे भारतीय मुसलमानांतील काही नेत्यांमध्ये वेगळेपणाची भूमिका निर्माण झाली. आम्हीही त्यांना वेगळे समजू लागलो. इंग्रजांनी त्यास भरपूर खतपाणी पुरविले.'

'पगडीसाहेब, आता बांगला देशात मुलांसाठी इतिहासाची पुस्तके या दृष्टीने कशी लिहली जावीत? त्यांच्या नेत्यांनी भावी पिढीस कोणच्या प्रकारे भूतकाळातील घटनांची चिकित्सा करावी?'

'अर्थात अशा इतिहास ग्रंथात धर्मावर भर राहणार नाही हे उघड आहे. कारण धर्मावर भर देण्याची किती जबर किंमत द्यावी लागली हे बांगला देशच्या नेत्यांना अनुभवाने पटले आहे. बंगालमध्ये भारतातील इतर प्रांताप्रमाणेच राज्य होते ते पठाणांचे, तुर्कांचे अगर इंग्रजांचे. अलीकडे बंगला देशावर कोणाचे राज्य होते हे न सांगताही समजण्यासारखे आहे. बंगाल देशाची जनता या राज्यकर्त्यांचा उल्लेख खान म्हणून करते एवढे म्हटले, की पुरे. मी तर असे म्हणेन, बांगला देशातील घटनेमुळे भारताचा इतिहास अधिक निरोगी पद्धतीने आणि वास्तवतेस धरून लिहिला जाऊ लागला तर लोकशाहीच्या प्रगतीस फार मोठा आधार लाभेल.'

'अगदी खरे आहे.'

पृष्ठ २० वरून

अकलंकित आत्मचरित्रच आहे. तू ते वाच.'

'तुमची एखादी सुंदरशी गोष्ट द्या ना मला वाचायला.'

'गोड गोड गोष्टी लिहिणाऱ्यांपैकी मी नव्हे.'

'डोंबल तुमचं! अहो, मग लिहिता तरी का?'

'कृतार्थ व्हावं म्हणून. शब्दागणिक लेखक कृतार्थता पावत असतो.'

'तुमचं डोकं ठिकाणावर आहे नं?'

'हा प्रश्न वाचक लेखकाला विचारू शकतो ह्यातच आजच्या पोटभरू लेखकाने सामान्य वाचकाच्या पुढ्यात निःसत्त्व कडब्याची केव्हढी रास वाढून ठेवली आहे, ह्याचं प्रत्यंतर येतं. जो उठतो तो गोड गोड लिहून मोकळा होतो! आणि मी? एक कादंबरी गेली अकरा वर्षं मी नुसती लिहितोय–लिहितोय!'

'देवा–देवा! अकरा वर्षं एका कादंबरीचं कानसकाम चालवलंय तुम्ही? अहो, कशाला एवढा खटाटोप चालवला आहे तुम्ही!'

'सामान्यांच्या वाट्याला रटाळ आणि चाकोरीमय जीवन आलेलं असतं. त्यातल्या उदात्त भागाचं दर्शन घडवून देऊन, अध्यात्मिक पातळीवरूनही आपल्या जीवनाचं अवलोकन करून धन्यतेचे क्षण अनुभविता येतात, याची खातरजमा सामान्य वाचकाला करून द्यावी, हा माझ्या लेखनामागचा हेतू आहे.'

'मग अशी किती पुस्तकं लिहिली आहेत तुम्ही?'

'असं एक पुस्तक जरी लिहून झालं तरी आमचं अवतारकृत्य संपेल!'

'काय गोष्टी करताय राव! तुमचा व्यवसाय काय?'

'लेखन.'

'आणि तरी तुमचं धड एकही पुस्तक लिहून पुरं झालेलं नाही!'

'कारण मी असं पुस्तक लिहितो आहे, की जे पुढली शंभर वर्षं विद्वानांना पुरून उरेल? हा जेम्स जॉईस नक्की काय म्हणतोय ते पक्कं करण्यात दोन शतकं खर्ची पडणार आहेत.'

'विषय तरी काय आहे तुमच्या कादंबरीचा?'

'माझ्या मनाची अथांग खोली.'

म्हणजे?'

'माणसाला दोन मनं असतात. एक जागृत, दुसरं निद्रिस्त. आता आपण एकमेकां बोलत आहोत. आपली जागृत मनं आता काम करताहेत. पण आपण एकीकडे बोलत असताना, दुसरीकडे आपली मनं भरकटतही आहेत. त्या भरकटणाऱ्या दुसऱ्या मनाकडे आपण लक्ष देत नाही. उदाहरणार्थ, आता मला वाटतंय, की तुझे

बाहू कुरवाळावेत. पण दुसरीकडे मला माझा बऱ्याच वर्षांपूर्वी मेलेला एक मित्र पुन्हा एका जत्रेत निसटता पाहिल्यासारखा वाटला, तो भास होता, की ते सत्य होतं याचाच माझा विचार चाललाय. मरणानंतर माणूस क्षणभरसुद्धा आपलं दर्शन देणार नाही ? माझा अजून पक्का निर्णय होत नाही. हा मृत्यूनंतरच्या दिव्य जीवनाचा प्रश्न माझं दुसरं मन सतत पोखरत असतो. अशा या दुसऱ्या निद्रिस्त पण भटकत्या मनात जे विचारतरंग अखंड चालत असतात, त्यांची मी क्षणोक्षणीची नोंद ठेवतो आहे. निद्रिस्त मनाचा ललाटलेख वाचणं, हा माझ्या लेखणीचा भोग आहे. '

' You are a very interesting person ! '

' माझी कादंबरी वाचून जर कुणी हा शेरा मला उद्देशून मारला, तर मी पायातला जोडाच काढीन. कारण स्वतःचं अथांग मन हीचमुळी interesting and absorbing गोष्ट आहे असं प्रत्येकाला वाटावं, म्हणून मी जन्मच्या जन्म खर्चून कादंबरी लिहायची, नि ती दोन दिवसात वाचून आपल्या स्वतःच्या मनाकडे लक्ष न जाता वाचकाने लेखकाकडे लक्ष द्यायचं, ही माझी विटंबनाच होईल. अरे, माझा आक्रोश काय चाललाय नि तुम्ही शेरे काय मारताय ?'

' I am sorry. '

' माणसानं कधीही sorry वाटून घेऊ नये, कारण प्रत्येक क्षणाला उदात्ततेची छटा असते असं सतत सांगत राहाणं, हेही माझ्या कादंबरीचं एक प्रयोजन आहे. '

' तुम्ही मुळात कुठले ?'

' आयर्लंड. '

' मग इकडे कसे झुकांडलात ?'

' सूर्य कुठं आहे ?'

' आकाशात. '

' मग त्याचे किरण इकडे कसे झुकांडतात ?'

' ती निसर्गाची किमया आहे. '

' तसंच, माझं आयुष्य ही एक परमेश्वरी किमया आहे ! '

' म्हणजे तुम्ही आहात तरी कोण ! '

" A compulsive student, a tenor, an amateur actor, a spoiled priest, a middle class socialist, an exile, a smalltime swindler, a family man, a rebel, a spendthrift, a drinker, an egoist, a loner, a looker, a cold fish, a complexive martyr hung up on the sacramental universe, a languge teacher, a hand-me-down dandy, something in a bank, a swooning coward, a great writer and through it all an Irishman who never made his first mistake. "

'हे सगळं भारूड तुम्ही तुमच्या त्या दोन शतकांना डोकेदुखी ठरणाऱ्य' कादंबरीत कोंबा. मला फक्त एवढंच सांगा, की तुमची मातृभाषा कोणती ?'

'आयरिश अंगाने बोलली जाणारी इंग्रजी. पण फ्रेंच, जर्मन, इटालियन, ग्रीक लॅटीन, वगैरे साऱ्याच युरोपियन भाषा मला मातृभाषेसारख्याच येतात.'

'त्या कशा काय ?'

'कारण वयात आल्याबरोबर मी घर सोडलं नि सर्व युरोपखंडात वस्ती केली. वैद्यकी शिकण्यासाठी आर्यलंड सोडून फ्रान्स गाठलं. फ्रान्समध्ये वैद्यकी न शिकता गायन शिकलो. गायन न शिकवता मी न शिकलेलं गणित शिकवलं. मास्तरकी सोडून बँकेत लागलो. बँक सोडून शिकवण्या केल्या. शिकवण्या सोडून भाषांतरकार झालो. भाषांतरं सोडून लेखन केलं. सध्या फक्त लेखन करतो.'

'तुम्ही लग्न केलेलं नाही नं ?'

'नाही.'

'एवढे तरी बरं आहे ! नाहीतर संसार करता करता बारा वाजले असते तुमचे.'

'कोण म्हणतो मी संसारी पुरुष नाही म्हणून ?'

'आत्ता तर तुम्ही म्हणालात, की तुम्ही लग्न केलेलं नाही म्हणून ?'

'ते खरं ग. मी लग्न हा विधी केलेला नाही. पण मला दोन मुलं आहेत. मुलगा जॉर्जिया आणि मुलगी ल्युशिया. त्या मुलांची आईही आहे. तिचं नाव नोरा.'

'काय, सांगता काय तुम्ही ?'

'सत्य ! डब्लीनला गायक म्हणून मुक्कामाला असताना तिथल्या हॉटेलमध्ये कामाला येणाऱ्या नोरा या मुलीशी माझी मैत्री झाली. तिचं भलं व्हावं असं मला वाटलं; माझं चांगलं व्हावं असं तिला वाटलं. म्हणजेच, आम्ही एकमेकांवर प्रेम करू लागलो. प्रेम ही फार साधी, सरळ, सोपी गोष्ट आहे. एकमेकांचं भलं व्हावं असं वाटणं म्हणजेच प्रेम करणं. त्यातून मुलांचा जन्म झाला.

'लग्नाचं काय ?'

'गरज पडेल तेव्हा करू की ! सध्या आम्ही चौघं सुखात आहोत. लग्न केलं नाही म्हणून काहीही अडलं नाही.'

'पैशाचं काय करता ?'

'चक्क मित्रांकडून उसनवारी करतो. मिसेस मॅकॉर्मीकने नुकतेच काही डॉलर्स माझ्या नावावर परस्परच बँकेत भरले आहेत. मिस विव्हर म्हणून एक संपादिका आहे. ती मीठमिरचीला देते. दिवस कठीणच आहेत. पण हळूहळू माझा बोलबाला होतोय. थोडे थोडे पैसे येताहेत. मी नोराला म्हटलं, बाई, दिवस असे ओसाड झाले आहेत तर तू बारकीशी नोकरी कर. पण तिला इच्छा नाही. लेखनात मी इतका गुरफटलोय, की सर्व वेळ लेखनाला देण्याशिवाय मला काही गत्यंतरच

उरलेलं नाही. कधी कधी वाटतं, बारकीशी नोकरी धरावी. पण एकदा वाटतं, नको. तो स्थैर्याचा मोह नको. दिवस काय, असे नाहीतर तसे, पण जातातच. पण एकदा का माणसाचं इमान लयाला गेलं, की की पुन्हा म्हणून कसं ते, ते अंकूरणारच नाही. लेखनकार्याशी आपलं इमान कसं वज्रलेप राहिलं पाहिजे.'

'तुमचं वय काय?'

'चाळीशीला आलो की.'

'किती वर्षं लिहिताहात तुम्ही?'

'गेली तीस वर्षं. वयाच्या नवव्या वर्षी मी माझी पहिली कविता लिहिली. माझ्या वडिलांना त्याचा इतका आनंद झाला. की एका छापखान्यातून त्यांनी ती चक्क छापून आणली!'

'वडिलांची स्तुती असणार त्या कवितेत!'

'नाही. विश्वासघात हाच सर्व लौकिक व्यवहारांचा पाया आहे, असं गेली तीस वर्षं मला सतत वाटत आलं आहे. त्यामुळ गेली तीस वर्षं विश्वासघाताचं सूक्ष्म स्वरूप हाच माझ्या लेखनाचा विषय झाला आहे. जगात सर्वत्र एकमेकांचा विश्वासघात चाललेला आहे. गुरु शिष्यांचा विश्वासघात करतो; शिष्य गुरुचा विश्वासघात करतात. दोघे मिळून ज्ञानाचा विश्वासघात करतात. बाप मुलाचा विश्वासघात करतो; मुलं बापाचा विश्वासघात करतात. बायको नवऱ्याचा विश्वासघात करते; नवरा बायकोचा विश्वासघात करतो. समाज व्यक्तीचा विश्वासघात करतो; व्यक्ती समाजाचा विश्वासघात करते. मित्र मित्रांचा विश्वासघात करतात. मैत्रिणी मैत्रिणींचा विश्वासघात करतात. मित्र मैत्रिणींचा नि मैत्रिणी मित्रांचा आणि दोघ मिळून मैत्रीचा विश्वासघात करतात. लेखक वाचकांचा विश्वासघात करतात. वाचक लेखकांचा विश्वासघात करतात, प्रतिभा-प्रभूचा विश्वासघात करतात नि प्रभू विश्वाचा विश्वासघात करतो. असे हे विश्वासघाताचे पापुद्रे मी सोलून दाखवतो. वयाच्या नवव्या वर्षाची माझी पहिली कविता या विश्वासघाताच्या तत्त्वावर आधारलेली होती. आजही मी तोच विषय किसत आहे; आणि नव्वदाव्या वर्षी जरी मी काही लिहिलं, तरी विश्वासघात हाच त्याचा विषय असेल!–अर्थात मी नव्वद वर्षं जगणार नाही हा भाग वेगळा! आणि यदाकदाचित जगलो तर प्रतिभा माझा विश्वासघात करून माझ्या लेखणीला पांगळं करील.'

'असं कशावरून म्हणता?'

'कारण माझा फक्त चार गोष्टींवर ठाम विश्वास आहे. एक : यापुढे जगात फार मोठी गडगडाट करणारी राक्षसी वादळं होणार आहेत. दोन : प्रचंड रानटी कुत्रे गगनभेदी आवाजात भुंकणार आहेत. तीन : कान फुटतील असे फटाक्यांचे बार चहुदिशांना उडणार आहेत. आणि चार : नियती माझ्याशी विश्वासघात

करून माझ्या मुलीला वेडं आणि मला आंधळं करून मरणाच्या दरीत लवकरच लटकणार आहे!'

'एकाच वेळी शहाणपणाच्या आणि खुळेपणाच्या गोष्टी तुम्ही कशा काय बोलू शकता?'

'गोळीबंद विचार म्हणजे शहाणपण नव्हे; श्रद्धा म्हणजे खुळेपण नव्हे. बाकी, तुम्ही काय वाट्टेल ते लिहा, जग तुमची अडवणूक करणारच. माझ्यावर तिकडे मायदेशी अश्लीलतेचे खटले उभे केले आहेत म्हणे!'

'कृपा करून तुम्ही अश्लील लिहू नका.'

'का?'

'घाणीत हात कशाला घालायचे?'

'घाण नावाची काही वेगळी गोष्ट नसते ग. माझा पुकारा काय आहे? की, मी निद्रिस्त मनावर उमटणाऱ्या हरएक विचारतरंगाला शब्दबद्ध करणार. ब्लूम नावाच्या माझ्या हीरोच्या निद्रिस्त मन:पटलावर दीड-दोन दिवसांत जी असंख्य अस्पष्ट विचारकंपने उमटतात, त्यांची नोंद करण्यात माझी अकरा वर्षं आणि अडीच हजार 'बंद' खर्च पडले. आता, मनात चावट विचार जर येतातच, तर ते लिहून ठेवणं ही माझी इमान शाबूद राखण्याचीच बाब आहे. कुणाला कळो न कळो, पटो न पटो, मी चोरट्या मनोवांच्छितांची वीण उलगडत जाणार. भटकणाऱ्या मनाचे व्यवहार इतके निसटते असतात, की उपलब्ध शब्द मला अपुरेच पडणार. म्हणून मी माझी स्वत:ची नवी भाषाही तयार करायला लागलो आहे. माझं एकेक वाक्य पाचपाचशे शब्दांचं असतं आणि काही काही वेळा तर मी नुसते एकमेकांत गुरफटलेले पाचपाचशे शब्द लिहितो—पण ते वाक्य नसतं! मी तुला काय म्हटलं? मी असं काही लिहितो आहे, की ज्याचा नेमका अर्थ लावण्याचं काम दोन शतकं चालणार आहे! असा जो मी, त्या माझ्यावर हे बुद्रुक अश्लीलतेचे खटले भरताहेत! भरा म्हणावं, नि स्वत:ची करमणूक करून घ्या पोटभर. निशाण घेऊन मी केव्हाच आगेकूच केलं आहे.'

'करशील बाबा! मी हरले. उठूया आपण.'

'अच्छा. परवा दोन फेब्रुवारीला माझा जन्मदिवस आहे. त्या दिवशी पुन्हा भेटूया. तू अंधारात कशी दिसतेस ते मला माझ्या वाढदिवसाला पाहायचं आहे.'

'नको. मला भीती वाटते.'

'कसली? मी अंधारात अंगावर हात टाकेन म्हणून? अग, ते विसर स्त्रीदेहाची माझी आसक्ती संपलेली आहे. वयाच्या चौदाव्या वर्षांदासून मला उघड्या स्त्रीदेहाची यथेच्छ संगत लाभलेली आहे. तेव्हा मी वखवखलेपणा करीन हे तू विसर. माझ्या वाढदिवसाला आपण जरूर भेटू Dubliners या माझ्या कथासंग्रहाची ही कात्रणं घे. भरकन वाचू नकोस. शब्दांमधले सूर आळवीत आळवीत,

घुटमळत घुटमळत वाच नि कसं काय वाटलं ते पुढल्या भेटीत सांग. अंत:प्रेरणा होईल तसं लिहायला मी जसा माझा मुखत्यार आहे त्याप्रमाणे आपला खराखुरा अभिप्राय ठोसून सांगायला तूही मोकळा आहेस. भिऊ नकोस.'

'बरं वाढदिवसाची तुला भेट काय आणू ? तुला काय आवडतं ?'

'मला जे आवडतं ते तू आणू शकणार नाहीस आणि मला जे नावडतं ते मात्र तू नेमकं घेऊन येशील.'

'म्हणजे ?'

"मला सिंहगर्जना आवडतात ! त्या कुठेही विकत मिळत नाहीत. फुलं मला अजिबात आवडत नाहीत. ती तू आणू नकोस. मला हिरवा पाला फार आवडतो कारण त्यामुळे मला माझ्या मायदेशाची आठवण येते.'

दोन फेब्रुवारीला त्यांची नियोजित, चोरटी भेट झाली. काळाशार मखमली किमानो गाऊन घालून ती नटूनथटून आली. एका हातात जपानी पंखा होता. डोळ्यांत निळं काजळ होतं, दुसऱ्या हातात हिरव्यागार पानांची डहाळी होती.

त्याने खलाशाचा वेष घातला होता. डोक्यावर काऊंटी होती. डोळ्यांवर चांदीच्या काड्यांचा मोठ्या भिंगाचा चष्मा. उजवीकडचं भिंग बंद केलं होतं.

'Happy Birthday to you, Mr. James Joyce !'

'Thanks, आमचं Dubliners वाचलं काय ?'

'हो. ते वाचताना मला वाटायला लागलं, की यातला अर्धा भाग संगीत नि अर्धा भाग वाङ्मय आहे.'

'नाही मी लिहितो ते सारंच संगीत आहे.'

'असू दे. आमचं झुरीच कसं काय वाटतंय ?'

'माझ्या आयुष्यात कधी न घडलेल्या गोष्टी इथे झुरीचमध्ये घडताहेत. या झुरीचमध्येच तुझ्या भेटीचा योग आला. माझी कीर्ती दिगंत पसरविणारी Ulysses या झुरीचमध्येच पुरी होणार. या झुरीचमध्येच मी आंधळा होऊन जगाचा निरोप घेणार.'

'आज वाढदिवसाच्या दिवशी निरोपाची भाषा कशाला हवी ? आपण घटकाभर सुखाच्या गोष्टी बोलूया.'

'मान्य. ब्युजेन नावाचा माझा चित्रकार मित्र आहे. त्याच्या स्टुडिओवर आपण जाऊया. तिथे आपल्याला भरपूर एकांत मिळेल.'

स्टुडिओत वाढून ठेवलेल्या सुखाच्या कल्पनेने ती फुलून आली.

स्टुडिओ ऐसपैस आणि सोईस्कर होता. त्याने प्रथम खिडक्या दारं बंद केली. मार्थाला मॉडेलच्या आसनावर बसवून मग तो स्टुडिओतून बाहेर पडला. जवळपासच्या एका विद्यार्थ्याकडे जाऊन त्याने जाडजूड मुळ्यासारख्या चार मेणबत्त्या उसन्या आणल्या. देवापुढे मेणबत्त्या ठेवायचे पितळी स्टॅन्डस् असतात, तेही आणले.

ज्यूंच्या पूजाविधीचं हे सर्व साहित्य घेऊन तो तिन्हीसांजा टळल्यावर स्टुडिओवर परतला. मार्था त्याची वाट पाहात बसलेलीच होती.

'किती वेळ केलास तू ! आणि या मेणबत्त्या कशाला ?'

'आता रात्र झाल्यावर प्रकाश हवा ना ?

'मग विजेचे दिवे आहेत की.'

'तो रूक्ष भगभगीत उजेड नको. तू आता कपडे काढ नि ह्या आसनावर नीट ऐटीत बस. तुझ्या चार बाजूंना मी या चार मेणबत्त्या लावतो. त्यांच्या शांत तेजात मला तू आहेस त्या स्थितीत पाहायचं आहे.'

'हा काय प्रकार चालवला आहेस तू '

'ते तुला कळेलच.'

'मला भीती वाटते.'

' No–No. येशूने जिच्या पोटी गर्भवास भोगला त्या मातेला भीती कसली ? ती साक्षात जगन्माताच असते. प्रेममय. दीप्तीमय.'

'मी जगन्माता ? अरे बोलतोस काय खुळ्या ? मी मार्था आहे, मार्था. मार्था फ्लिशमन.'

'ते जगव्यवहारातील ढोबळ सत्य आहे. मला त्याच्याशी कर्तव्य नाही. माझ्यातल्या दिव्य प्रतिभेला तू जगन्मातेच्या रूपातच दिसतेस. जगन्मातेला मला शांत तेजात पाहून घेऊ दे डोळे भरून.'

क्षणभर ती गांगरली. क्षणात सावरली. त्याने सांगितलं तसे ति` केलं. त्याने मेणबत्त्या पेटवल्या. त्या शांत तेजाचं रेशमी वस्त्र तिच्या देहाने धारण केलं. तिचं प्रसन्न मुखमंडल तेजोन्मय झालं. त्याने माथा नम्र केला.

तीच त्यांची शेवटची भेट ठरली.

मेणबत्त्यांचे स्टॅन्डस ज्याचे त्याला परत केले. त्या विद्यार्थ्याने विचारलं,

'हे सगळं साहित्य तुम्ही कशासाठी नेलं होतं ?'

जॉईसने थंड उत्तर दिलं,

आमच्या घरी काळोखाची पूजा होती.'

८ जानेवारी १९७२

शरद गोखले

## रंगभूमी

# पगला घोडा

## एक वेगळा प्रयोग

मनामध्ये खोलवर दडलेल्या, दडवून ठेवलेल्या व्यथा प्रत्येकाजवळ असतात, अगदी जवळच्या माणसांजवळही अनुभवाची ही कटू शिदोरी उलगडली जात नाही. किंबहुना ती तशी उलगडली जाण्याचे प्रयोजन नसते, आणि संबंधितांची इच्छाही नसते. मात्र काही प्रसंग हमखास असे येतात, की खोलवर जाऊन सतत त्रास देणाऱ्या या अनुभवांना वाट मोकळी करून दिली जाते.

एका आडगावी दूरवरच्या स्मशानामध्ये एका मुलीचे प्रेत जाळायला आलेल्या चार विभिन्न स्तरांतील व्यक्ती एकत्र येतात. त्या कंटाळवाण्या वातावरणावर उतारा म्हणून पत्ते सुरू होतात आणि जोडीला दारू येते. आणि मग हळूहळू प्रत्येक-जण आपल्या आयुष्यातील दडलेल्या अगदी आजवर न सांगितलेल्या व्यथा सांगू लागतो. या चौकडीची कहाणी, आणि सरणावर जळणाऱ्या मुलीच्या आत्म्याला फार उशीरा आलेली सत्याची जाणीव, हीच थिएटर युनिटच्या 'पगला घोडा'ची कहाणी. चौखूर उधळणाऱ्या मनाच्या विचारधारांना अनेक ठेचा लागतात. बारीक सारीक ठेचा भरून आल्या तरी विचारांच्या या वेड्या घोड्याला एखादी ठेच अगदी जिव्हारी लागते, तिची बोच कायम राहाते. जमलेल्या चार मंडळींपैकी एक आहे शशीबाबू, पोस्टमास्टर, दुसरा सातू, हा आहे कॉंट्रॅक्टर, शाळेत शिकवण्याचे काम करणारा हिमा आणि डॉक्टरच्या हुकूमाप्रमाणे बाटल्या भरणारा कार्तिक बाबू यांना अन्य दोघांची साथही आहे. वैराण स्मशानामध्ये प्रत्येकजण आपल्या प्रेमाची शोकांतिका ऐकवतो. योग्य वेळी निर्णय घेण्याचे धाडस न दाखवल्याने कायमचे डाचत रहावे असे दुःख प्रत्येकाच्या वाट्यास आले आहे.

या दुःखाचे पदर उलगडले जात असतानाच शशीबाबूंची मालती येऊन जाते. सातू कॉंट्रॅक्टरसाठी जीव टाकणारी लक्ष्मी आपल्या भावनांचे दर्शन देऊन जाते. हिमाद्रीला जिच्या प्रेमासंबंधी शंका आहे अशी 'मिस रॉय' आपले वैभवसंपन्न जीवन झिडकारून आत्महत्या करण्यासाठी तुमच्यासमोरून निघून जाते. तर कम्पौंडर

कार्तिकबाबू आपले मन जिन्याजवळ उघडेही करू शकले नाहीत, ती मुलगी–तिला पोचवायला तर मंडळी आलेली असतात. पण तेथे सतत घोटाळणाऱ्या तिच्या मृतात्म्याला अगदी शेवटच्या क्षणी कार्तिकचे मन कळते; पण वेळ टळून गेलेली असते.

## अवघड नाटक रेखीव प्रयोग

मनोविश्लेषणात्मक पद्धतीच्या या अवघड नाटकाचा थिएटर युनिटने सादर केलेला प्रयोग अतिशय रेखीव आणि नाटक प्रेक्षकापर्यंत पोचवण्यास समर्थ असा होता. रंगमंचावर दृष्य आहे स्मशानाचे. परंतु अचूक नेपथ्याची योजना करून वातावरण छान निर्माण केले आहे. रंगमंचाच्या बाजूने तांबडया प्रकाशाच्या छटा ठेवून चितेच्या ज्वाळा सूचित केल्या आहेत. स्मशानाच्या बाजूला मंडळी बसलेली आहेत. तेथे कलाकारांच्या हालचाली बांधण्यास सोईस्कर पडावेत, अशा पद्धतीचे प्लॅटफॉर्मस. बस्स. स्मशानाचे वातावरण निर्माण करण्यास एवढे पुरेसे आहे. बाकीची जबाबदारी कलाकारांची.

चंद्रशेखर कामेरकर (कार्तिक कम्पौंडर), अच्युत पोद्दार (सातूबाबू,) पृथ्वीराज शिंदे (हिमाद्री) व सुरेन फातरफेकर (शशीबाबू), या चार कलावंतांनी आपली कामगिरी उत्तम बजावली आहे. परंतु जळणाऱ्या मुलीचा आत्मा आणि या प्रत्येकाच्या प्रेयसीचे रूप घेऊन आलेल्या कुमूद पोवार यांना ही भूमिका म्हणजे एक आव्हानच होते. बाईंनी हे आव्हान छान पेलले आहे. त्यांच्या प्रभावी अभिनया-मुळे प्रत्येक अनुभव विलक्षण प्रत्ययकारी झालेला आहे. पालेकरांनी बंगाली कथा, बंगाली वातावरणातच केवळ मराठी माध्यमातून सादर करण्याची कामगिरी उत्तम बजावली आहे.

नेपथ्य, कलाकारांकडून हवे ते अचूक काढून घेण्याची हातोटी आणि प्रकाश-योजना, अशा सर्व आघाडया थिएटर युनिटचे सत्यदेव दुबे व अमोल पालेकर यांनी व्यवस्थित सांभाळलेल्या आहेत.

'ताई-भाऊ'ची कौटुंबिक जिव्हाळयाची नाटके आणि हलकीफुलकी विनोदी नाटके, या व्यावसायिक पातळीवर होणाऱ्या साचेबंद नाटकांपेक्षा अभ्यासू मंडळींनी जिद्दीने बसवलेली ही प्रायोगिक नाटके एक वेगळा आनंद निश्चितच देऊन जातात.



# संरक्षण साहाय्य व्याख्यानमाला

गेली पाच-सहा वर्षे पुण्यातील लेखक-संपादक, चित्रकार, पत्रकार, प्रकाशक, मुद्रक, पुस्तक विक्रेते व या क्षेत्रांशी संबंधित असलेली मंडळी प्रतिवर्षी २६ जानेवारीला एकत्र जमत असतात. या मेळाव्यामागे संघटना वगैरे नाही. एक दिवस सहजपणे जमावे एवढीच या मागची भावना असते. पुणे, धायरी, नारायणगाव, वेरूळ, पिंपरी इत्यादी ठिकाणी हा मेळावा आतापर्यंत भरलेला आहे. पुण्याबाहेरची मंडळीही या मेळाव्यात सामील होत असतात.

यंदा या परिवाराचे पाऊल थोडे पुढे पडत आहे. संरक्षण प्रयत्नांना आर्थिक सहाय्य तर प्रत्येकजण आपापल्या परीने करीत आहेच, परंतु या साठी एक व्याख्यानमालाही '२६ जानेवारी परिवार' आता आयोजित करीत आहे. ही व्याख्यानमाला मुख्यत: नुकतेच संपलेले युद्ध व त्यांतून उद्‌भवणाऱ्या समस्यांना स्पर्श करणारी असेल. या निमित्ताने जमलेला सर्व निधि (खर्च वजा जाता) संरक्षण कार्यासाठी शासनाच्या स्वाधीन केला जाईल.

व्याख्याते आपापल्या विषयातील नामवंत अभ्यासक आहेत. पुण्यातील श्रोतृवर्ग मोठ्या संख्येने या व्याख्यानांना उपस्थित राहून हा उपक्रम यशस्वी करतील अशी आम्हाला आशा आहे.

आपले

**अ. अं. कुलकर्णी** **अनंत सालकर** **दि. बा. मोकाशी**
**वि. ग. माटे** **श्री. ग. माजगावकर**

## विषय व वक्ते

| | | |
|---|---|---|
| १० जानेवारी ७२ : | डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे | : भारतीय राष्ट्रवादाचा नवा अर्थ |
| ११ जानेवारी ७२ : | प्रा. रा. म. बापट | : परराष्ट्र धोरणाची नवी दिशा |
| १२ जानेवारी ७२ : | डॉ. वि. म. दांडेकर | : युद्धानंतरचे अर्थकारण |
| १३ जानेवारी ७२ : | हमीद दलवाई | : मुस्लीम जगत आणि बंगला देश |
| १४ जानेवारी ७२ : | दि. वि. गोखले | : आपले युद्धनेतृत्व |
| १५ जानेवारी ७२ : | प्रा. देवदत्त दाभोळकर | : बांगला देशांत आम्ही काय पाहिले ? |
| १६ जानेवारी ७२ : | प्रभाकर पाध्ये | : परिसंवाद |

**व्याख्यानांना प्रवेशमूल्य नाही. स्वेच्छा-निधि व्याख्यानांचे ठिकाणी जमा केला जाईल.**

**स्थळ : एस्. पी. कॉलेज, पुणे.** **वेळ : सायंकाळी सहा.**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 30 Paise : Regd. No. MH 649




"मगन, अरे त्ये आता युद्ध संपला ना? आता आपला नेहमीसारखा वेपार करायला काय बी बांधा नाय्. त्यात राष्ट्रद्रोह काय नाय्...."